दे धक्का!!

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २११ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


**आजचा सामना**

LUCKNOW SUPER GIANTS VS MUMBAI INDIANS

लखनौ सुपरजायंटस् विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : रात्री ७.३० वा. स्थळ : लखनौ

# संविधान कधी नाही बदलणार, आरक्षण नाही संपवणार!

# तुमचे काढून अल्पसंख्यांकाना द्यायचे कारस्थान नक्की मोडणार!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**मोदी संविधान बदलणार, आरक्षण संपवणार, असा खोटा प्रचार काँग्रेस करत आहे, पण गेल्या दहा वर्षात आम्ही आरक्षणाला धक्का लावलेला नाही आणि भविष्यातही कधी लावणार नाही, मात्र एस.टी., एससी, ओबीसी आरक्षणात कपात करुन ते अल्पसंख्यांकाना द्यायचे काँग्रेसचे षडयंत्र मोडून काढण्यासाठी मोदींचे हात मजबूत करा, ही मागणी घेऊन मी आपल्याकडे आलोय, असे भावनीक आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सोलापूरकरांना केले.**



जानेवारीत 'द्यायला' आलो, आज 'मागायला'... सोलापूरकरांचे आशिर्वाद!

नरेंद्र मोदींचे भावनीक आवाहन

मी २०२४ मध्ये दुसऱ्यांदा सोलापुरात आलो, हे सोलापूरकरांचे प्रेम आहे. मी जानेवारीत आलो, तेव्हा तुमच्या हक्काचे द्यायला आलो होतो; आता मात्र तुमच्याकडे काही मागायला आलो आहे. मला तुमच्याकडून धन-दौलत नको आहे. तर तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आशीर्वाद हवा आहे. तुमचा आशीर्वाद मिळाला तर मी पुन्हा तुम्हाला द्यायला येईन. आरक्षण रद्द करण्याचा मार्ग आम्हाला मंजूर नाही, पण काँग्रेस मतांसाठी देशात भ्रम निर्माण करीत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात गेल्या दहा वर्षात आम्ही आरक्षणाला धक्का लावला नाही, असेही पंतप्रधान मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्यासाठी सोमवारी (२९ एप्रिल) सोलापूरच्या होम मैदान येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. 'माझ्या प्रिय सोलापूरकरांना माझा नमस्कार' असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून भाषण सुरू केले. या वेळी नरेंद्र मोदी यांनी जय-जय रामकृष्ण हरी नावाचा जयघोष करत भाषणात चांगलीच रंगत आणली. यावेळी मोदी म्हणाले की, विद्यमान लोकसभा निवडणुकीत तुम्ही आगामी पाच वर्षांतील गॅरंटीला निवडणार आहात. दुसऱ्या बाजूला २०१४ च्या पूर्वी देशाला भ्रष्टाचार, कुशासन आणि दहशतवादाच्या खाईत लोटणारे लोक आहेत. आपला इतिहास कलंकित असूनही काँग्रेस पुन्हा एकदा देशाची सत्ता हाती घेण्याचे स्वप्न पाहत आहे. पण, त्यांना अंदाजच नाही की, निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यातच इंडिया आघाडीचा पत्ता गूल झाला आहे, तुमचा हा सेवक डोके झुकवून तुमच्याकडे येतो आहे. गेली दहा वर्षे तुम्ही मला पारखून पाहिले आहे. माझे प्रत्येक पाऊल तुम्ही पाहिले आहे. माझ्या एक एका शब्दाला तुम्ही जोखून पाहिले आहे. त्यामुळे मोदींना तुम्ही आता चांगलेच ओळखता. दुसरीकडे इंडी आघाडीकडे नेत्याच्या नावावर महायुद्ध सुरू आहे. ज्यांच्याकडे चेहरा नाही, ज्यांचे नाव नाही, त्यांच्याकडे एवढा मोठा देश दिला जाऊ शकतो का, असा सवालही त्यांनी उपस्थितांना केला.

## इंडी आघाडीचा पाच पंतप्रधानाचा फॉर्म्युला

इंडी आघाडीवाले पाच वर्षांसाठी पाच पंतप्रधान असा फॉर्म्युला घेऊन आले आहेत. प्रत्येक वर्षाला एक पंतप्रधान, देशाचा खजिना जेवढा पाहिजे तेवढा लुटतील. प्रत्येक वर्षी नवा पंतप्रधान देशाला लुटेल. नकली शिवसेनावाले म्हणतात की, आमच्याकडे पंतप्रधानपदासाठी अनेक उमेदवार आहेत. त्यांच्या एका बोलघेवड्या नेत्याने तर सांगितले की, आम्ही एका वर्षात चार पंतप्रधान केले, तर त्यात काय वावगं आहे? पाच वर्षांत पाच पंतप्रधान असतील, अशा लोकांच्या हातात तुम्ही सत्ता देणार का, त्यांना देश चालवायचा नाही तर त्यांना केवळ मलई खायची आहे, असे मोदी म्हणाले.

## काँग्रेसवर मानसिक दबाव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभेत बोलताना इंडी आघाडीवर मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचा दिसत आहे. लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्याच्या निवडणुकीत इंडी आघाडीची बत्ती गूल झाली आहे, असे मोदी म्हणाले. दरम्यान, पहिल्या टप्प्यात १०८ जागांवर मतदान झाले आहे. तर दुसऱ्या टप्यात ८८ जागांवर मतदान झाले आहे. या १९६ जागांमध्ये इंडी आघाडी मागे पडली आहे, असा दावा मोदी यातून केला आहे. त्यातून त्यांनी निवडणूक स्ट्रॅटेजी करत विरोधकांना हतबल करण्याचा प्रयत्न चालवल्याचे दिसत आहे.

## डॉ.आंबेडकर आले तरी संविधान बदलणार नाही

डॉ. आंबेडकरांपासून अनेक नेत्यांचा अपमान काँग्रेसने केला. त्यांना 'भारतरत्न' पुरस्कार देताना देखील भाजपने पाठिंबा दिला होता. त्यावेळी देशात काँग्रेस विरोधी सरकार होते. २०१४ ला तुम्ही बहुमत दिले आणि दलितच्या मुलाला राष्ट्रपतीही बनवलं. २०१९ मध्ये बहुमत दिले. आदिवासी मुलीला पहिल्यांदा राष्ट्रपती बनवले. एससी, एसटी या प्रवर्गातील सर्वात जास्त नेते भाजपमधून निवडून येतात. ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोक केंद्रात मंत्री आहेत, ते याच वर्गातून येतात. संविधान बदलणार, आरक्षण संपवणार असे काँग्रेस खोटे सांगत आहे. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील आता आरक्षण संपवू शकत नाहीत, मोदी तर दूरची गोष्ट आहे, असे मोदी यांनी ठणकावून सांगितले.



## गरिबांना न्याय देण्यासाठी दहा टक्के आरक्षण

कोणाचाही हक्क न काढता आम्ही सामान्य वर्गातील गरीब लोकांना न्याय देण्यासाठी दहा टक्के आरक्षण दिले. यामुळे देशात कोणतीही आग लागली नाही, उलट दलित नेत्यांनी याचे स्वागत केले. मराठी भाषेत शिकले की संधी मिळणार नाही असे या आधीच्या सरकारने सांगितले होते. आम्ही सांगितलं की मराठी शिकला तरी डॉक्टर, इंजिनिअर बनता येईल, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

## शहर, ग्रामीणमधील कार्यकर्त्यांची गर्दी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा यशस्वी करण्याचा निर्धार महायुतीच्या आमदारांनी केला होता. त्यानुसार नियोजनही करण्यात आले होते. सभेसाठी शहरातील तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी महिला कार्यकर्त्याही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यकर्त्यांना सभास्थळी आणण्यासाठी आणि परत नेण्यासाठी नेत्यांकडून गाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. सभा संपल्यानंतर वाहने काढताना वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली होती. त्यानंतर शहर आणि ग्रामीणमधील कार्यकर्त्यांना विविध ठिकाणी जेवण आणि नाश्त्याची सोय करण्यात आली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सुमारे दोन हजार पोलीस होटगी रोड ते सभास्थळापर्यंत तैनात करण्यात आले होते. या पोलिसांसाठीही जेवण आणि नाश्त्याची सोय करण्यात आली होती. सभास्थळावर सीसीटिव्ही कॅमेरेही बसविण्यात आले होते.

## ओबीसी, एससी-एसटी आरक्षण काढणार नाही

पाच वर्षाच्या काळात मोदीजवळ जेवढे हवे तेवढी मते आहेत, पण हा रस्ता आम्हाला मान्य नाही. आमच्या पूर्वजांनी पाप केले असतील, त्याचे प्रायश्चित्त करण्याची ही वेळ आहे. एसटी, एससी, ओबीसी आरक्षणमध्ये लूट करून अल्पसंख्यांकांना द्यायचे काँग्रेसने तुमच्या विरोधात रचलेलं षडयंत्र मोडून काढायचे आहे. कर्नाटकमध्ये देखील काँग्रेसने हेच केले, पण मी हे होऊ देणार नाही. त्यामुळे मोदीचे हात मजबूत करा ही मागणी घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे, असे मोदी म्हणाले.

## राम आयेंगे गाण्यावर कार्यकर्त्यांनी धरला ठेका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा संपल्यानंतर साऊंडवर राम आयेंगे गाणे लावले होते. त्यावेळी सभेसाठी उपस्थिती असलेल्या भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करत जय श्रीरामच्या घोषणा दिल्या तसेच अनेक कार्यकर्त्यांनी या गाण्यावर ठेकाही धरला होता. यावेळी संपूर्ण वातावरण राममय झाले होते.

## सोलापुरात केलेल्या कामांचा आवर्जून उल्लेख

काँग्रेसने २३ वर्ष पंढरपूर रेल्वेचा प्रश्न भिजत ठेवला पण मोदी सरकार सत्तेवर आल्यावर निधी मंजूर करून हा प्रश्न मार्गी लावला. पुणे-हैदराबाद महामार्गाचे काम तडीस नेले पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर या भक्तिमार्गांना जोडण्यासाठी नवे रस्ते मंजूर केले. सोलापूरला वंदे भारत एक्सप्रेस ही नवीन गाडी दिली. सोलापूरकरांचे उरलेले प्रश्न सोडवण्यासाठी मोदीचे हात बळकट करा असे पंतप्रधान मोदी यांनी आवाहन केले.

## पद्मशाली समाजाचे मीठ खाऊन मोठा झालो

आपल्या जवळपास ४० मिनिटाच्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी पद्मशाली समाजाची आवर्जून आठवण काढली. अहमदाबादमधील मिल मजदूर ज्यावेळी मला आठवतात त्यावेळी पद्मशाली समाजाची मला आठवण येते. पद्मशाली समाजाने मला खाऊ घातले आहे. त्यांचे मीठ मी खाल्ले आहे. त्यामुळे त्यांच्या मिठाचे उपकार मला फेडायचे आहेत, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## यांची होती उपस्थिती

व्यासपीठावर शिवसेनेच मंत्री गुलाबराव पाटील, खासदार जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. समाधान आवताडे, माजी आ. प्रशांत परिचारक, राजन पाटील, लक्ष्मणराव ढोबळे, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, लोकसभा प्रमुख विक्रम देशमुख, सेनेच्या प्रवक्त्या ज्योती वाघमारे, राष्ट्रवादीचे आनंद चंदनशिवे, मनसेचे विनायक महिंद्रकर, रोहिणी तडवळकर आदींची उपस्थिती होती.

## २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर पडले

एससी, एसटी यांच्यापर्यंत योजना पोचवण्यासाठी आमचे सरकार शेवटच्या टोकापर्यंत जात आहेत. २५ कोटी लोक हे गरिबीतून बाहेर आले आहेत. नियत बरोबर असेल तर निकाल पण बरोबर मिळतात. व्हायब्रंट भारत ही आमची योजना आहे. सीमेवर असलेल्या गावात मतदार जास्त नाहीत, पण मला त्यापेक्षा माझे देशाचे नागरिक मोठे आहेत. माझी नजर फक्त व्होटबँक म्हणून असती तर कोट्यवधी रुपयांची योजना आणली नसती. काश्मीरमध्ये पहिल्यांदा एससी, एसटी, ओबीसी आरक्षणाचा फायदा मिळाला, असे सांगत मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली.



सुराज्य
मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२४ । पान २

# ठाण्यात राजन विचारेंच्या शक्तीप्रदर्शनाला जुन्या जाणत्यांची साथ

मिथिलेश जोशी

**शिवसेनेतील दुभंगानंतर पहिल्याच लोकसभा निवडणुकांना सामोरे जाणारे ठाण्याचे विद्यमान खासदार राजन विचारे यांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या निमीत्ताने सोमवारी केलेल्या शक्तीप्रदर्शनाला संपूर्ण मतदारसंघातील जुन्या जाणत्या शिवसैनिकांसह इंडिया आघाडीतील घटकपक्षांची मोठी साथ लाभल्याचे चित्र दिसून आले.**

कोणतीही निवडणुक असो ठाण्यात शिवसेनेचे शक्तीप्रदर्शन ठरलेले असते. लोकसभा, विधानसभा निवडणुकांसाठी शहरातील जांभळी नाका, जुनी बाजारपेठ, टेंभी नाक्यावरुन निघणाऱ्या मिरवणुकांमधून संपूर्ण परिसरात एक वेगळा जोश, उर्जा पहायला मिळत असतो. शिवसेनेतील फुटीनंतर होणाऱ्या पहिल्याच मोठया निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार राजन विचारे यांना यावेळी कसा प्रतिसाद मिळतो याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. सकाळपासूनच भगव्या टोप्या, झेंडे, उपरणे परिधान केलेल्या शेकडो शिवसैनिकांचे जथ्थे तलावपाली परिसरात जमू लागले आणि ही मिरवणुक पुर्वीसारखीच दमदार होणार याचा अंदाज येथे उपस्थितांना येऊ लागला. सकाळचे ११ वाजू लागले तसे उन माथ्यावर चढू लागले. जशी वेळ पुढे सरकू लागली तसा हा जोश, उत्साह आणखी वाढू लागला. ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईंदरसह आसपासच्या शहरांमधील साठी, सत्तरीकडे झुकलेले अनेक जुने शिवसैनिकांचे जथ्थे विचारे यांच्या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी येत होते. नवी मुंबई, कल्याणमधून लोकल गाड्यांमधून प्रवास करत ठाण्याच्या दिशेने येणारे उद्धवनिष्ठ सैनिकांचे लोंढे दुपारी १२ पर्यत या भागात येऊन धडकत होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, पक्षाचे दिवंगत ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या तसबिरी असलेले फलक, रथांमधून या नेत्यांच्या छायाचित्रांची केलेली मांडणी देखील नजरेत भरणारी होती. ठाण्याच्या जुन्या बाजारपेठेत ही मिरवणुक शिरताच उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांचा या मिरवणुकीत झालेला सहभाग उपस्थितांचा उत्साह वाढविणारा ठरला.



### इंडिया आघाडीची मोठी साथ

विचारे यांच्या मिरवणुकीत इंडिया आघाडीतील घटकपक्ष असलेले कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आप यासारख्या पक्षाचे नेते, कार्यकर्ते देखील मोठया संख्येने सहभागी झाल्याचे पहायला मिळाले. मिरा-भाईदर भागातील कॉंग्रेसचे नेते मुजफ्फर हुसेन, राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड, कॉंग्रेसचे स्थानिक नेते, पदाधिकारी या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

### निष्ठेचा गजर, शिष्यत्वाचे दाखले



ठाणे लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचा उमेदवार ठरत नसताना राजन विचारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करत असताना आनंद दिघे यांचे खरे शिष्य आज पडद्यामागे गेले आहेत, असा उल्लेख करत शिवसेनेशी, बाळासाहेबांशी आणि दिघेसाहेबांशी खरी निष्ठा राखणारे ठाणेकर निष्ठेला मत देतील अशी भूमीका मांडताच मिरवणुकीत उपस्थितांनी त्यांना भरभरुन दाद दिल्याचे पहायला मिळाले. निष्ठावंत खासदार अशा आशयाचे फलकांची गर्दी हे या मिरवणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य ठरले. ठाण्यातील वेगवेगळ्या भागातून या मिरवणुकीत सहभागी झालेल्या ज्येष्ठ शिवसैनिकांची संख्या देखील मोठी होती. 'गेल्या दोन वर्षात आम्ही जे पहात आहोत ते वेदनादायी होते. इतके दिवस घरी बसून होतो. आज उन्हाची पर्वा करत घरी बसलो तर झोप लागणार नाही. एका निष्ठावंतासाठी घराबाहेर पडलो आहे 'ही लोकमान्यनगर भागातील आत्माराम सावंत या जुन्या शिवसैनिकाची प्रतिक्रिया बोलकी होती. 'विचारे यांनी खासदार म्हणून काय काम केले हे मतदार ठरवतीलच. परंतु निष्ठा नावाची चिज असते की नाही? ठाण्यात वादळ उठले असताना विचारे पाय घट्ट रोवून उभे होते. त्यांच्यासाठी आम्ही नको का यायला? ' अशी प्रतिक्रिया नरेंद्र मोरे या सावरकरनगर भागातून या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी आलेले ६५ वर्षाच्या एका जुन्या शिवसैनिकाने दिली. सावंत, मोरे यांच्यासारखे शेकडो जुने शिवसैनिक या मिरवणुकीत पहायला मिळाले.

## मुंबई बाजार समितीतील भ्रष्टाचाराच्या मुद्द्याभोवतीच सातार्‍यातील प्रचार

**सातार्‍यातील प्रत्येक गावोगावी प्रचारात मुंबई बाजार समितीतील भ्रष्टाचार हाच मुद्दा चर्चेत राहील असा प्रयत्न होत आहे. नेत्यांकडून या भ्रष्टाचारावर जोर दिला जात आहे.**

सातारा मतदारसंघातील प्रचारात सध्या स्थानिक प्रश्नांपेक्षा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील घोटाळ्याचा मुद्दाच जास्त तापवला जात आहे.



यप्रकरणी शशिकांत शिंदेंवर नव्याने दाखल झालेला गुन्हा नुकतीच तीन संचालकांवर झालेली कारवाई आणि सातार्‍यातील पवार गटाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर झालेले आरोप यामुळे हा प्रश्न सध्या प्रचारात ऐरणीवर ठेवण्याचा प्रयत्न भाजपचे उमेदवार उदयनराजे करत आहेत. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील हा शौचालय घोटाळा आहे. २०१४ पूर्वीच्या असलेल्या या प्रकरणात आमदार शशिकांत शिंदे यांचे नाव आरोपांच्या भोवऱ्यात सुरुवातीपासून होते. आता त्यांना पवार गटाकडून सातार्‍याची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर या आरोपांना आता प्रचाराच्या मुद्द्याचे स्वरूप आले आहे. सध्या सातार्‍यातील प्रत्येक गावोगावी प्रचारात हाच मुद्दा चर्चेत राहील असा प्रयत्न होत आहे. प्रचारातील भाषणातही नेत्यांकडून या भ्रष्टाचारावर जोर दिला जात आहे. कोरेगावचे आमदार महेश शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील माथाडींचे नेते नरेंद्र पाटील आणि स्वतः उदयनराजे भोसले यांनी वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन माध्यमांनी यावर आवाज उठवत शशिकांत शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

## दिल्लीत कॉंग्रेसमध्ये चाललंय तरी काय?



लोकसभा निवडणुकीसाठी दिल्लीत जे उमेदवार देण्यात आले आहेत, ते बदलले जाणार नाहीत, असे स्पष्टीकरण कॉंग्रेसकडून देण्यात आले आहे. दरम्यान अरविंदर सिंह लवली यांचा दिल्ली प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा पक्षाने मंजूर केला आहे. आपण अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे, पक्ष सोडलेला नाही, असा खुलासा लवली यांनी केला असला तरी त्यांच्या भाजप प्रवेशाची जोरदार चर्चा आहे.

दिल्ली कॉंग्रेसमधील गटबाजी उफाळून आली असून प्रदेश प्रभारी दीपक बाबरिया यांच्यावर गंभीर आरोप करत लवली यांनी प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. लवली यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला असून नवीन अध्यक्ष लवकरच नेमला जाईल, असे लगोलग कॉंग्रेसकडून सांगण्यात आले आहे. प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर लवली यांनी कॉंग्रेसचे नेते संदीप दीक्षित यांची भेट घेतली. कॉंग्रेसचा अध्यक्ष बनणे म्हणजे काट्याचा मुकुट असल्याची प्रतिक्रिया नंतर दीक्षित यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. मागील सहा महिन्यांपासून लवली कठोर मेहनत घेत आहेत. दोन - तीन जागा मिळाल्यानंतर सर्वांच्या सहमतीने उमेदवार निवडला जाईल, असे वाटले होते, तथापि तसे झाले नाही, असेही दीक्षित म्हणाले. ईशान्य दिल्ली मधून निवडणूक लढवत असलेले युवा नेते कन्हैया कुमार यांच्या उमेदवारीला कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध केला आहे. या मतदारसंघात स्थानिक उमेदवार दिला जावा, अशी मागणी करीत कार्यकर्त्यांनी मौजपूर मेट्रो स्थानकासमोर निदर्शने केली. कन्हैया कुमार यांच्यासोबत उदित राज यांच्या उमेदवारीला देखील विरोध होत आहे.

दिल्लीत लोकसभेच्या सात जागा असून यापैकी ४ जागा आम आदमी पक्ष लढवीत आहे तर ३ जागा कॉंग्रेस लढवीत आहे.

## कॉंग्रेसचा पंजा बदला किंवा पोलीस दलाच्या बोधचिन्हातील पंजा काढून टाका

**कॉंग्रेस पक्षाच्या 'पंजा' या चिन्हावरून आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण मनसेचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी कॉंग्रेस पक्षाचे पंजा हे चिन्ह बदला किंवा पोलीस दलाच्या बोधचिन्हांमध्ये असलेला पंजा काढून टाका अशी मागणी करत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडे तक्रार केली आहे. या तक्रारीवर तात्काळ निर्णय न झाल्यास या चिन्हांच्या संदर्भात न्यायालयात जाणार असल्याचे देखील अशोक तारे यांनी सांगितलं.**

### पोलिसांच्या बोधचिन्हावर आक्षेप

कॉंग्रेस पक्षाचे निवडणूक चिन्ह हे पंजा असून पोलीस दलाच्या बोधचिन्हामध्ये देखील पंजा चिन्हाचा वापर करण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्यांच्या गणवेशावर देखील पंजा चिन्ह असतं. निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक पोलीस कर्मचारी काम करत असतात, त्यामुळे त्यांच्या गणवेशावर असलेल्या पंजामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्याची तक्रार मनसेने केली आहे. त्यामुळे कॉंग्रेसचे चिन्ह बदलावं किंवा पोलीस दलाच्या बोधचिन्हातील पंजा काढून टाकावा अशी मागणी त्यांनी केली आहे. आधीच राज्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या चिन्हांचा वाद न्यायालयात पोहोचला असताना आता कॉंग्रेसच्या चिन्हावरही तक्रार करण्यात आली आहे. यावर आता निवडणूक आयोग यावर काय कारवाई करतोय हे पाहावं लागेल.




### कॉंग्रेसच्या चिन्हाचा इतिहास

कॉंग्रेसने १९५१-५२ सालची पहिली निवडणूक ही बैलजोडी या चिन्हावर लढली होती. ग्रामीण भागातील लोक आणि शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेऊन हे चिन्ह निवडण्यात आलं होतं. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली लढलेल्या पहिल्या निवडणुकीत कॉंग्रेसचा मोठं बहुमत प्राप्त झालं. पंडित नेहरू आणि नंतर लाल बहादूर शास्त्रींच्या निधनानंतर इंदिरा गांधी या पंतप्रधान बनल्या. १९६७ सालच्या निवडणुकीनंतर कॉंग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजी सुरू झाली. त्यानंतर कॉंग्रेसमध्ये फूट पडली आणि कामराज, मोरारजी देसाईंच्या नेतृत्वाखाली मूळ कॉंग्रेस आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली एक कॉंग्रेस असे दोन गट बनले. त्यावेळी मूळ चिन्ह असलेली बैलजोडी हे मोरारजी देसाईंच्या कॉंग्रेसला देण्यात आलं आणि इंदिरा गांधींना गाय-बछडा हे चिन्ह मिळालं. नंतरच्या काळात १९७७ मध्ये कॉंग्रेसमध्ये आणखी एक फूट पडली. त्यावेळी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस (आय) ची स्थापना करण्यात आली आणि त्याला हात हे चिन्ह मिळालं. १९७७ च्या निवडणूक जबरदस्त हार झालेल्या कॉंग्रेसचा १९८० साली मात्र पुन्हा विजय झाला. त्यामुळे हात हे चिन्ह कायम ठेवण्याचा निर्णय इंदिरा गांधी यांनी घेतला. तेव्हापासून कॉंग्रेसचे हात हेच चिन्ह कायम राहिलं आहे.

## आढळराव-कोल्हे पुन्हा भेट, दोघे एकमेकांच्या पाया पडले



**राज्यातील विविध लोकसभा मतदारसंघांच्या निवडणुकीत विरोधी पक्षांचे उमेदवार आमने सामने येत नसल्याचं चित्र आहे. काही मतदारसंघात विजयासाठी सर्व प्रकारच्या मार्गांचा वापर केला जात असताना शिरुर लोकसभा मतदारसंघात वेगळं चित्र पाहायला मिळतंय. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार अमोल कोल्हे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील पुन्हा आमने सामने आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अमोल कोल्हे यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलं. यावेळी दोन्ही नेते अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्तानं एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. यावेळी अमोल कोल्हे हे शिवाजीराव आढळराव यांच्या पाया पडले. यानंतर शिवाजीराव आढळराव हे देखील अमोल कोल्हे यांच्या पाया पडले.**

### अमोल कोल्हे शिवाजीराव आढळराव एकत्र कसे आले?

पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुणे, शिरुर, मावळ, बारामती या मतदारसंघांतील उमेदवारांच्या प्रचारासाठी प्रचार सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेच्या पूर्वी शिवाजी आढळराव आणि अमोल कोल्हेंची पुन्हा एकदा भेट घडली. यावेळी आधी कोल्हेनी आढळरावांचे मग आढळरावांनी ही कोल्हेंचे पाय धरले. खेड विधानसभेत अखंड हरिनाम सप्ताहाला दोघे एकाचवेळी पोहचले. यावेळी हा प्रसंग घडला. खासदार अमोल कोल्हे यांनी ज्येष्ठत्व म्हणून पाय धरले असली तरी आढळरावांनी पाय धरण्यामागे त्यांना कोल्हेचा आलेला पूर्वानुभव तर नसेल ना? अशी चर्चा यानिमित्ताने रंगलेली आहे.

### अमोल कोल्हेंचं शिवाजीराव आढळराव यांच्यासमोर दमदार भाषण

खासदार अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव यांच्या समोरचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याची आठवण करून दिली. २०१४ मध्ये गॅसचे दर चारशे रुपये होतं, त्या गॅसला नमस्कार करून मतदानाला जा असं मोदी म्हणाले होते. आता तर गॅसचे दर अकराशे बाराशे रुपये झालेत. मग आता तीन-वेळा नमस्कार घालून मतदानाला जा. असं म्हणत मोदींच्या जुन्या वक्तव्याची आठवण पुण्यातील सभेदिवशीच कोल्हे यांनी लोकांना आढळरावांसमोर करून दिली.


शेतकऱ्यांनी मतदानाला जाताना दिल्लीच्या सीमेवर जीव गमावणाऱ्या शेतकऱ्यांचं स्मरण करावं, ज्यांच्या मुलानं शेतकऱ्यांच्या अंगावार गाड्या घातल्या त्यांचे वडील मोदींच्या मंत्रिमंडळात होते, हे विसरू नका, असं अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या कार्यक्रमात एकत्र आले होते. त्यावेळी अमोल कोल्हे शिवाजीराव आढळराव यांच्या पाया पडले होते.

## घोषणा ४०० पारची आणि चर्चा करतात कॉंग्रेसच्या जाहीरनाम्याची

### पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मोदींचा आत्मविश्वास ढळला

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेच्या प्रचारात ४०० पारचा नारा दिला होता. मात्र, जाहीर सभांमधून कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यांची चर्चा करत असल्याची खोचक टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पीएम मोदींवर केली. वाईमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत बोलताना पृथ्वीराज चव्हाण यांनी मोदींवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कारकीर्दीचा १० वर्षाचा आढावा सादर करायला हवा होता. मात्र, एकही आश्वासन पूर्ण केलं नाही. मोदी यांनी ४०० पारची घोषणा दिली आणि कॉंग्रेस च्या जाहीरनाम्याची चर्चा करत आहेत. मोदी यांचा आत्मविश्वास ढळला असल्याची टीका त्यांनी केली.**

ते पुढे म्हणाले की, या सभेची उपस्थिती पहिल्यास निवडणुकीचा निकाल काय लागणार? याबद्दल कुणाच्या मनात शंका असायचं कारण नाही. सभेला माणसं मिळत नाहीत, पैसे देऊन माणसे गोळा करावी लागत असल्याची टीका चव्हाण यांनी केली. देशात आज नोकऱ्या नाहीत, नरेंद्र मोदींनी अर्थ व्यवस्थेचं वाटोळं करून टाकलं असल्याची टीका त्यांनी केली. दरम्यान, या सभेत बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले की, गुजरातमध्ये मोदी मुख्यमंत्री असताना एका भगिनीच्या घरात हल्ला झाला. अत्याचार केले, सासऱ्यांची हत्या केली. यामध्ये ज्यांना ११ वर्षांची शिक्षा झाली. मात्र, मोदी सत्तेवर आल्यानंतर त्यांची सुटका केली आणि गळ्यात हार घालत सन्मान केला. स्त्रियांची अब्रू घेणाऱ्यांचा सन्मान करण्याचं धोरण जे स्वीकारतात ते देशाचे हितचिंतक असू शकत नाही. त्यांना मत मागायचा अधिकार नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी हल्लाबोल केला.



हे भ्रष्टाचार घालवू म्हणतात. मात्र, भ्रष्टाचार घालवायचा ज्यांनी प्रयत्न केले त्यांच्या कारवाई केली गेली. सत्तेचा गैरवापर कसा करतात याची उदाहरणं दिली. जे देशाच्या हिताचं नाही त्यांना धडा शिकवायची ताकद सातारकरांमध्ये आहे. शशिकांत शिंदे हे कष्ठकरी कुटूंबातील आज लोकसभेला उमेदवार दिला असून तुमच्या पाठिंब्यावर यशस्वी होतील, असेही त्यांनी सांगितले. इंग्रजांच्या काळात सातारकर घाबरला नाही. मात्र किरकोळ लोकांसमोर सुद्धा घाबरणार नसल्याचे ते म्हणाले. दरम्यान, या सभेत बोलताना महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे म्हणाले की, आजची सभा फार ऐतिहासिक आहे. साहेब आपले धन्यवाद मानतो आपण मला उमेदवारी जाहीर केली. त्यांनी सांगितले की, वाईचा मतदारसंघ उद्याचा खासदार ठरवणार आहे. आज सातारा जिल्ह्यात २ सभा होत आहेत. एक कराडला होती आणि एक वाईला होती. मला समोर उमेदवार भेटल्यामुळे माझी अर्धी निवडणूक सोपी झाल्याचे ते म्हणाले.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## सॉल्टच्या अर्धशतकाने कोलकाताचा शानदार विजय

**कोलकाता** : आयपीएल २०२४ मधील ४७ वा सामना कोलकाताच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर पार पडला. या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सवर ७ विकेट्सनी विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने ९ गडी गमावून १५३ धावा केल्या होत्या. मात्र, प्रत्युत्तरात कोलकाताना फिल सॉल्टच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर १६.३ षटकांत ३ गडी गमावून १५७



धावा करत एकतर्फी विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सच्या १५४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कोलकाता नाईट रायडर्स संघाने सहज विजय मिळवला. कोलकाता संघासाठी फिल सॉल्ट आणि सुनील नरेनने पहिल्या विकेट्ससाठी ७९ धावांची भागीदारी केली. फिल सॉल्टने स्फोटक कामगिरी केली. सॉल्टने ३३ चेंडूंचा सामना करत ६८ धावा केल्या. त्याने ७ चौकार आणि ५ षटकार मारले. यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने नाबाद ३३ धावा केल्या. व्यंकटेश अय्यरने नाबाद २६ धावा केल्या. दिल्लीसाठी अक्षर पटेलने गोलंदाजीत कमाल केली.



### जरांगे-पाटलांच्या सत्काराला गेलेल्या प्रणिती शिंदेंवर नामुष्की

# बुमरँग उलटले! मराठा समाजाचा रोष!

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर लोकसभेच्या युद्धभूमीवर अत्यंत अटीतटीच्या चाललेल्या निर्णायक लढतीत महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते हे मतांचं दान आपल्या झोळीत घेण्यासाठी जंग जंग पछडताहेत. कडव्या झुंजीत एक एक मत या दोघांना विजयाचा अटकेपार झेंडा रोवण्याठी महत्वाचं आहे. मतदान वळविण्याच्या टप्यावर कोणा समाजाची नाराजी नको, याबद्दल हे उमेदवार जशी काळजी आणि दक्षता घेताहेत. तसं समाजला चुचकारत त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न करताहेत. दरम्यान, उमेदवार प्रणिती शिंदे यांनी आज सोमवारी मराठा समाजाची सहानभूती मिळवण्याचा घाट घातला. मात्र त्यांच्या त्याचं बुमरँग त्यांच्यावर उलटलं. त्यांना आल्या पाऊली परतावं लागलं. मोठ्या नामुष्कीला सामोरे जावं लागलं. मराठा समाजाचा रोष त्यांना घ्यावा लागला.**

त्याचं झालं असं की, मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील हे सोलापूर मार्गे बेळगावच्या दिशेने निघाले होते. शहरातील मरिआई चौकात सकल मराठा समाज बांधवांच्यावतीनं त्यांचं इथं स्वागत करण्यात येणार होतं. त्यासाठी बांधवदेखील मोठ्या संख्येनं इथं जमले होते. दरम्यान, महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी ही गोष्ट समजल्यानंतर प्रचाराचा पुढचा टप्पा अर्ध्यावर ठेऊन मनोज जरांगे-पाटील यांच्या स्वागतासाठी त्यांनी आपला मोर्चा मरिआई चौकात वळवला.

जरांगे-पाटील हे जुना तुळजापूर नाका येथे आल्यावर त्यांना मरिआई चौकात काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे या सत्कारासाठी थांबल्याची आणि त्यांना सकल मराठा समाजातील काही लोकांनीच सत्कारला येण्यास सांगितल्याची माहिती मिळाली. यावर जरांगे-पाटील यांनी आ. प्रणिती शिंदेच नव्हे, तर कोणत्याच राजकीय नेत्यांचा सत्कार स्वीकारणार नसल्याची भूमिका घेतली. जोपर्यंत मरिआई चौकातून आ. प्रणिती शिंदे जाणार नाहीत तोपर्यंत आपण गाडीतून उतरणार नाही अशी भूमिका जरांगे-पाटील यांनी घेतली.

त्यावेळी जरांगे पाटलांसोबत गाडीत बसलेले मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राम जाधव यांनी माईक वरून आ. शिंदे यांना तेथून जाण्यास सांगितले. त्याच दरम्यान बराच गोंधळ झाला. माजी नगरसेवक विनोद भोसले आणि राम जाधव यांच्यात तु... तु... मैं... मैं... झाली. बराचवेळ झालेला गोंधळ आणि मराठा समाजाचा आक्रोश पाहून आ. शिंदे यांनी तेथून काढता पाय घेतला. या दरम्यान प्रणिती शिंदे यांचा सत्कार जरांगे-पाटील यांनी स्विकारला नाही.







### तेव्हा विरोध...आता सत्कार का?

लोकसभा निवडणुकीत कोणाला मतदान करायचे हे अधिकार समाजाला दिले असताना मतांचे राजकारण करण्यासाठी आ. प्रणिती शिंदे हे सोलापुरात जरांगे-पाटील यांचा सत्कार करण्यासाठी आल्या होत्या. मात्र जरांगे-पाटील यांनी कोणाचा सत्कार स्वीकारणार नसल्याचे सांगितल्याचे मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राम जाधव आणि रवी मोहिते यांनी सांगितले. ज्यावेळी आरक्षणाबाबत आम्ही आ. शिंदे यांच्या घरावर मोर्चा काढल्यावर तुम्ही आमच्या घरी का आला, असे त्यांनी विचारले होते, तर ते आता जरांगे पाटलांच्या सत्कारासाठी त्या का आल्या, असा सवालही जाधव यांनी उपस्थित केला.

### प्रणितींची बाजू घेतल्यानं भोसलेंवर खवळले मराठे

माजी नगरसेवक विनोद भोसले हे आमदार प्रणिती शिंदे यांचे अत्यंत निकटवर्तीय आहेत. त्यांच्या प्रचारात भोसले हे त्यांच्यासमवेत आहेत. मरिआई चौकात जो आज राडा झाला, त्यावेळीदेखील विनोद भोसले हे प्रणिती शिंदे यांच्यासमवेत आले होते. यावेळी मनोज जरांगे पाटील यांचा सत्कार प्रणिती शिंदेंच्या हस्ते होऊ द्या, असा आग्रह भोसले यांचा होता. तथापि, हा आग्रह मोडित काढण्याचा प्रकार राम जाधव आणि रवी मोहिते यांच्यासह उपस्थित मराठा बांधवांनी काढला. यावेळी विनोद भोसले आणि राम जाधव यांच्यात बाचाबाजी झाली. 'तु काय समाजाचा मालक आहे का?' या शब्दात भोसले यांनी जाधव यांना टोकण्याचा प्रकार केला. यादरम्यान शाब्दीक वाद वाढला. प्रणिती शिंदे यांची बाजू घेत राम जाधव यांच्याशी भोसले बोलत होते अशी चर्चा होती. पक्षाऐवजी , उमेदवाराऐवजी मराठा समाजाची बाजू घ्या, असे भोसले यांना यावेळी मराठा बांधव सांगत होते.

### प्रणितींना माऊली पवारांनी सत्कारासाठी आणल्याचा संशय

मनोज जरांगे-पाटील यांच्या सोलापुरातील स्वागत आणि सत्काराला उमेदवार प्रणिती शिंदे यांना आणण्यात सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांचाच पुढाकार होता, असं गरजवंत मराठ्यांच्या आरक्षणासाठी लढणाऱ्या सोलापुरातील काही मराठा बांधवानी सांगितलं. दरम्यान, या संदर्भात प्रतिक्रिया घेण्यासाठी माऊली पवार यांना संपर्क साधला असता मी मनोज -जरांगे पाटील यांच्या समवेत आहे, नंतर बोलतो इतकं सांगून पवार यांनी फोन बंद केला.

### मराठा समाजात चुकीचा मेसेज गेला असता : जरांगे-पाटील

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, कोणत्याचा पक्षाचा पर्यायाने उमेदवाराचा सत्कार स्विकारायचा नाही, अशी भूमिका आपण यापूर्वीच घेतली आहे, सत्कार घेतल्यास राज्यातील मराठा समाजामध्ये वेगळा मेसेज जावू शकतो, सोलापुरात प्रणिती शिंदे यांचा सत्कार स्विकारला असता तर वेगळा मेसेज जाईल म्हणून तो घेतला नाही असं खुद्द मनोज जरांगे -पाटील यांनी सांगितलं. सत्कार घेतल्यास संबंधित उमेदवारास मराठा समाजाचा पाठिंबा आहे, असा अर्थ काढला जावू शकतो, असंही ते म्हणाले.

## फडणवीस-पाटलांमध्ये चर्चेची एक्स्प्रेस दौडली; साट्यालोट्याची भूमिका दोघांना आवडली

सोलापूर/प्रतिनिधी

श्री विठ्ठल साखर कारखान्यावरील जप्तीच्या कारवाईनंतर राजकीय घडामोडींना आता चांगलाच वेग आला आहे. आज सोमवारी कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये सोलापुरातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये चर्चा झाली. श्री विठ्ठल परिवारानं लोकसभेला मदत करायची अन् त्या बदल्यात विठ्ठल कारखान्यास सत्ताधारी भाजपनं मदत करायची अशा साट्यालोट्याच्या चर्चेची दोघांमध्ये एक्स्प्रेस दौडली. साट्यालोट्याची भूमिकेवर उभतांमध्ये एकमत झाल्याचं समोर आलं.

दरम्यान, कारखान्यापुढील अडचणी दूर करुन शेतकरी सभासदांचं हित लक्षात घेता तडजोड करण्यास आपण तयार झालो आहेत, अशी भूमिका अभिजित पाटील यांनी जाहीर केली. यावरुन विठ्ठल परिवार हा लोकसभा निवडणुकीला भाजपसोबत येईल, यावर आता शिक्कामोर्तब होऊ शकतं. कारखान्यासाठी मी काही करायला तयार आहे, या पाटील यांच्या भूमिकेतच हा अर्थ दडलेला आहे. राज्य सहकारी बँकेने केलेल्या कारवाईमुळे आर्थिक कचाट्यात अडकलेले विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी सोलापूरमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. विठ्ठल कारखान्याला मदत करण्याबाबत फडणवीस हे सकारात्मक असल्याचे दिसून आले. तसेच, तुम्ही आम्हाला मदत करा, आम्ही तुम्हाला मदत करू, असा शब्द देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे,' अशी माहिती अभिजित पाटील यांनी फडणवीसांच्या



भेटीनंतर दिली.

राज्य सहकारी बँकेने ४३० कोटी रुपयांच्या थकीत प्रकरणात विठ्ठल सहकारी साखर काखान्यावर जप्तीची कारवाई केली आहे. तीन गोदामेही सील केली आहेत. त्यामुळे अभिजित पाटील यांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी पाटील यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्या भेटीनंतर अभिजित पाटील हे बोलत होते. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर झालेल्या जप्तीच्या कारवाईबाबतचा विषय आम्ही देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घातला आहे.


आमचं म्हणणं त्यांनी ऐकून घेतलं आहे. शेतकऱ्यांची संस्था वाचविण्याची विनंती आम्ही फडणवीस यांना केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी विठ्ठल कारखान्याच्या मदतीबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. कारखान्यासाठी मदत करण्याचा त्यांनी शब्द दिला आहे आणि ते आम्हाला मदत करतील, अशी अपेक्षा आहे, असेही अभिजित पाटील यांनी स्पष्ट केले.

# एक अकेला सबसे भारी; आजुबाजुला सारे भ्रष्टाचारी

### उध्दव ठाकरे यांची नरेंद्र मोदी यांच्यावर कडवट टीका

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



एकाच दिवशी दोन्ही सभेला जायची काय गरज होती? आता हे कोण करणार?

कल्याण

779-33-580

मुंबई

245-11-236

सोलापूर/प्रतिनिधी

**मोदींना आमची कडवट हिंदुत्ववादी शिवसेना नको आहे. रत्नागिरीत मी बोललो की २०१४ आणि २०१९ मध्ये मोदींबाबत आम्हाला अभिमान होता. एक अकेला सब पे भारी. आजूबाजूला सगळे भ्रष्टाचारी आहेत. कुठून ही अवदसा तुम्हाला सुचली माहीत नाही. यांना आपली शिवसेना नको आहे. यांना ही नकली शिवसेना वाटते आहे.**

सोलापूरमध्ये उद्धव ठाकरेंनी प्रणिती शिंदेंच्या प्रचारार्थ सभा घेतली. या सभेत उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा भाजपावर टोकाची टीका केली आहे. घरी गेल्यावर रविश कुमार म्हणून पत्रकार आहेत. त्यांनी व्हिडीओ पोस्ट केला आहे. प्रज्वल रेवण्णांचा उल्लेख आहे. त्याचे पॉर्न व्हिडीओ बाहेर आले आहेत. मोदी स्टेजवरुन सांगत आहेत त्याला मत दिलं की माझे हात बळकट होतील. असे लोक तुम्हाला पाहिजेत? कळकट हात बळकट करतील? अटलजींचा आत्मा रडत असेल की कुठल्या नाकर्त्यांच्या हाती आपण पक्ष देऊन टाकला. ही घराणेशाही त्यांना चालते. सेक्स स्कँडल करणाऱ्यांची घराणेशाही चालते पण शिवसेना प्रमुखांची घराणेशाही चालत नाही. आमची घराणेशाही जनता ठरवेल. मला माझ्या आई वडिलांचा अभिमान आहे. मी माझ्या सात पिढ्यांचा इतिहास मांडतो तुम्ही तुमच्या सात पिढ्यांचा इतिहास सांगा जनतेला ठरवू देत. असं आव्हानही दिलं आहे.

नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांनी ठाकरी शैलीत टीका केली आहे. सुशीलकुमार शिंदे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यात चांगली मैत्री होती. मात्र त्यांनी मैत्री आणि राजकारण वेगळं ठेवलं असे ते म्हणाले.

हल्ली कुणाला मित्र म्हणायचं म्हणजे पाठ सांभाळावी लागते. कारण हल्लींचे मित्र हे पाठींवर वार करणारे आहेत. आजच तुमच्याकडे भाकड जनता पक्षाचे नेते येऊन गेले. लोकांच्या कोपराला गुळ लावण्याचं काम जोरात सुरु आहे. कोपराला गूळ लागला कि धड चाटताही येत नाही आणि काढताही येत नाही. असा टोला लगावला.

आम्हाला नकली सेना म्हटल्यावर मी काही सोडतो का? मी उत्तर देणारच. उद्या मोदी धाराशिवला येत आहेत. एकतर जाहीर मागणी मी करतो. समुद्राच्या तळाशी जाऊन द्वारकेचं नाटक केलं होतं. तर माझ्या भवानी मातेच्या मंदिरात दर्शन घेऊन या. मोदीजी तुम्ही धाराशिवला येत आहातच तर भवानीमातेचं दर्शन घ्या, तुमच्या भाषणाची सुरुवात तरी तशी करा. तुळजाभवानीचे आशीर्वाद घेऊन वगैरे म्हणा. तसं बोलला नाहीत तर तुमच्या मनात भवानीमातेबाबत आकस आहे असं समजेल. निवडणूक आयोग या तुमच्या घरगड्याला सांगा की भवानी शब्दाचा आक्षेप काढ. गुन्हा दाखल होणार असेल तर उद्धव ठाकरेंसह नरेंद्र मोदींवरही गुन्हा दाखल झाला पाहिजे.

यावेळी प्रताप चव्हाण, विष्णू कारमपुरी, भारतकाका जाधव, तेलंगणा काँग्रेसचे नेते प्रेमलाल लोढा, यु. एन बेरीया अस्मिता गायकवाड, अतुल भूवर, प्रा. अशोक निंबर्गीकर, नरसय्या आडम मास्तर आणि सशीलकुमार शिंदे यांचे भाषण झाले.





### फडणवीस चिराट झाले...

टरबूज वगैरे जाऊद्या.. टरबुजाचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. टरबूज उन्हाळ्यात कामी तरी येतं. हे दुष्काळात तेरावा महिना आहे. हे टरबूज नाहीच दिवाळीत चिरडता ते चिराट झालेत. आले तेव्हा टरबूज होते आता पाव उपमुख्यमंत्री म्हणजेच चिराट झाले आहेत. असं म्हणत उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना खडे बोल सुनावले.



### मशालीची धग तुमचं कमळ कोमेजून टाकणार

आज या मशाली पेटल्या आहेत. कालपर्यंत आमचं प्रेम अनुभवलं आता मशालीची धग काय ते बघा. मशालीच्या धगीमध्ये तुमचं कमळ कसं कोमेजतं ते बघा. तुम्ही कोण आम्हाला प्रमाणपत्र देणारे? शिवसेनेचा जन्म झाला तेव्हा तुम्ही कुठे होतात? तुम्ही कुठेतरी हिमालयात किंवा कुठेतरी रेल्वे स्टेशनवर असाल. शिवसेना बरोबर होती त्यामुळे त्या तख्तावर बसला होतात आता त्या तख्तापर्यंत आम्ही तुम्हाला पोहचू देणार नाही. तुमच्या भाजपाचा भाकड आणि भेकड जनता पक्ष झाला आहे. पैसे देऊन माणसं आणावी लागत आहेत.

# अद्दल घडायलाच हवी

लोकप्रतिनिधी हे नम्र असायला हवेत. जनतेच्या प्रति त्यांच्यात त्याग व नि:स्वार्थपणा असायला हवा. सार्वजनिक जीवनातले त्यांचे चारित्र्य स्वच्छ असले पाहिजे. 'लोकसेवा हीच ईशसेवा' हे ब्रीद त्यांनी जोपासायला हवे. लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींसाठी लोकशाहीत ही मार्गदर्शक तत्त्वे सांगितली गेली आहेत. आज राजकारणात इतके चिखल झाले आहे की, ही सारी तत्त्वे त्यात अडकून गेली आहेत. बोटावर मोजण्याइतपत आज चारित्र्यवान लोकप्रतिनिधी बघायला मिळतील. बहुतांशी लोक लांडीलबाडी करणारेच. पैसा खाणारेच. निवडून आल्यानंतर लोकांकडे पाठ फिरवणारेच. असेच लोकप्रतिनिधी आपल्याला सर्वत्र सापडतील. पक्ष प्रमुखच याकडे कानाडोळा करत असतात. त्यामुळे राजकिय पक्षांचे शुद्धीकरण होणारच कसे. एकमात्र भारतीय जनता पार्टीने यावेळेस भाजपातील निष्क्रिय आणि ऐतखाऊ लोकप्रतिनिधींसाठी कडक पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे. जनता, कार्यकर्ते यांच्याशी किंवा लोकप्रतिनिधी या नात्याने केलेले अयोग्य वर्तन आणि पुरेसा जनसंपर्क नसणे, हा उन्मत्तपणा मुंबईतील भाजपाच्या तीनही खासदारांना भोवला आहे. लोकप्रतिनिधी किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांकडून आर्थिक गैर व्यवहार किंवा अन्य चुकीच्या गोष्टी होत असल्याच्या तक्रारी आल्यास त्याही खपवून घेतल्या जाणार नाहीत, असा सूचक इशाराच पक्षश्रेष्ठींनी दिला आहे. लोकसभेसाठी दोन वेळा निवडून आलेल्या खासदारांना पुन्हा उमेदवारी देताना त्यांची कामगिरी, त्यांच्या संदर्भातील कार्यकर्ते व जनतेच्या तक्रारी, पुन्हा निवडून येण्याची खात्री आदींबाबत कठोरपणे विचार करून आणि सर्वेक्षण करून निर्णय घेतला जाईल, असे पक्षश्रेष्ठींनी काही महिन्यांपूर्वीच पक्षांतर्गत बैठकांमध्ये स्पष्ट केले होते. गेल्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये सर्वेक्षणाचा पहिला अहवाल आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी शिवप्रकाश यांनी राज्यातील प्रत्येक खासदाराशी सविस्तर चर्चा केली होती. ज्या खासदारांच्या कामगिरीबद्दल सर्वेक्षणाचे अहवाल नकारात्मक होते, ज्यांच्याविषयी जनता व कार्यकर्त्यांच्या तक्रारी होत्या, त्यांना तंबी देऊन सुधारण्यासाठी डिसेंबरपर्यंतचा कालावधी देण्यात आला होता. भाजपाने दुसऱ्या यादीत महाराष्ट्रातील उमेदवार जाहीर करताना उत्तर मुंबईतून गोपाळ शेट्टी व ईशान्य मुंबईतून मनोज कोटक यांची तिकिटे कापून अनुक्रमे केंद्रीय मंत्री पीयूष गोयल आणि आमदार मिहीर कोटेचा यांना भाजपने उमेदवारी दिली. माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या उमेदवारीस शिवसेनेने २०१९ मध्ये तीव्र विरोध केल्याने कोटक यांना अचानकपणे उमेदवारी मिळाली होती. पण काही आर्थिक व्यवहार, व्यावसायिकांशी संबंध, कार्यकर्त्यांशी वर्तनाबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यांचा पुरेसा जनसंपर्क नव्हता. शेट्टी यांच्यासंदर्भातही अशाच स्वरूपाच्या तक्रारी होत्या. शेट्टी यांच्याकडे अनेक नागरिक विविध प्रश्न घेऊन जात होते व ते मदतही करीत होते. पण काही नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी ते नीट बोलत नसल्याच्या तक्रारी होत्या. महाजन यांचा जनतेशी व कार्यकर्त्यांशी फारसा संपर्क नव्हता. त्या उद्धटपणे वागतात, उपलब्ध होत नाहीत, दूरध्वनीही घेत नाहीत, अशी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची तक्रार होती. प्रदेश पातळीवरील बैठका व कार्यक्रमांसाठीही त्या गैरहजर राहायच्या. त्यांच्या स्वीय साहाय्यकांबाबतही काही तक्रारी होत्या. तीनही खासदार पुन्हा निवडून येण्याची शक्यता किती आहे, याबाबत सर्वेक्षणात आढावा घेण्यात आला होता. शेट्टी हे गेल्या निवडणुकीत चांगल्या मताधिक्याने निवडून आले होते. ते निवडून येण्यात फारशी अडचण नसली तक्रारी आणि गोयल यांना सुरक्षित मतदारसंघ देण्यासाठी शेट्टी यांना उमेदवारी नाकारली गेली. महाजन यांना पक्षांतर्गत विरोधाचा फटका बसला. काही प्रदेश नेत्यांनी त्यांच्या विरोधात पक्षश्रेष्ठींपर्यंत तक्रारी नेल्याने त्यांना उमेदवारी मिळू शकली नाही,असे सांगण्यात येते. लोकप्रतिनिधींना सरकारकडून सर्वप्रकारच्या सुविधा मिळतात. गलेलठ्ठ मानधनही असते. त्यातून उदरनिर्वाह भागू शकतो परंतु पुढच्या सत्तेसाठी संपत्ती गोळा करण्याचा नाद लोकप्रतिनिधींना लागला आहे. एक-दोन वेळा खासदारकी मिळाली असली, तरी तक्रारी आल्यास आणि पुरेसा जनसंपर्क नसल्यास तिकिट कापले जाऊ शकते, असा सूचक इशारा पक्षश्रेष्ठींकडून दिला गेला हे चांगले झाले, अशी अद्दल घडवली तरच परिवर्तन होऊ शकेल.



राजकीय

# आपण चिखलात का उतरलात?



मा. ॲड. उज्वल निकम,
नमस्कार

आपण भारतीय जनता पक्षातर्फे मुंबईमध्य या लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहात असे समजले. यासाठी आपण भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेला आहे. या निमित्ताने समाज माध्यमातून प्रसारित झालेले आपले मनोगत वाचण्यात आले. पुरावा म्हणून हे मनोगत खरे आहे काय अशी शंका आमच्या मनात आलेली आहे. कारण त्या खाली आपले नाव नाही, आपला संपर्क क्रमांक नाही, स्वाक्षरी अपेक्षित नसली तरी ती असावयास हवी होती. त्यातील भाषा आपली असावी असे सकृत दर्शनी वाटत नाही. प्राथमिक पुरावा म्हणून त्यावर विश्वास ठेवावा का? अशीही काहीशी शंका येत आहे. ही झाली विचाराची एक बाजू. असो.

सुशिक्षितांनी राजकिय व्यवस्थेत उतरायला हवे हा अनेक दशकांचा विचार आहे. या विचारास आमची तत्त्वत: मान्यता आहे. पण मागील पाच पंचवीस वर्षाचा राजकिय इतिहासाचा अभ्यास केला, तर सुशिक्षित वापरला जातो अशी काहीसे लक्षात येत आहे. उदाहरणच द्यायची झाली तर सुरेश प्रभू, किरीट सोमय्या, प्रविण सिंग परदेशी, यांची नावे देता येतील. याबरोबरच आपली माझी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचेही नाव या निमित्ताने घेतले जाते हे आपण विचारात घ्यायला हवे. याशिवाय ही अनेक उदाहरणे आहेत. सगळीच नमूद करण्याची आवश्यकता नसल्याने येथे दिलेली नाही.

गेल्या ७५ वर्षाच्या लोकशाहीच्या इतिहासात, राजकिय पक्ष आणि लोकप्रतिनिधी यांच्या संदर्भातले जे कायदे आहेत, ते अपूर्ण आहेत या आमच्या मताशी आपण सहमत व्हाल अशी अपेक्षा आहे. अर्थात याबाबतची आपले विचार स्वतंत्र असू शकतात, याची मला कल्पना आहे. राजकिय पक्ष आणि लोकप्रतिनिधी संबंधित कायद्यांमध्ये बदल करावयास राजकिय पक्ष कधींच तयार होत नाहीत. त्यात कोणी लुडबुड करत असेल तर त्याला सर्व पक्षातील लोक एकत्र येऊन विरोध करतात. महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या फुटीच्या निमित्ताने जे न्यायालयीन लढे लढले गेले, त्याबाबत आपण वेळोवेळी प्रकट झालेला आहात. कायद्याचे अर्थ कोणी कसे काढावयाचे हा एक स्वतंत्र विषय आहे. न्याय मिळवण्यात जो उशीर होतो त्यामुळे न्यायालय हे न्याय देण्यासाठी आहेत, अशी सर्वसामान्यांची मानसिकता राहिलेली नाही. निवडणूक आयोग असो अथवा विधानसभेचे अध्यक्ष यांनी या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे, तो सर्वसामान्य जनतेच्या मन:पटलावर अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. तो सर्वसामान्य मतदारांच्या मनाला आवडलेला नाही. राजकारणात नीतीपेक्षा आणि अनीती जास्त सक्रिय आहे. भ्रष्ट आचार, विचार सर्वत्र कार्यरत आहेत.

ज्या भ्रष्टाचाराचा आधार घेत भारतीय जनता पक्षाने सत्ता काबीज केली, ते सर्व प्रमुख भ्रष्टाचारी आपल्या पक्षात भाजपने सहभागी करून घेतलेले आहेत, याची मी आपणास आठवण करून देण्याची आवश्यकता नाही. हे सारे तुरुंगात असतील असे जाहीर विचार भारतीय जनता पक्षाने मांडलेले होते. हे विशेष. आज भ्रष्टाचार आणि त्याविषयक न्यायालयीन लढे कसे निकालात काढले जातात, सांभाळून घेतले जातात, लांबवले जातात आणि त्यातून स्वच्छतेचे प्रमाणपत्र कसे दिले जाते हे सगळे आपल्या नजरेसमोर आहेच.

आपण भारतीय जनता पक्षातर्फे निवडणूक लढविण्यापेक्षा, राजकीय पक्ष, त्यांचे लोकप्रतिनिधी आणि या विषयक कायदे याची सविस्तर माहिती सर्वसामान्य जनतेपुढे मांडली असती, तर ते अधिक योग्य झाले असते. नोटा तरतुदी कशा फसव्या आहेत हे आपण सांगितले असते, तर ते सर्वसामान्य मतदारांच्या हिताचे झाले असते. या कायद्यात काय बदल व्हायला पाहिजेत, राजकिय पक्ष आणि लोकप्रतिनिधी यांना मनासारखे वागता येणार नाही, याबाबतच्या काय तरतुदी कायद्यात असल्या पाहिजेत, याबाबत आपण जर व्यक्त झाला असता तर सर्वसामान्य मतदार म्हणून सगळ्यांनी तुम्हाला डोक्यावर घेतले असते.

एका क्षणात राजकिय पक्ष बदलता येऊ शकतो, याचे आपणास आश्चर्य वाटत नाही का? एखाद्या राजकिय पक्षाच्या चिन्हाखाली निवडून आल्यानंतर त्या राजकिय पक्षाच्या छाताडावर बसून उभे राहता येते, हे आपणास योग्य वाटते काय? ज्या राजकिय पक्षांच्या प्रमुखांच्या स्वाक्षरीने, आपली राजकिय कारकिर्द आकारास आलेली असते, तो प्रमुख क्षणात बदमाश होतो असे म्हणणे आपल्या बुद्धीला पटते काय?

खरे तर निवडणुकीसाठी उमेदवारी देत असताना काही नियमावली असायला हवी आहे. जो राजकिय पक्ष आपला उमेदवार म्हणून प्रस्तावित करेल, त्या उमेदवाराच्या संदर्भात काही तरतुदी कायद्यात असल्या पाहिजेत. जसे की कमीत कमी तीन ते पाच वर्षे तो राजकिय पक्षाचा सदस्य असल्याशिवाय याची उमेदवारी जाहीर करता येणार नाही. सदर राजकिय पक्षात व सक्रिय असला पाहिजे. एका राजकिय पक्षातून दुसऱ्या राजकिय पक्षात जात असताना, पहिल्या राजकिय पक्षांची निगडित सर्व पदे अगदी लोकप्रतिनिधी सहीत राजीनामा देऊन त्याने सोडून दिली पाहिजेत. अन्य राजकिय पक्षातून आलेल्या व्यक्तीला कमीत कमी तीन ते पाच वर्षे उमेदवारी देता येणार नाही. अशा तरतुदी राजकिय पक्षांच्या घटनेत असावयास हव्यात. सर्वसामान्य मतदार मतदान करतो ते राजकिय पक्षाकडे बघून हे आम्ही सांगणे योग्य होणार नाही. लोकप्रतिनिधी आणि राजकिय पक्षांच्या सदस्यांना काही आचारसंहिता असावी, याबाबत कायद्यात तरतुदी असावयास हव्या आहेत. काही क्षणा पूर्वी एखाद्या राजकिय पक्षाचा उदो उदो करणारा काही, काही क्षणानंतर त्याच राजकिय पक्षाला शिव्या घालतो, नावे ठेवतो, हे कायद्यातील तरतुदीने बदलायला हवे आहे. ७५ वर्षांचा लोकशाहीचा प्रवास खूप मोठा आहे. या प्रवासात लोकशाही प्रगल्भ झाली पाहिजे. असे न होता ती अधिकाधिक मनस्ताप देणारी होते आहे याबाबत मतदार म्हणून आपण एकदा विचार करून पाहायला हवा आहे. कोणत्याही राजकिय पक्षाचा मतदार असणे आणि त्याचा सदस्य असणे यात फरक आहे, हे आपणास सांगायची आवश्यकता नाही. मतदार म्हणून व्यक्त होण्यास प्रत्येकास अधिकार आहे. आज राजकिय पक्षांच्या सदस्यांनी, व्यक्त होणाऱ्या मतदारांवर वाटेल ते आरोप करावेत, हे समृद्ध लोकशाहीचे प्रतिक नाही.

निकम साहेब आपण अनेक देशद्रोही गुन्हेगारांविरोधात कायद्याची लढाई लढलेले आहात. त्यांना योग्य ती शिक्षा मिळेपर्यंत आपण अपार कष्ट घेतलेले आहेत. आपल्या कार्य कर्तृत्वाबद्दल कोणाच्या मनात शंका नाहीत. राष्ट्रप्रेम हा प्रत्येक नागरिकाच्या विचाराचा पाया असला पाहिजे, याबाबत दुमत असावे असे कारण नाही. पण भारतीय जनता पक्षात गेलो तरच राष्ट्रप्रेम असते, अशी जी एक समजूत करून घेतली गेलेली आहे, ती आम्हास तत्वतः चुकीची वाटते. काँग्रेससारख्या पक्षात राष्ट्रीय विरोधी भूमिका अधिक आहे याबाबत कोणाचे दुमत नाही. याचा अर्थ त्याची मदत घेणारे सगळेच राजकिय पक्ष राष्ट्रद्रोही आहेत, अशी जी भूमिका मांडली जाते ती योग्य नाही. अशा लोकांना निवडणूक लढवताच येऊ नये अशा तरतुदी आपल्याला कायद्यात करता येणार नाहीत का? आज अनेक प्रकारचे आरोप असणारे शिक्षा झालेले लोक निवडणुकीच्या रिंगणात उतरवले जातात हे आपल्या बुद्धीला पटते का? या संदर्भात राजकिय पक्षांना लागू होणारे नियम असावेत असे आपणास वाटत असेलच ना?

सगळेच राजकिय पक्ष एकमेकांशी सोयीनुसार युती-आघाडी करीत असतात. प्रत्येक वेळेस आपला राजकिय लाभ काय होईल आणि सत्तेत कसे सहभागी होता येईल, हे पाहण्याची यामागील विचारांची बैठक असते. कारण सर्वच राजकिय पक्षांच्या लोकप्रतिनिधींना सत्तेत राहून फळे चाखायची आहेत.

आपल्या मनोगतमागील भाषा आपली नाही, हे वाटायचे कारण म्हणजे ती न्यायबुद्धीला धरून लिहिलेली आहे असे दिसून येत नाही. ती सारी राजकिय भाषा आहे. कदाचित भारतीय जनता पक्षाच्या सार्वजनिक प्रसार माध्यमावर कार्यरत असणाऱ्या कोणाच्यातरी सुपीक डोक्यातून ती आलेली आहे असे म्हणावयास जागा आहे. असो. आपल्या संपूर्ण मनोगत अभ्यासल्यावर, त्यावर मनन आणि चिंतन केल्यानंतर, आपण राजकिय चिखलात उतरायला नको होते, असे या देशातील नागरिक म्हणून आमचे विचार आहेत. मोकळे मनाने ते मांडावे वाटले म्हणून मांडलेले आहेत. कोणास आवडतील नाही आवडतील याबाबत आम्ही स्थितप्रज्ञ आहोत. आपणास शुभेच्छा

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

टुडेज् ब्लॉग

# कर्तव्य भावनेला तिलांजली...

हॉटेलवरील कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या अन्न आणि औषध प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकारी कीर्ती देशमुख यांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने २५ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले. त्यांच्या घराची झडती घेतली असता सुमारे ८० लाखांचे सोन्याचे दागिने, साडेतीन लाखांचा हिऱ्यांचा हार यासह साडेतीन लाख रुपये रोख असे घबाड सापडले.


यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने एक आलिशान गाडीही जप्त केली. एका हॉटेल व्यावसायिकाकडील अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी देशमुख यांनी ताब्यात घेतले होते. याप्रकरणी हॉटेल व्यावसायिकावर कोणतीही कारवाई न करण्याचा मोबदल्यात देशमुख यांनी त्याच्याकडे एक लाख रुपयांची लाच मागितली होती. हॉटेल व्यावसायिकाने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार नोंदवून देशमुख यांना पकडून दिले. भ्रष्टाचाराचे कुरण झालेल्या मोजक्या विभागांपैकी एक असलेल्या अन्न आणि औषध विभागातील भ्रष्टाचार म्हणजेच थेट जनतेच्या जीवाशी खेळ. याच विभागातील अधिकारी आपल्या स्वार्थासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना रान मोकळे करून देत असतील तर अशांना कठोरात कठोर शासन होणे अत्यंत आवश्यक आहे. सरकारी अधिकारी आणि भ्रष्टाचार हे समीकरण राज्यासह देशभरात प्रचलित झाले आहे. लाच दिल्याशिवाय सरकार दरबारी जमा केलेली कागदपत्रे, फाईल्स पुढे सरकतच नाहीत याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे.

लाच देणारे देतात म्हणूनच घेणाऱ्यांचे फावते असेही काहीजण म्हणतात. अल्प वेळेत आणि अल्प श्रमात सरकार दरबारी काम करून घ्यायचे असेल तर लाच द्यावीच लागते ही प्रथा आज सरकार दरबारी रूढ झाली आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

जन्म हा अखेरचा

# बिंद्वाकाशस्थल



पहिल्या वर्गात घातलेल्या विद्यार्थ्याला अक्षरओळख देखील नसते. परंतु अभ्यासाने तो हळूहळू अक्षरे शिकतो, शब्द शिकतो, वाक्यरचना शिकतो आणि पुढे शब्दांवर प्रभुत्व गाजवणारा साहित्यिक देखील होतो. अभ्यासात असे सामर्थ्य असते. त्याप्रमाणे प्रयत्न केल्यावर बुद्धीतील जडत्व नाहीसे होऊन ती परमात्म्याला जाणण्याइतकी सूक्ष्म होते. शब्द हे ज्ञानाचे सर्वात सुलभ आणि मोठे साधन आहे.

मनुष्यजीवनातून भाषा वजा केली तर पशुजीवनच होईल. भाषेतच परमात्म्याचे स्वरूप समजावून सांगावे लागते. परंतु जेव्हा 'श्रुती नेति नेति' म्हणते तेव्हा शब्दांचे सामर्थ्यही किती उणे आहे याची जाणीव होते. परब्रह्माचे वर्णन करताना श्रुती सांगते, 'परब्रह्माला पाय नाहीत, परंतु ते जोराने धावत असते. त्याला हात नाहीत, परंतु ते हाताने सर्व घेत असते. त्याला कान नाहीत, परंतु ते सारे काही ऐकत असते. ते कोणाला जाणत नाही आणि त्याला कोणी जाणू शकत नाही. असा महान पुरुष म्हणजे परमात्मा होय.

परब्रह्माचे स्वरूप सांगणे अत्यंत कठीण असले तरीही श्रुतीने ते सांगण्याचा मात्र प्रयत्न केला आहे. परमात्मा शब्दाप्रमाणे जसा सांगता येत नाही तसा तो मनानेही जाणता येत नाही. परमात्मा सर्वतोमुख आहे. अर्थात् तो सर्वांना सन्मुख आहे. तुम्ही जेव्हा दिव्याची ज्योत पेटवता तेव्हा तिचे मुख कुणीकडे असते? इकडे-तिकडे सर्वत्र आपल्या प्रकाशरूपी मुखाने ती स्पर्श करीत असते? त्याप्रमाणे परमात्मा सर्वत्र पाहत असतो. परमात्म्याचे स्वरूप कसे आहे? तर सत्-चित्-आनंद हेच त्याचे रूप आहे, हेच त्याचे लक्षण आहे. तो कालातीत आहे. सर्व कालात आणि कालापलीकडे त्याचे अस्तित्व आहे. कालाच्या संदर्भात महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला एक प्रश्न विचारला आहे. यक्ष विचारतो, का वार्ताः? या प्रपंचाची वार्ता कोणती? बातमी काय?'

युधिष्ठिराने उत्तर दिले, भूतानि कालः पचतीति वार्ताः' काळ सर्व भूतांना शिजवीत आहे. मोहाच्या कढईत सर्व प्राणिमात्रांना घालून शिजवतो आहे. सर्वांना मारीत आहे, हीच प्रपंचाची वार्ता आहे.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# उन्हाळी सुट्टीत पोलीस गस्त वाढविणे गरजेचे

सद्या उन्हाळ्याचे दिवस सुरु आहेत, अनेकांच्या शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षा संपल्या आहेत. परीक्षा संपल्यावर अनेकजण सहकुटुंब गावी जातात तर काही घरातील मंडळी पर्यटनासाठी जात असतात. त्यामुळे अधिकांश शहरातील गृहनिर्माण सोसायट्या, सदनिका महिना-दीड महिना बंदच असतात तर अनेक सदनिका तर दिवसभर अगदी रात्री उशिरापर्यंत बंदच असतात याचाच फायदा उचलत चोर, भामटे पाळत ठेवून घरफोडी करत असतात. त्यामुळे अति महत्वाच्या ठिकाणी पोलीस गस्त वाढविणे गरजेचे आहे तसेच उन्हाळा कालावधीत सोसायटीमधील रहिवाशांनी काय काळजी घ्यावी? या संदर्भात देखील मार्गदर्शन होणे आवश्यक आहे सद्या अनेक ठिकाणी दिवसाढवळ्या चोरीच्या घटना घडल्याचे समोर आल्या आहेत. शहरी भागातील अनेक कुटुंबे मुलांना सुट्टी असल्याने आपल्या गावी, यात्रा, जत्रा, सहल, पर्यटन स्थळे पाहण्यासाठी जात असतात आणि याच संधीचा फायदा घेऊन बाहेरगावी गेलेल्या कुटुंबातील चोरी करुन चोर पसार होतात त्यासाठी पोलीस गस्त वाढवून अशा घटनांना पायबंद घालणे महत्वाचे आहे!

**- राजू जाधव, जि. बेळगाव.**

## साधनसंपत्तीची जपणूक आवश्यक

सिमेंटच्या जंगलात येणारी उष्णतेची लाट अक्षरशः हैराण करीत असून ज्यांच्याकडे एसी आहे त्यांनाच परिस्थिती चांगली आहे. गोरगरिबांना वरती पत्र्याचे छत असेल तर होरपळ म्हणजे काय हे समजते. स्वच्छता संदर्भात जसे यश मिळाले तसे पर्यावरण संदर्भात मिळू शकते सातत्याने प्रबोधन व वृक्षारोपण तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक व संवर्धन याबाबत योजना व उपक्रम असावेत ही अपेक्षा! **- प्र. मु. काळे, नाशिक.**

# नवचैतन्याचा झरा निर्माण करणारे राष्ट्रसंत तुकडोजी

आपल्या सत्कार्याच्या कीर्तीचा सुगंध सबंध जगभर बसून पसरविणारे संत तुकडोजी महाराज. समाजोद्धारातून आपले विचार पोचवत जगाला मानव धर्म शिकवणारे या संताचे कार्य महान असून त्यांनी सद्‌गुणाचा उपदेश, समाज जागृती, राष्ट्रोन्नती, सर्वधर्मसमभाव, उद्योगशीलता अशा एक ना अनेक समाजाविषयी आपल्या प्रवचनाच्या, कीर्तनाच्या, भाषणाच्या माध्यमातून प्रखरतेने समाजापुढे मांडत समाज जागृतीचे महान कार्य केले. लोकशिक्षण, समाजसुधारक, धर्मचिंतक, कवी, शिक्षकतज्ञ म्हणून सबंध भारतभर ज्यांनी आपले कार्य केले. त्यांच्या ग्राम गीतेतील विचार समाजाला आजही मार्गदर्शक, दिशादर्शक ठरते. ज्यांनी त्यांच्या सामाजिक कार्यातून प्रगतीकडे नेण्याच्या मार्ग दाखवला. आपल्या ज्ञानाच्या, कार्याच्या माध्यमातून परिवर्तनवादी समाज घडविण्याचे कार्य केले आहे. सर्वधर्मसमभाव हे या महान संताचे विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. समाज सुशिक्षित, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावा, गावाने देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जे नेहमी प्रयत्नशील राहिले, अंधश्रद्धा नाहीसा व्हावा यासाठी ज्यांनी अविरत प्रयत्न केले, असे एक महान संत ज्यांनी 'ज्ञान सेवा हीच ईश्वर सेवा' आहे हा उपदेश दिला, असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होय. त्यांनी भाषण, कीर्तन, भजनाच्या माध्यमातून राष्ट्र जोडण्याचे, राष्ट्र जागृतीचे महान कार्य केले. अशा या महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची आज जयंती त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन...

अशा या महान राष्ट्रसंतांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील 'यावली' या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी ऊर्फ पांडुरंग इंगळे आईचे नाव मंजुळा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव 'माणिक' असे होते, त्यांचे गुरू अडकोजी महाराज हे त्यांना 'तुकडोजी' या नावाने संबोधत असत म्हणून पुढे त्यांना 'तुकडोजी' हे नाव झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी पशुहत्या, व्यसनमुक्ती, अस्पृश्योद्धार, जातीनिर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला उद्धार, राष्ट्रनिर्माणाचे कार्य केले. त्यांनी ग्रामीण पुनर्निर्माणाचे कार्य केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत पंचक जे ग्रामगीतेचे अध्याय आहेत, ते-सद्धर्म मंथन पंचक, लोक वशीकरण पंचक, ग्रामनिर्माण पंचक, दृष्टीपरिवर्तन पंचक, संस्कार संशोधन पंचक, प्रेम धर्म स्थापन पंचक, देवत्व साधन पंचक, आदर्श जीवन पंचक या पंचकाला दिलेल्या नावावरून 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कल्याणकारी बहुमुखी कार्याचे दर्शन घडते. या भारतात बंधुभाव नित्य वसू दे! दे वरचि असा दे. हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे! मतभेद नसू दे!! नांदोत सुखे गरीब-अमीर एक मतांनी!
मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे! दे वरचि असा दे!!
सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना!



हो सर्व स्थळी मिळुनी समुदाय-प्रार्थना!
उद्योगी तरुण शीलवान येथ असू दे! दे वरचि असा दे!!
जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही!
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी!
खळनिंदका-मनीही सत्य न्याय वसू दे! दे वरचि असा दे!! सौंदर्य रमो घराघरात स्वर्गीयापरी!
ही नष्ट होऊ दे विपत्ती भीती बोहरी
तुकड्यास सदासर्वदा सेवेत वसू दे! दे वरचि असा दे!! हा 'एकीचा' संदेश तुकडोजी महाराजांनी समस्त भारतीयांना दिला आहे. 'सबके लिए खुला है मंदिर यह हमारा' असं म्हणून 'आओ कोई भी पंथी, आओ कोई भी धर्मी, देशी-विदेशीयों को, खुला मंदिर यह हमारा' असा अतिशय पोटतिडकीने त्यांनी कृतिशील संदेश समाजास दिला.

आपल्या 'खंजिरी'च्या नादातून सर्वसामान्यांच्या मनात नवचैतन्य महाराजांनी निर्माण केले. महाराजांनी भजने, गीतांमधून व्यक्त होणारा स्फूर्तिदायी आशय जनमानसाची घडण करण्यात मोलाची भूमिका बजावली. ज्या गावात ते जात असत, तेथील आसपासच्या गावातील लोक गर्दी करत असत. खंजिरी सोबतच इतरही वाद्य महाराज कौशल्यपूर्वक रितीने हाताळत असत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'गुरुकुंज सेवाश्रम' ची स्थापना केली. त्यांनी समाजकार्यात आपले कार्य केले, लोकांना ते मार्गदर्शक ठरले त्यांचे कार्य अतुलनीय आहे. तरुणांचे आधारस्तंभ बनले, युवकांनी नीतिमान व सुसंस्कृत बनावे यासाठी त्यांनी अखंड उपदेश दिला. व्यसनाधीनतेचा त्यांनी तीव्र विरोध केला, युवकांनी व्यायाम करावा यासाठी ते सदैव अग्रही असत. देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृतयुक्त कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजींनी केले. व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध या राष्ट्रसंताने आपल्या लेखनातून केला. स्वातंत्र्य संग्रामात संत तुकडोजी महाराजांनी सहभाग घेऊन खंजिरी भजने, कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. त्यांचा छोडो भारत चळवळीत सहभाग लक्षणीय होता. त्यांनी भजनाद्वारे युवा पिढीमध्ये स्वतंत्र प्रेम जागविले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे 'आते है नाथ हमारे' हे रचलेले गीत पूर्ती ठरले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी राष्ट्रनिर्माणाचे अतुलनीय कार्य केले. आपल्या भजनानी जनलोकांमध्ये चैतन्याचा, राष्ट्रप्रेमाचा झरा निर्माण केला. त्यांच्या दूरदृष्टी विचार समाजाला आज उपयोगी पडत आहेत. त्यांनी भारतीय समाज व्यवस्थेचा अभ्यास करून सर्वसामान्य जनतेला समर्थपणे जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले विचारांचा पुरस्कार केला. या महान राष्ट्रसंतांच्या तत्त्वज्ञानात नवभारत निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे, त्यांच्या विचारातून, साहित्यातून, संस्कारातून सामाजिक सुधारण्याची परिवर्तनवादी तळमळ दिसून येते. या महान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज याच्या जयंतीनिमित्त माझे कोटी कोटी प्रणाम.

**- राहुल मोरे, बीड.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## यंदा २०२२ टी२० वर्ल्डकपमधील कुणाकुणाला डच्चू?

**नवी दिल्ली** : अवघ्या महिनाभरात टी-२० विश्वचषकाच्या थराराला सुरुवात होणार आहे. लवकरच टीम इंडियाची निवड होईल. त्यात २०२२ मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकात भारतीय संघात असलेल्या कोणाकोणाला डच्चू मिळेल, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. २०२२ चा टी२० विश्वचषक ऑस्ट्रेलियामध्ये रंगला होता. यजमान ऑस्ट्रेलियाचं आव्हान सुपर १२ फेरीत संपुष्टात आले. रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाचं २०२२ टी२० विश्वचषकातील आव्हान सेमीफायनलमध्ये संपुष्टात आले. इंग्लंडने भारताचा दहा विकेटने दारुण पराभव करत दिमाखात फायनलमध्ये प्रवेश केला. २०२२ टी२० विश्वचषकात विराट कोहलीनं सर्वाधिक धावा केल्या होत्या. त्यानं चार अर्धशतकं ठोकली होती. सूर्यकुमार यादवने सहा सामन्यात ३ अर्धशतक ठोकली होती. के.एल. राहुल यानं सहा सामन्यात १२८ धावा केल्या होत्या. अर्शदीपसिंगने सर्वाधिक १० विकेट घेतल्या होत्या. दुसऱ्या क्रमांकावर हार्दिक पांड्या होता. पांड्यानं सहा सामन्यात आठ विकेट घेतल्या होत्या. अश्विन आणि मोहम्मद शामी यांनी प्रत्येकी सहा विकेट घेतल्या होत्या. भुवनेश्वर कुमारला चार, अक्षर पटेल ३ यांनी विकेट घेतल्या होत्या.

## राजस्थानचं प्लेऑफमधील स्थान निश्चित

**नवी दिल्ली** : आयपीएल २०२४ च्या प्लेऑफची शर्यत सध्या रोमांचक झाली आहे. शनिवारी दिल्लीनं मुंबईचा पराभव केला, त्यानंतर आरसीबीनं गुजरातचा दारुण पराभव केला, चेन्नईनेही हैदराबादचा पराभव करत टॉप ४ मध्ये स्थान पटकावलं. त्यामुळे गुणतालिकेत मोठी खळबळ झाली. प्लेऑफची समिकरणेही बदलली आहे. राजस्थान रॉयल्सने नऊ सामन्यात आठ विजय मिळवत प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित केले आहे. शनिवारी दिल्लीनं मुंबईचा पराभव करत प्लेऑफमधील स्पर्धा अधिक रंजक केली, तर आरसीबीने गुजरातचा पराभव करत आपलं प्लेऑफमधील आव्हान जिवंत ठेवलेय. सध्या प्लेऑफची शर्यत अतिशय रोमांचक झाली आहे. पाहूयात कोणत्या चार संघांनी प्लेऑफसाठी आपली दावेदारी मजबूत केली. आता या चार संघातील रोमांचक लढतींकडे प्रेक्षकांचे लक्ष असेल.

# टँकरची यंत्रणा अधिकाऱ्यांकडे की ठेकेदारांकडे?

## ठेकेदार ठरवतील त्या क्षमतेचा टँकर सुरू ; वाड्या वस्त्यांवर टँकर पोहोचत नाहीत

**सांगोला/प्रतिनिधी**

ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर टँकर प्रस्ताव मंजूर केले जातात. परंतु हा टँकर किती लिटर क्षमतेचा द्यायचा याबाबत ठेकेदार निर्णय घेत आहेत. त्यामुळे अनेक वाड्या वस्त्यांवर आजही पाणी टंचाई आहे. परिणामी टँकरची यंत्रणा अधिकाऱ्यांकडे की ठेकेदारांकडे? अशी विचारणा होत आहे.

ठेकेदारांकडे उपलब्ध असलेले जास्त क्षमतेचे टँकर सुरू केले जातात. रस्त्याअभावी हे टँकर वाड्या-वस्त्यांवर पोहोचत नाहीत. जास्त क्षमतेच्या टँकरसंदर्भात नागरिकांच्या तक्रारी येत असताना ठेकेदारांची मनधरणी करण्याच्या नादात तालुक्यातील वाड्या वस्त्या आज ही टंचाईच्या झळा सोसत आहेत. यामुळे ज्या वस्तीसाठी टँकरची मागणी केली ती वस्ती पाण्यापासून वंचित राहत आहे. तालुक्याच्या टंचाईवरील यंत्रणा प्रशासकीय अधिकारी नव्हे तर टँकरचे ठेकेदार यंत्रणा चालवीत आहेत का असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

सांगोला तालुक्यात पाणीटंचाईचा प्रश्न भीषण होत आहे. उष्णतेचा पारा वाढल्यामुळे विहीर, बोअर कोरडे ठणठणीत पडले आहेत. पाण्याचा सोर्स उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील नागरिकांची तहान शिरभावी पाणीपुरवठा योजनेवर आणि सध्या सुरू असलेल्या टँकरवर अवलंबून आहे. तालुक्यातील २५ गावात ३३ टँकर सुरू आहेत. यामध्ये गावपातळीवर पाणीपुरवठा करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. तालुक्यातील तीन गावातून टँकर बदलून मिळावा या संदर्भात मागणी केली आहे.

### ग्रामपंचायतींच्या मागणीबाबत प्रशासनाला गांभीर्य नाही


ग्रामपंचायतींच्या वतीने केलेल्या मागणीची प्रशासन गांभीर्याने घेत नाही. प्रशासनाचा जास्त क्षमतेचा टँकर देण्याचा अट्टाहास कशासाठी, वाड्या वस्त्यावर टँकर पोहोचत नाहीत एवढे मोठे जास्त क्षमतेचे टँकर देऊन प्रशासन नेमकं कोणतं हीच साध्य करतंय याबाबत एक ना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. वरिष्ठ अधिकारी याबाबत कोणता निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. तसेच यावर लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालावे अशी मागणी जोर धरत आहे.

# कुर्डूवाडीत उन्हाच्या तीव्रतेमुळे रस्ते ओस पडले

**कुर्डूवाडी/प्रतिनिधी**

कुर्डुवाडी शहरातील तापमानात सतत वाढ होत आहे. रविवारी (दि.२८) दुपारी १ वाजता महात्मा गांधी चौक येथे ४१ अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदले गेले आहे. शहरातील मुख्य बाजार पेठेत त्यामुळे शुकशुकाट दिसून आला. अनेक व्यापारी वर्गाने दुपारी दुकाने बंद करणे पसंत केले. शहरातील रस्ते निर्मनुष्य दिसून आले. मात्र, कडक उन्हातही कुर्डुवाडी बसस्थानकावर मात्र प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत होती.

कुर्डुवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती भागात नेहमी असणारी वर्दळ दिसून आली नाही. त्यातच रविवार असल्याने अनेकांनी सुट्टी घेतली होती. याउलट रसवंतीगृह, थंड पेय केंद्र येथे मोठ्या कुर्डुवाडी उन्हाच्या तीव्रतेने नेहमी वर्दळ असलेली मुख्य बाजारपेठ निर्मनुष्य दिसत होती.



कडाक्याच्या उन्हातही बस स्थानकावर मात्र प्रवाशांची गर्दी दिसून आली. शहरातील महात्मा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालोद्यान, माढा रोड, पंढरपूर रोड, भाजी मंडई हा नेहमीचा वर्दळीचा भाग मात्र येथे अक्षरक्ष: शुकशुकाट दिसून आला. उन्हापासून बचाव व्हावा यासाठी अनेक ठिकाणी रस्त्यावर पाण्याचा शिडकाव नागरिकांनी केला होता. तर सावलीची जागा पाहून जनावरांनी आश्रय घेतल्याचे दिसून येत होते.

### कडक उन्हातही बस स्थानकावर गर्दी

शहरात उन्हाच्या तीव्र झळा बसत असताना कुर्डुवाडी बस स्थानकावर मात्र गर्दी दिसून आली. लग्न सराई, उन्हाळा सुट्टीसाठी नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रवास सुरु होता. यात विशेष करून महिला वर्ग व जेष्ठ नागरिकांचा समावेश मोठ्या प्रमाणावर आढळून आला.

# गोवंडीत मिहीर कोटेचा यांच्या प्रचार फेरीवर दगडफेक

**मुंबई/प्रतिनिधी**

ईशान्य मुंबईचे भाजप उमेदवार मिहीर कोटेचा यांच्या प्रचारावेळी अज्ञात इसमाने त्यांच्या प्रचार रथावर दगडफेक केल्याची घटना सोमवारी रात्री गोवंडी परिसरात घडली. याबाबत त्यांच्या कार्यकर्त्यांनी देवनार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर ईशान्य मुंबईचे महायुतीचे उमेदवार आमदार मिहीर कोटेचा यांनी त्यांच्या मतदार संघात जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यानुसार सोमवारी रात्री त्यांचा प्रचार गोवंडी परिसरात सुरू असताना अचानक एक दगड प्रचारातील रथावर येऊन पडला. हा दगड एका महिला कार्यकर्त्याला लागल्याचा आरोप यावेळी भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. घटनेनंतर कार्यकर्त्यांनी देवनार पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांनी देखील या घटनेला दुजोरा दिला असून याबाबत तपास करून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती परिमंडळ सहाचे पोलीस उपायुक्त हेमराजसिंग राजपूत यांनी दिली आहे.

# अश्विनला २०२५ मध्ये कोणी खरेदी करणार नाही

**नवी दिल्ली** : भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागने यंदाच्या आयपीएलमध्ये फॉर्मात नसलेला अनुभवी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनवर निशाणा साधला आहे. अश्विन या मोसमात विकेट घेण्यासाठी संघर्ष करत आहे आणि त्याने आठ सामन्यांत दोन विकेट घेतल्या आहेत. त्याचबरोबर त्याने प्रति षटकात नऊ धावा दिल्या आहेत. फॉर्ममध्ये नसतानाही अश्विनने टी-२० मध्ये विकेट घेणे अप्रासंगिक असल्याचे म्हटले होते. अश्विनला प्रत्युत्तर देताना सेहवाग म्हणाला की, कदाचित अश्विनला पुढील हंगामाच्या आयपीएल लिलावात कोणीही खरेदीदार



सापडणार नाही.

वीरेंद्र सेहवागने टी-२० क्रिकेटमधील अश्विनच्या गोलंदाजीवर टीका केली. सेहवाग अश्विनशी असहमत आहे की गोलंदाजाचे लक्ष विकेट घेण्यावर नसून धावांचा वेग रोखण्यावर असते. सेहवाग म्हणाला, हे के.एल. राहुलच्या विधानासारखेच आहे. ज्यात त्याने म्हटले होते की स्ट्राइक रेटने काही फरक पडत नाही. क्रिकबझवर बोलताना सेहवाग म्हणाला की, गोलंदाजाचे काम केवळ डॉट बॉल टाकणे नव्हे तर विकेट घेणे आहे. वीरू म्हणाला, जेव्हा असे घडते, जेव्हा तुम्ही तुमचे षटक ६-७ धावांचे टाकता, तेव्हा हा सेट फलंदाज इतर गोलंदाजांसाठी अडचणी निर्माण करतो. कारण तो तुमच्यासारखा हुशार नाहीत. त्यामुळे तुमच्यासारखा वाचू शकत नाही. त्यामुळे फलंदाज अधिक धावा करण्यासाठी सज्ज असेल. त्यामुळे, गोलंदाजी फक्त डॉट बॉलसाठी न करता विकेट घेण्यासाठी करणे चांगले. हे माझे मत आहे.

# लोकलमधून पडून डोंबिवलीतील दोन जणांचा मृत्यू

**डोंबिवली** : छत्रपती शिवाजी टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकलच्या डब्यात तुडुंब गर्दी असल्याने डब्यात शिरता न आल्याने लोकलच्या दरवाजात दाटीवाटीने उभे राहून प्रवास करणाऱ्या एका तरूणाचा, एका तरूणीचा दोन दिवसांत लोकलमधून पडून मृत्यू झाला आहे. डोंबिवली ते कोपर आणि दिवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. लोकलची संख्या वाढवुनही लोकल अपघातांचे प्रमाण कमी होत नसल्याने रेल्वे प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. गेल्या वर्षात डोंबिवली ते दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान सुमारे ४०० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. सुमारे ८०० हून अधिक लोकल मधून पडून जखमी झाले आहेत. रेल्वे अपघात टाळण्यासाठी रेल्वे प्रशासन विविध प्रकारच्या उपाययोजना करत आहेत. तरीही ही अपघातांची मालिका संपत नाही.

लोहमार्ग पोलीस ठाण्यात याप्रकरणांची नोंद करण्यात आली आहे. सोमवारी सकाळी डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रिया श्यामजी राजगोर (२६) या तरूणीचा मृत्यू झाला.

# सांगोला शहरात भाजपाचा घरोघरी प्रचार

**सांगोला/प्रतिनिधी**

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ सांगोला शहरात भाजपाकडून घरोघरी प्रचार करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, मणेरी गल्ली, परीट गल्ली, भाजी मंडई परिसर, कुंभार गल्ली मेन रोड या ठिकाणी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी होम टू होम प्रचार केला. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

सांगोला तालुक्यातील सिंचनाच्या योजना खा. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात मार्गी लागल्या . तालुक्यातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत झाली आहे. तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे, असे सांगण्यात आले.


प्रचारात माजी नगराध्यक्षा राणी माने ,गटनेते आनंदा माने, नगरसेविका छाया मेटकरी, उद्योगपती आनंद घोंगडे, नगरसेवक माऊली तेली, चेअरमन लता मोटे, संग्रामसिंह जाधवराव, सतीश वाघ, सूर्यकांत मेटकरी,आयुब जमादार, काशिलिंग गावडे, सुनील पवार, जय बनसोडे, अशपाक मुलाणी, शिवाजी गावडे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# बुलेट ट्रेनच्या डेपोमध्ये सौरऊर्जेचा वापर

**मुंबई/प्रतिनिधी**

इंधनाचा खर्च आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कमीत कमी इंधन आणि विजेचा वापर करण्याकडे नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचा (एनएचएसआरसीएल) कल आहे. विजेची गरज भागवण्यासाठी एनएचएसआरसीएलने अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प साकारण्यात येत आहे. बुलेट ट्रेनच्या ठाणे आणि साबरमती डेपोमध्ये सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून हे काम पूर्ण झाल्यास बुलेट ट्रेनच्या डेपो व इतर परिसरातील विजेचे दिवे, पंखे व इतर लहान उपकरणासाठी सौरऊर्जेचा वापर करण्यात येईल.



मुंबई - अहमदाबाददरम्यान ५०८ किमी बुलेट ट्रेन प्रकल्पाचे तीन मोठे रोलिंग स्टॉक डेपो उभारण्यात येणार आहेत. जपानमधील शिंकनसेन डेपोच्या धर्तीवर या डेपोची रचना केली जाणार आहे. तीनपैकी एक रोलिंग स्टॉक डेपो ठाण्यात, तर उर्वरित दोन गुजरातमधील साबरमती आणि सुरत येथे उभारण्यात येतील. तेथे बुलेट ट्रेनची देखभाल-दुरुस्तीची कामे करण्यात येतील. ठाणे डेपो सुमारे ५५ हेक्टर क्षेत्रफळाच्या भूखंडावर उभारण्यात येणार आहे. त्यात सुरुवातीला चार तपासणी मार्गिका आणि १० उपमार्गिका (स्टेबलिंग) बांधण्यात येणार आहेत. भविष्यात त्या अनुक्रमे ८ आणि ३१ पर्यंत वाढविल्या जातील. सर्वाधिक मोठा रोलिंग स्टोक डेपो साबरमती येथे उभारण्यात येणार असून सुमारे ८३ हेक्टर क्षेत्रफळावर उभारला जाणार आहे. तेथे वॉशिंग प्लांट, वर्कशॉप, शेड असणार आहे. या डेपोत १० उपमार्गिका नियोजित असून भविष्यात २९ उपमार्गिका वाढवल्या जातील. या दोन्ही डेपोंमध्ये सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याची योजना आहे. त्यानुसार डेपो शेड आणि इमारतींची रचना केली जाणार आहे. एकट्या साबरमती डेपोत सुमारे १४ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीची क्षमता असेल. ठाण्यातील डेपोमधील सौरऊर्जा निर्मितीची क्षमतेबाबत नियोजन केले जात आहे, अशी माहिती नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशनच्या (एनएचएसआरसीएल) वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

सुरतमध्ये ४० हेक्टर क्षेत्रफळावर रोलिंग स्टोक डेपो उभारण्यात येणार आहे. सुरत स्थानकापासून साधारण २ किमी अंतरावर तो उभारण्यात येणार आहे. दोन उपमार्गिका नियोजित असून भविष्यात त्यांची संख्या चार करण्यात येईल. मात्र सुरत डेपो इतर डेपोच्या तुलनेत लहान असून सध्या तरी येथे सौरऊर्जा निर्मितीबाबत कोणतेही नियोजन नसल्याचे एनएचएसआरसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

सध्या ठाण्यात पाण्याची टंचाई नसली तरी, साबरमती, सुरत येथे आहे. मात्र, जलस्त्रोत व्यवस्थापन तिन्ही डेपोत केले जाणार आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर केला जाईल. तसेच सुमारे ७० टक्के पाण्याची गरज पुनर्वापर केलेल्या पाण्यापासून भागवली जाईल. यासह कचऱ्याचे व्यवस्थापन प्रत्येक डेपोत केले जाईल, असे एनएचएसआरसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# गृहमंत्री फडणवीस यांना कायदा सुव्यवस्थेवर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही : बारसकर

**पंढरपूर/प्रतिनिधी**

धवलसिंह मोहिते पाटील यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यात जर त्यांना जामीन मिळाला असता आणि त्यांची भेट या नेतेमंडळींनी घेतली असती तर ते योग्य होते.मात्र धवलसिंहांना अद्यापही त्या केसमध्ये जामीन मिळालेला नाही. अशा आरोपीला भाजपाच्या आमदार, खासदारांनी भेटणे आणि तद्नंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मारणे ही बाब भाजपाचे नेते अटल बिहारी वाजपेयी यांच्या विचारात बसणारे नाही. राज्याचे गृहमंत्री फडणवीस यांना राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेवर बोलण्याचा कसलाही नैतिक अधिकार राहिलेला नाही, यामुळे माढा लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या पाठीशी उभे राहावे, असे परखड प्रतिपादन राज्याचे ओबीसी नेते तथा माढा लोकसभा मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारसकर यांनी केले.



### ओबीसी जागृत होतोय आनंदाची बाब आहे.'

फलटण तालुका ओबीसी संघर्ष समितीची सावतामाळी मंदिर फलटण येथे महत्वपूर्ण व निर्णायक बैठक पार पडली आहे. या बैठकीत सर्वानुमते ओबीसीचं मत ओबीसी उमेदवारालाच द्यायचं असा एकमुखी निर्णय घेण्यात आला. फलटण येथील या निर्णयाचे लोण माढा लोकसभा मतदारसंघात सर्वत्र पोहचेल. ओबीसी नेत्यांना अवहेलनात्मक वागणूक दिली जात आहे. काही ठिकाणी जात काढून त्यांची बदनामी होते आहे. तर काही ठिकाणी ओबीसी उमेदवाराच्या प्रचाराला गावात येण्यापासून रोखलं जात आहे. अशाप्रकारे लोकशाहीला काळिमा फासणारे प्रकार घडत असल्याने आज हा निर्णय फलटण तालुका संघर्ष समितीच्या वतीने घेण्यात आल्याने ओबीसी समाज जागृत होतोय याचा आनंद आहे, असे बारसकर म्हणाले.

माढा लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार रमेश बारसकर यांनी पंढरपूर तालुक्यातील गावांना गावभेट दिल्या त्या प्रसंगी ते बोलत होते. धैर्यशील मोहिते पाटील, भाजपा आ. रणजितसिंह मोहिते पाटील व धवलसिंह मोहिते पाटील हे सर्वजण एकाच रेशन कार्डमध्ये नाव असलेले लोक आहेत. अशा परिस्थितीत जर हे बंधू एकमेकांच्या विरोधात काम करत असतील तर हे माढा लोकसभा मतदारसंघात काय दिवे लावणार ? घरात एकमत करू न शकणारी ही लोक मतदार संघाचा काय विकास साधणार आहेत, असा सवाल बारसकर यांनी केला. माझे माढा लोकसभा मतदारसंघात तीन दौरे झाले आहेत. प्रत्येक गावात मी गेलो आहे. या ठिकाणी भारतीय जनता पक्षाच्या विरोधात जनतेतून संतापाची लाट आहे.

माझी लढाई ही एका भाजपा बरोबर नसून दोन भाजपा बरोबर आहे. जर चुकून धैर्यशील मोहिते पाटील निवडणून आले.तर ते नक्कीच भाजपा मध्ये जातील असा माझा संशय आहे.त्यामुळे माढा लोकसभा मतदारसंघातील स्वाभिमानी मतदारांनी वंचित बहुजन आघाडीला विजयी करावे असे ही रमेश बारसकर म्हणाले.

# माढा तालुक्यात पाणी टंचाई गंभीर

## सात गावांत आठ टँकरद्वारे पाणी; आणखी सात गावांचे प्रस्ताव दाखल

कुर्डूवाडी/प्रतिनिधी

माढा तालुक्यात उजनी धरण उशाला असूनही येथील नियोजनशून्य कारभाराचा फटका यंदाच्या उन्हाळ्यात बसला आहे. आतापर्यंत सात गावांना आठ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे. आणखी सात गावांचे टँकर मागणीचे प्रस्ताव प्रस्तावित झाले आहेत.




> माढा तालुक्यातील सात गावांत आठ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा सुरू आहे. अजून सात गावांचे मागणी प्रस्ताव सादर आहेत. त्याला मंजुरी मिळताच त्या गावातही टँकर तातडीने सुरू करण्यात येतील. दोन गावात विंधन विहिरी अधिग्रहण केल्या असून तीन गावातील मंजुरीसाठी प्रस्तावित केल्या आहेत.
> – **दयानंद वाघमारे,** शाखा अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, कुर्डूवाडी.

दोन गावात विंधन विहिरी अधिग्रहण केल्या आहेत. तीन गावातील विंधन विहिरी अधिग्रहणासाठीचे प्रस्ताव देखील येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर झाले आहेत.त्यामुळे यंदा माढा तालुक्यातील अनेक गावात मे महिन्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना पायपीट करण्याची वेळ येणार असल्याचे समोर दिसू लागले आहे. त्या दृष्टीने येथील प्रशासन पावले उचलू लागले आहे.

माढा तालुक्यातील तुळशी गावठाण, तुळशी वाडीवस्ती, बावी, कुर्डू, बैरागवाडी, परितेवाडी, भोसरे, शिराळ (मा) या सात गावांसाठी आठ टँकरद्वारे शासनाकडून पाणीपुरवठा सुरू झाला आहे. अरण, घाटणे, अंजनगाव (खे), रोपळे (क), लोणी, पडसाळी, जाधववाडी (मो) या सात गावांसाठीचे टँकर मागणी प्रस्ताव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर झाले आहेत.

सध्या दारफळ व मानेगाव येथे गावातील एक एक विंधन विहिरीचे अधिग्रहण ग्रामपंचायतकडून केली आहे. जाधववाडी(मा),चिंचोली, रणदिवेवाडी या गावांतील विंधन विहीर अधिग्रहण प्रस्ताव प्रस्तावित झालेले आहेत. यामुळे पिण्याच्या पाण्याच्या झळा आता येथील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जाणवू लागल्याचे दिसून येत आहे.

माढा तालुक्यासाठी एकेकाळी महत्वाच्या असणाऱ्या २७ गावांसाठी असलेली व्होळे प्रादेशिक व १६ गावांसाठी असलेली कव्हे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनाही अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत पडली आहे. त्याचाही फटका बसत असल्याचे समोर येत आहे. ग्रामीण भागातील गावातील भूगर्भातील पाणीपातळी सध्या खोलवर गेली असल्याने विहीरी कोरड्या पडू लागल्या आहेत. गावागावांतील बोअरवेलचे पाणी देखील पिण्यापुरतेच उरले आहे. त्यामुळे दुष्काळाची परिस्थिती वरचेवर गंभीर स्वरूप धारण करू लागली आहे. ग्रामीण भागात सहाशे फुटापर्यंत बोअरला पाणी लागत नसल्याचे शेतकरी धनाजी कदम यांनी बोलताना सांगितले.

## क्राईम वृत्त

### औज येथे दोन गटात चाकू आणि लोखंडी रॉडने मारहाण; दोघे जखमी

**सोलापूर** : शिवीगाळ केल्याच्या कारणावरून रूपनुरे आणि पाटील यांच्या गटात चाकू,लोखंडी रॉड, आणि काठीने झालेल्या मारहाणीत दोघे जखमी झाले. ही घटना औज (ता.दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायत कार्यालयाजवळ सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. सर्व जखमीना वळसंग येथे प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. भारत पांडुरंग रुपनुरे (वय ५२ रा.औज) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. सोमवारी (दि.२९) सकाळी १० वाजेच्या सुमारास त्याला शिवी दिल्याच्या कारणावरून पप्पू बाळासाहेब पाटील ,त्याचे दोन भाऊ पिंटू पाटील, गणेश पाटील आणि अन्य दोघे असे ५ जणांनी मिळून चाकू, काठी आणि लाथाबुक्याने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील प्रफुल्ल बाळासाहेब पाटील (वय ३९ रा.औज) असे जखमीचे नाव आहे. त्याला त्याच कारणावरून भारत पांडुरंग रुपनुर, ओंकार चंद्रकांत रुपनुर आणि विलास महादेव रुपनुर या तिघांनी मिळून लोखंडी रॉड आणि विटांनी मारहाण केली, अशी नोंदी तालुका पोलिसात झाल्या आहेत.

---

### ब्लेडने स्वतः मारून घेतलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर** : दारूच्या नशेत स्वतः हातावर ब्लेडने मारून घेऊन जखमी झालेला इरफान यासीन शेख (वय ३२ रा.राहुल गांधी झोपडपट्टी, पाच्छा पेठ) हा शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी दुपारी मृत झाला. त्याने शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास पदमशाली चौकाजवळ त्याने नशेत स्वतः च्या हातावर ब्लेडने वार करून घेतला होता. त्याला गंभीर अवस्थेत समीना शेख (बहीण) यांनी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो मयत झाला,अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे.

---

### अंगावर भिंत पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर** : जुन्या बांधकामाचे पाडकाम करताना बाजूची भिंत अंगावर कोसळल्याने सुशांत आप्पाशा सोनकांबळे (वय २१ रा. विजापूर नाका झोपडपट्टी) हा तरुण जखमी झाला. ही घटना सोमवारी (दि. २९) सकाळी १० वाजेच्या सुमारास सैफुल परिसरातील स्वामी विवेकानंद नगरात घडली. तो जुने बांधकामाचे पाडकाम करीत होता. त्यावेळी बाजूची भिंत अंगावर ढासळल्याने त्याच्या डोके आणि पायास मार लागुन तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी प्रमोद (भाऊ) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. विजापूर नाका पोलिसात याची नोंद झाली आहे.




---

### लोणविरे येथे घरातून ६२ हजारांच्या दागिन्यांची चोरी

**सांगोला** : सांगोला तालुक्यातील लोणविरे येथे चोरट्याने अंकुश लक्ष्मण गाडेकर यांच्या घराची चोरी करून ६२ हजार रुपयांचे सोने , रोख रक्कम, मोबाईल असे साहित्य चोरून नेले. ही घटना रविवारी(दि.२८) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. त्याचवेळी शेजारी पाच घरांची चोरी झाल्याचेही अंकुश गाडेकर यांनी सांगितले. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण(किंमत ५५ हजार रुपये), तसेच पाच हजार रुपये रोख, व दोन हजार रुपये किमतीचा मोबाईल असे ६२ हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची फिर्याद अंकुश गाडेकर यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. त्यांच्या शेजारी राहणारे शांताबाई भागवत गाडेकर, दत्तात्रेय विठोबा गोडसे, सर्जेराव भानुदास गाडेकर व इतर दोन ते तीन ठिकाणी अशा प्रकारच्या चोऱ्या झाल्याचे समजले असल्याचे फिर्यादीत सांगितले आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक नलवडे हे करीत आहे.

# निवडणूक खर्चात प्रणिती शिंदे आघाडीवर

## प्रणिती शिंदेंनी पंधरा लाख तर राम सातपुतेंनी केले १३ लाख खर्च

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार आ. प्रणिती शिंदे या निवडणुकीच्या प्रचारातील खर्चावर आघाडीवर आहेत. प्रणिती शिंदे यांनी अर्ज भरल्यापासून आतापर्यंत पंधरा लाख ७० हजार ९४० रुपये इतका खर्च केल्याचे सांगण्यात आले. भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांचा खर्च १३ लाख ६४० रुपये इतका आजपर्यंत खर्च झाल्याचे सांगण्यात आले.

निवडणूक आयोगाचे सूचनेप्रमाणे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाच्या वेळापत्रकानुसार पहिली फेरी पूर्ण झाली असून इतर खर्चाच्या फेरी वेळापत्रकानुसार नोंदी होते. त्याप्रमाणे खर्चाची तपासणी करून आकडेवारी कळवण्यात येईल. सोलापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाच्या नोंद यांची वेळापत्रकानुसार पहिली तपासणी खर्च निरीक्षक उमेश राठोड यांच्या उपस्थितीत करण्यात आली. पहिल्या तपासणीच्या वेळी १८ उमेदवार उपस्थित होते. तीन उमेदवार अनुपस्थित होते. अनुपस्थितीत उमेदवारांना खर्च निरीक्षक राठोड यांनी नोटीस बजावली असून खर्चाच्या नोंदी वेळेत कार्यालयात द्याव्यात असे आवाहन केले आहे. खर्च तपासणीवेळी खर्च नियंत्रक व सर्व सहाय्यक खर्च निरीक्षक तसेच खर्च नियंत्रण पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते



तांत्रिक परिसंवादाचे उदघाटन करताना डॉ. संतोष पंचपोर, डॉ.अंकुश परीहार, डॉ समीर बोरकर, डॉ.महेश बनसोडे आदी.

# स्वेरीत पशुवैद्यक दिनानिमित्त 'तांत्रिक परिसंवाद'

पंढरपूर/प्रतिनिधी

'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, पंढरपूर व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये 'तांत्रिक परिसंवादा'चे आयोजन केले होते. यावेळी डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्कार' व 'डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कारांचही वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी पुणे विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धनचे सहआयुक्त डॉ. संतोष पंचपोर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन विभाग, सोलापूरचे उपायुक्त डॉ. समीर बोरकर हे होते. दीप प्रज्वलनानंतर तसेच डॉ. सुहास देशपांडे व डॉ. चंद्रकांत निंबाळकर यांच्या प्रतिमा पुजन झाले. प्रास्तविकात ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वास मोरे यांनी 'जागतिक पशुवैद्यक दिना'चे महत्व सांगितले. पंढरपूर पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ.प्रियांका जाधव-कोळेकर यांनी स्वागत केले. 'तांत्रिक परिसंवाद' मध्ये परभणीच्या पशुवैद्यक महाविद्यालयाचे माजी सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नितिन मार्कंडे यांनी 'वंध्यत्व निवारण व व्यवस्थापन' या विषयावर, शिरवळच्या केएनपी पशुवैद्यक महाविद्यालयाचे प्रा. डॉ.विठ्ठल धायगुडे यांनी 'रोगनिदान तपासण्यांचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूरचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप घोरपडे, पशुसंवर्धन विभागाचे माजी सहआयुक्त डॉ. महेश बनसोडे, जिल्हा पशु सर्वरोग चिकित्सालय, सोलापूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे व स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी मनोगत व्यक्त केले. महाव्हेटचे अध्यक्ष डॉ. रामदास गाडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. दिलीप घोरपडे व डॉ. महेश बनसोडे यांना ' डॉ. सुहास देशपांडे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर डॉ.भाग्यश्री राठोड (दक्षिण सोलापूर), डॉ. विष्णू होळकर (वागदरी-अक्कलकोट), डॉ. सचिन कंपने (बोरामणी-उत्तर सोलापूर), डॉ.ओम सोनाळे (मोहोळ), डॉ.कैलास कच्छवे (मोडनिंब), डॉ. आर.एन. होळकर (करमाळा), डॉ.पी.टी.मांजरे (जवळगाव-बार्शी), डॉ. रवींद्र बंडगर (मरवडे-मंगळवेढा), डॉ. श्रीकांत सुर्वे (सांगोला), डॉ. अतुल चुकेवार (माळशिरस), डॉ. शामराव वायबसे (वाळवा-सांगली), डॉ. लक्ष्मण गाढवे (आटपाडी-सांगली) यांचा ' डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्यक पुरस्कार' म्हणून तर डॉ. रविंद्र वर्धमान यांना पशुधन अधिकारी व योगा बाबत जनजागृती केल्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले.

# बाजारसमितीत लिंबूची आवक अल्प

## मागणीत वाढ; दरात मोठी वाढ

उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीत लिंबाची आवक घटत चालली असल्याचे लिंबू व्यापारी व अडत्यांनी सांगितले.

कडक उन्हाळा असल्याने विविध पेयांसाठी लिंबू आवश्यक आहे. परिणामी लिंबाची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. मात्र आवक कमी असल्याने सध्या बाजार समितीत लिंबू चढ्या दराने विकला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाचे चटके बसत असताना सोलापूर कृषी उत्पन्न बाजर समितीमध्ये लिंबाची आवक घटत आहे. बाजार समितीमध्ये दोन ते तीन दिवसात ३.४२ टन लिंबू आले. मात्र स्थानिक बाजार पेठेसह



> सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ३ टन लिंबाची आवश्यकता असते. प्रत्यक्षात खराब हवामानामुळे आवक कमी झाली आहे. घाऊक ७० ते ९० रुपये दराने विक्री होत आहे.
> – **अल्ताफ लिंबूवाले,** रॉयल लेमन कंपनी.

जिल्ह्यात लिंबाला मोठी मागणी आहे. घाऊक बाजारात १०० ते १२० किलो दर असून किरकोळ १२० ते १५० किलो, प्रति शेकडा २०० रुपये विक्री चालू आहे.

सोलापूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात लिंबू आवक होत असताना स्थानिक, खासगी व्यापारी जागेवर जाऊन खरेदी करत असल्याने व रोख रक्कम मिळत असल्याने बाजार समितीमध्ये दिवसेंदिवस आवक कमी होत असल्याचे सोलापूर बाजार समितीमधील लिंबू अडते व व्यापाऱ्यांनी सांगितले.

# लहान मुलाच्या खूनाची धमकी दागिन्यांची लूट

सोलापूर/प्रतिनिधी

घरात घुसलेल्या चोरट्याने झोपेत असलेल्या ९ वर्षीय मुलाच्या गळ्याला चाकू लावला. त्याला ठार मारण्याची धमकी देऊन आईच्या गळ्यातील ३० हजाराचे दागिने लुटून पोबारा केला.

जबरी चोरीची ही घटना पाटकूल (ता. मोहोळ) येथे घडली. याप्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी चोरट्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात संतोष मधुकर भोसले (वय ४० रा.पाटकुल) यांनी मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांची पत्नी आपला मुलगा अथर्व (वय ९ ) याला सोबत घेऊन पत्र्याच्या घरात झोपल्या होत्या. २१ एप्रिल रोजी पहाटे १ वाजेच्या सुमारास चोरट्याने त्यांच्या खोलीच्या पाठीमागील पत्रा उचकटून आत प्रवेश केला. आणि मुलगा अथर्व याच्या गळ्याला चाकू लावला. त्याला त्याला खलास करण्याची धमकी देत महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि कर्णफुले असा एकूण ३० हजाराचे दागिने बळजबळीने काढून पसार झाला, असे भोसले यांच्या फिर्यादीत नमुद आहे. तपास सहाय्यक निरीक्षक ओलेकर करीत आहेत.

# राजू खरे यांनी सुरू केला टँकरने पाणीपुरवठा

## पहिल्या टप्प्यात पाच टँकरद्वारे २४ तास सेवा

### मोहोळ मतदारसंघात मागेल त्याला पिण्याचे पाणी

पंढरपूर/प्रतिनिधी

मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार राजू खरे यांनी पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता, नागरिकांच्या मागणीनुसार पहिल्या टप्प्यात पाच टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुवरठा सुरु केला आहे. रविवार (दि.२९) पासून २४ तास पिण्यासाठी मोफत पाणीपुरवठा सुरू केला आहे.

राजू खरे यांनी मागील अनेक वर्षापासून मोहोळ विधानसभा लढविण्यासाठी मोठी तयारी ठेवली आहे. मागेल त्याला रस्ता आणि मागेल त्याला पाणी देण्याची तयारी ठेवली आहे. काही दिवसांपूर्वी अनेक गावातील लोकासाठी बोअर पाडून दिले होते. काही काळ या बोअरमधून पाणीपुरवठा केला गेला.




> **जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही**
>
> लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीत पालकमंत्री, प्रशासन गुंतले आहे. पाणीटंचाईबाबत कोणीही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. यामुळे आपण अशा या लोकसभा निवडणुकीत अलिप्त राहू, पण माझ्या मतदारसंघातील जनतेला पाणी देऊ अशी प्रतिक्रिया राजू खरे यांनी व्यक्त केली आहे.

सध्या ऐन उन्हाळा आणि दुष्काळाची मोठी छाया पडली आहे. यामुळे बोअरमधील पाणीपुरवठा बंद पडला आहे. यातूनही मोहोळ मतदारसंघातील लोकांना पाणी मिळाले पाहिजे या भुमिकेतून राजू खरे यांनी मोहोळ मतदारसंघातील लोकांसाठी खास टँकर सुरू केले आहेत.

मोहोळ शहरातील लोकांसाठी दोन, मोहोळ ग्रामीण भागासाठी दोन आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील लोकांसाठी मोठा एक टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे. पाण्याची मागणी वाढतच जाणार आहेत. त्यासाठी आणखी टँकर वाढविण्याची तयारी ठेवली आहे. मोहोळ विधानसभा मतदारसंघातील लोकांना पाणी कमी पडू देणार नसल्याचेही सांगितले आहे.

खरे यांनी आजवर अनेक गावातील रस्ते, आरोग्यासाठी मदत, शिक्षण संस्थांना मदत, गरिबांना लग्नासाठी आर्थिक मदत, विविध जयंती उत्सवासाठी आपला हात कायम सढळ ठेवला आहे. त्यामुळे मोहोळ मतदारसंघातील नागरीक त्यांना पाणी देणारा एकच नेता असे म्हणत आहेत. आहे. अडचणीच्या काळात मदतीला धावून येणाऱ्या या राजू खरे यांचे जनतेकडून विशेष आभार मानले जात आहेत. पंढरपूर तालुक्यातील जी गावे या मोहोळ मतदार संघात येत आहेत. त्यांच्यासाठीही लवकरच दुसऱ्या टप्प्यात मागणीनुसार आपण पाहिजे तेवढे टँकर उपलब्ध करून देणार असल्याचे खरे यांनी जाहीर करून टाकले आहे.

## निधन वृत्त

### शिला मुरुगकर



**सोलापूर** : जुळे सोलापूर परिसरातील रहिवासी शिला भालचंद्र मुरुगकर (वय ७२) यांचे रविवारी (दि.२८) हैदराबाद येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वडाळा येथील माऊली मतिमंद निवासी विद्यालयातील कर्मचारी निरंजन मुरुगकर यांच्या त्या मातोश्री होत.

### महादेवी सुरळे



**सोलापूर** : टाकळी (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी महादेवी हणमंत सुरळे (वय ९५) यांचे रविवारी (दि.२८) निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन नातवंडे असा परिवार आहे. टाकळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन सिद्धाराम सुरळे यांच्या त्या मातोश्री होत्या.

### बालाजी खारे



**उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर मधील बानेगाव येथील बालाजी मधुकर खारे ( वय-३३) यांचे निधन झाले.त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, दोन बहिणी असा परिवार आहे.

# 'कर्मयोगी' मध्ये वाढतोय पक्ष्यांचा किलबिलाट

## विद्यार्थ्यांकडून पक्ष्यांसाठी निवारा, अन्न-पाण्याची सोय

पंढरपूर/प्रतिनिधी

कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, शेळवे येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पक्ष्यांसाठी निवारा, अन्न-पाण्याची सोय केली आहे. परिणामी महाविद्यालयीन परिसरात पक्ष्यांचा किलबिलाट वाढला आहे.

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एक अनोखा उपक्रम राबविला. विद्यार्थ्यांनी स्वत: कौशल्यातून पक्ष्यांसाठी लोखंडी पत्र्यापासून घर तयार केले. कॅम्पसमध्ये ठिकठिकाणी अशी घरे लावलेली पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे या निवाऱ्यांमध्ये पक्ष्यांसाठी अन्न व पाणी यांचीही सोय केलेली आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे पक्ष्यांसाठीची ही घरे विद्यार्थ्यांनी स्वत: वर्कशॉपमध्ये तयार केलेली आहेत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली आहे. याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पहायला मिळत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून या उपक्रमाबद्दल प्रोत्साहित केले. तसेच पर्यावरण रक्षणासाठी करीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या उपक्रमाला महाविद्यालयातर्फे सर्वतोपरी मदत केली जाईल अशी ग्वाहीही दिली.



सध्याच्या वाढत्या तापमानामुळे सर्वांच्याच शरीराची लाही लाही होत आहे. माणूस वेगवेगळे पर्याय वापरुन उन्हापासुन स्वत:चा बचाव करतात. परंतु पक्ष्यांसाठी सावली उपलब्ध करून देऊन त्यांना अन्न व पाण्याची सोय करणे हे मोठे काम कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. यामुळे कर्मयोगीच्या कॅम्पसमध्ये वेगवेगळ्या प्रजातीचे पक्षी पहावयाला व त्यांचा किलबिलाट अनुभवायला मिळत आहे.

श्रीपांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए बी.कणसे, रजीस्ट्रार जी.डी.वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल.मुडेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, विभाग प्रमुख प्रा. अभिनंदन देशमाने, प्रा.एस.एम.लंबे, प्रा. अनिल बाबर, प्रा. एस.व्ही.एकलारकर, प्रा.दिपक भोसले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. उपक्रमाठी वर्कशॉप प्रशिक्षक ललित फडतरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## संक्षिप्त वृत्त

### करोना संकटानंतर नवीनच धोका वाढला!

#### जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा

**पुणे :** करोना संकटाच्या काळात डॉक्टरांकडून प्रतिजैविकांचा अतिवापर करण्यात आला. अनेक रुग्णांना आवश्यक नसतानाही प्रतिजैविके देण्यात आली. जगभरात सरासरी चारपैकी तीन रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. यामुळे आता प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या जगभरात जाणवू लागली आहे, असा निष्कर्ष जागतिक आरोग्य संघटनेने काढला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ६५ देशांतील रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या ४ लाख ५० हजार करोना रुग्णांच्या आरोग्य अहवालाची तपासणी केली. हे रुग्ण जानेवारी २०२० ते मार्च २०२३ या कालावधीतील आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे की, करोना संकटाच्या काळात रुग्णालयात दाखल झालेल्या केवळ ८ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्याची गरज होती. प्रत्यक्षात डॉक्टरांकडून जगभरात सरासरी ७५ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. पश्चिम प्रशांत विभागात ३३ टक्के रुग्णांना तर आखाती आणि आफ्रिकी देशांमध्ये ८३ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. युरोप आणि अमेरिकेत २०२० ते २०२२ या कालावधीत प्रतिजैविके देण्यात प्रमाण हळूहळू कमी झाले. मात्र, आफ्रिकेत ते वाढताना दिसून आले. प्रतिजैविकांचा सर्वाधिक वापर करोनामुळे गंभीर स्थिती झालेल्या रुग्णांमध्ये झाला. जगभरात अशा ८१ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. मध्यम अथवा सौम्य त्रास असलेल्या करोना रुग्णांना प्रतिजैविके देण्याचे प्रमाण विभागनिहाय वेगळे असून, त्यात आफ्रिकेत सर्वाधिक ७९ टक्के रुग्णांना प्रतिजैविके देण्यात आली. विशेष म्हणजे, प्रतिजैविके देण्यात आल्याने करोना रुग्णांच्या प्रकृतीत फरक पडला नाही. याउलट जीवाणूसंसर्ग नसलेल्या रुग्णांच्या आरोग्याला त्यामुळे अपाय झाला, असे संघटनेने नमूद केले आहे.

एखाद्या रुग्णाला प्रतिजैविके देण्याची गरज असते त्यावेळी जोखमीपेक्षा फायदा अधिक असल्याचे तपासले जाते. मात्र, गरज नसताना रुग्णाला प्रतिजैविक दिल्यास कोणताही फायदा होत नाही. उलट रुग्णामध्ये प्रतिजैविक प्रतिरोध निर्माण होतो.
-डॉ. सिल्व्हिया बर्टानोलियो, प्रतिजैविक प्रतिरोध विभाग, जागतिक आरोग्य संघटना

एखाद्या व्यक्तीला जीवाणू आणि बुरशी संसर्ग झाल्यानंतर त्यावरील उपचार म्हणून प्रतिजैविक औषधे दिली जातात. प्रतिजैविकांचा अतिवापर झाल्यास त्या व्यक्तीच्या शरीरात त्यासाठी प्रतिरोध निर्माण होतो. त्यामुळे जीवाणू आणि बुरशी प्रतिजैविकांना दाद देत नाहीत. यामुळे एखाद्या व्यक्तीला संसर्ग झाल्यानंतर त्याच्यावर उपचार करणे अवघड बनते. त्यातून संसर्ग झालेली व्यक्ती गंभीर आजारी पडण्यासोबत तिचा मृत्यूही होऊ शकतो.

---

### अंबरनाथचे काँग्रेस शहराध्यक्ष पाटील यांच्यासह ७ माजी नगरसेवक शिंदेसेनेत

**अंबरनाथ :** राज्यातील प्रतिष्ठेच्या झालेल्या कल्याण लोकसभेत मंगळवारी शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली दरेकर राणे आपला अर्ज भरणार असतानाच त्याच्या दोन दिवस आधी महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. अंबरनाथमधील काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि माजी विरोधी पक्षनेते प्रदीप पाटील यांनी रविवारी ७ माजी नगरसेवकांसह शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या ठाणे निवासस्थानी पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रदीप पाटील काँग्रेसचे निष्ठावंत मानले जातात. त्यामुळे त्यांच्या पक्षप्रवेशामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. कल्याण लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. त्यांच्याविरूद्ध महाविकास आघाडीतर्फे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने वैशाली दरेकर राणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र डॉ. शिदे यांच्याविरूद्ध महाविकास आघाडीचे घटक पक्ष प्रचारात सक्रीय नसल्याचे चित्र आहे. दोनच दिवसांपूर्वी कल्याणच्याकाँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटाच्या उमेदवार विश्वासात घेत नसल्याचा आरोप केला होता. त्याच्या दोनच दिवसांनी रविवारी महाविकास आघाडीला काँग्रेसच्या रूपाने मोठा धक्का बसला आहे. रविवारी ठाण्यातील निवासस्थानी काँग्रेस नगरसेवकांचा प्रवेश पार पडला. त्यामुळे अंबरनाथमध्ये काँग्रेसचा सुपडा साफ झाला. अंबरनाथचे प्रदीप पाटील हे १९९५ पासून अंबरनाथ नगरपालिकेत नगरसेवक असून माजी विरोधी पक्षनेते सुद्धा राहिले आहेत. अंबरनाथ शहराच्या पश्चिमेला काँग्रेसचा मोठा मतदार आहे. त्यामुळे प्रदीप पाटील यांच्या शिवसेना प्रवेशाने डॉ. श्रीकांत शिंदे यांना फायदा होणार आहे. अंबरनाथ शहरात प्रदीप पाटील यांनी मागील अनेक वर्षे काँग्रेसची एकहाती धुरा सांभाळली. मात्र आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यपद्धतीने प्रभावित होऊन आपण शिवसेनेत प्रवेश करत असल्याचे प्रदीप पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले. प्रदीप पाटील यांच्यासह माजी नगरसेविका अर्चना रसाळ, चरण रसाळ, माजी नगरसेवक सुरेंद्र यादव, बबन तांबे, मनोज देवडे, बिस्मिल्ला शेख, काँग्रेसच्या महिला शहराध्यक्षा स्मिता बंगेरा, नयना पवार, विद्या नागदिवे, अर्चना प्रसाद, मनीषा परमल, युथ काँग्रेसचे हर्षल भोईर, देवराज अल्झानडे, संकेत तांबे, आशिष डुबली, ईशान जाधव, अश्फाक खान, अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष नईम शेख यांच्यासह सुधीर जाधव, ज्ञानेश्वर शेलार, अनिल कांबळे, प्रशांत उतेकर हे प्रमुख पदाधिकारी तसेच शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले.

# दिल्लीतल्या महिलांसाठी केजरीवालांची घोषणा

नवी दिल्ली/वृत्तसंस्था

**दिल्लीतल्या आम आदमी पार्टीच्या सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात दिल्लीतल्या महिलांना दर महिन्याला १,००० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून अरविंद केजरीवाल यांच्यामागे सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) चौकशीचा ससेमिरा लागला होता. त्यातच केजरीवाल यांना गेल्या महिन्यात २१ मार्च रोजी ईडीने अटक केली. त्यामुळे अनेक सरकारी योजना प्रलंबित आहेत. तसेच राज्याच्या कारभारात अनेक अडचणी येत आहेत. दरम्यान, केजरीवाल तुरुंगात असल्याने दिल्ली सरकारचं वीज आणि पाण्यावरील अनुदान (सबसिडी) आणि महिलांचा बसमधून होणारा मोफत प्रवास बंद होणार असल्याच्या बातम्या समोर येत आहेत.**

## मंत्री आतिशींना म्हणाले



सरकारी योजना आणि अनुदान बंद होणार असल्याच्या अफवा पसरू लागल्यानंतर दिल्ली सरकारने अधिकृत निवेदन जारी करत म्हटलं आहे की, कोणतीही योजना किंवा अनुदान बंद केलं जाणार नाही. यावरून स्पष्ट झालं आहे की, दिल्ली सरकार पाणी आणि वीजेवरील अनुदान बंद करणार नाही. तसेच दिल्लीतल्या महिला डीटीसी बसमधून मोफत प्रवास करू शकतात. यासह इतर योजनादेखील चालू राहतील.

दरम्यान, दिल्ली सरकारमधील मंत्री आतिशी मार्लेना यांनी सोमवारी (२९ एप्रिल) तिहार तुरुंगात जाऊन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. या भेटीनंतर आतिशी म्हणाल्या, केजरीवाल यांना तुरुंगातही दिल्लीतल्या जनतेची चिंता आहे.


मी त्यांना विचारलं की, ते कसे आहेत? त्यावर ते म्हणाले, तुम्ही माझी काळजी करू नका, माझ्या आरोग्याची देखील काळजी करू नका. दिल्ली सरकारचं काम कसं चाललंय ते सांगा.

शाळेतल्या मुलांना वेळेवर पुस्तकं मिळतायत का? विद्यार्थ्यांचं शिक्षण वेळेवर चालू आहे ना? शाळांमध्ये कुठलीही अडचण नाही ना? मोहल्ला क्लिनिकमध्ये औषधं वेळेवर पोहोचतायत की नाही? अनेक ठिकाणांहून तक्रारी येत होत्या की, मोहल्ला क्लिनिकमध्ये पुरेशी औषधं नाहीत.

ती समस्या आपण सोडवली का? उन्हाळा वाढलाय त्यामुळे दिल्लीत पाण्याची समस्या निर्माण झाली असेल कुठेही पाणी कमी पडता कामा नये.

आतिशी म्हणाल्या, केजरीवाल यांचं तुरुंगातून दिल्ली सरकारच्या योजनांकडे लक्ष आहे. त्यांनी तुरुंगातून दिल्लीतल्या महिलांना एक संदेश पाठवला आहे. ते म्हणाले, मी लवकरच तुरुंगाबाहेर येईन आणि दिल्लीतल्या महिलांना दर महिन्याला १,००० रुपये देण्याचं वचन पूर्ण करेन.

# सूर्यकिरणांची तीव्रता घटली!



पुणे/प्रतिनिधी

एकीकडे जगभरातील तापमान वाढत असताना, उन्हाच्या झळा तीव्र होत असताना देशभरात पडणाऱ्या सूर्यकिरणांची तीव्रता हळूहळू कमी होत असल्याचे गंभीर निरीक्षण हवामानशास्त्रज्ञांनी मांडले आहे. सूर्यकिरणे थेट जमिनीवर पडण्यात अडथळे वाढले असून, हाच कल येत्या काळातही कायम राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

सूर्यकिरणांची तीव्रता कमी होत असल्याबाबतचा शोधनिबंध भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) 'मौसम' या संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. हवामान विभागाचे शास्त्रज्ञ बी. एल. सुदीपकुमार, राजनकुमार फुकान, राजा बोरागापू, सी. बी. नलगे, ए. डी. तथे आणि आयएमडीच्या हवामान संशोधन आणि सेवा विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांच्या गटाने हे संशोधन केले आहे. हवामानशास्त्र आणि कालनिहाय सूर्य किरणांच्या प्रभावावर झालेले बदल या अनुषंगाने हे संशोधन करण्यात आले. १९८५ ते २०१९ या काळातील माहितीचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार देशभरात पडणाऱ्या सूर्यकिरणांची तीव्रता हळूहळू कमी होत आहे. कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन वायूच्या उत्सर्जनाचे प्रमाण वाढले आहे. देशभरात रस्ते, उड्डाणपुलांसह विविध प्रकारच्या बांधकामांमुळे हवेतील धूलिकणांचे प्रमाण वाढले आहे. हवामान बदलांमुळे वर्षभरातील पावसाचे, ढगाळ हवामानाचे दिवसही वाढले आहेत. परिणामी सूर्यकिरणे थेट जमिनीवर पडण्यात अडथळे वाढून सूर्यकिरणांची तीव्रता कमी झाल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

संपूर्ण देशाचा विचार करता विविध कारणांमुळे हिमालयीन प्रदेश, ईशान्येकडील डोंगररांगा, किनारपट्टीचा प्रदेश आणि दक्षिण भारतात सूर्यकिरणे जमिनीवर येण्यात अडथळे जास्त आहेत. त्या तुलनेत राज्यस्थान, पंजाब, हरियाणा, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आदी राज्यांत सूर्यकिरणांची तीव्रता तुलनेने चांगली आहे. त्यामुळे देशाच्या अन्य भागाच्या तुलनेत या ठिकाणी सौरऊर्जा निर्मितीला पोषक वातावरण आहे.

### सौरऊर्जा निर्मितीमध्ये अडथळे

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर औष्णिक ऊर्जा निर्मिती कमी करून अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला चालना देण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. त्यानुसार देशात २०३० पर्यंत २८० गिगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट्ये आहे. सौरऊर्जा निर्मितीत वाढ करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर शोधनिबंधातील निरीक्षणांचे गांभीर्य वाढते. सूर्यकिरणांची तीव्रता कमी असतानाही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च सौरऊर्जा निर्मितीक्षमता असलेल्या संचांची निर्मिती करणे, सौरऊर्जा निर्मिती संचाची संख्या वाढविणे, सरकारी किंवा खासगी सौरऊर्जा प्रकल्पांच्या स्थळाची निवड करताना सूर्यकिरणांच्या तीव्रतेचा अभ्यास करून स्थळ निश्चित करण्याची गरज आहे, असे मत संशोधक सुदीपकुमार यांनी मांडले.

### पोषक वातावरण कुठे?

संपूर्ण देशाचा विचार करता, राजस्थान, गुजरात, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर महाराष्ट्र, विदर्भात सौरऊर्जा निर्मितीला अधिक पोषक वातावरण आहे. मोठे सरकारी किंवा खासगी सौरऊर्जा प्रकल्प उभारताना प्रकल्पाच्या ठिकाणाची निवड करताना सूर्यकिरणांच्या तीव्रतेचा अभ्यास करण्याची गरज आहे. भविष्यातही सूर्यकिरणांची तीव्रता कमी होण्याचा कल कायम राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान संशोधन आणि सेवा विभागाचे शास्त्रज्ञ बी. एल. सुदीपकुमार यांनी दिली.

# प्रज्वल रेवण्णांविरोधात महिला आयोगाची एसआयटी



बंगळुरू/प्रतिनिधी

कर्नाटकच्या सेक्स स्कँडलमध्ये भाजपा नेत्याने आज एक मोठा दावा केला आहे. २९०० हून अधिक अश्लील व्हिडीओंचा एक पेन ड्राईव्ह मिळाल्याचं भाजपाने म्हटलं आहे. या संपूर्ण प्रकरणात माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे नातू आणि खासदार प्रज्ज्वल रेवण्णांचं नाव समोर आलं आहे. ज्यामुळे कर्नाटकच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.


समोर आलेल्या माहितीनुसार २०२४ मध्ये होलनरसीपुरातले भाजपाचे उमेदवार देवराज गौडा यांनी बी. वाय. विजयेंद्र यांना एक पत्र लिहिलं होतं. ज्या पत्रात प्रज्ज्वल रेवण्णा आणि एच.डी. देवेगौडा यांच्या कुटुंबातील अनेक नेत्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. देवराज यांचं म्हणणं आहे की त्यांच्याकडे जो पेनड्राईव्ह आहेत त्यात २९७६ अश्लील व्हिडीओ आहेत. या व्हिडीओंमधल्या काही महिला सरकारी कर्मचारी असल्याचाही दावा करण्यात आला आहे. मि हलांचं लैंगिक शोषण सुरु ठेवण्यासाठी त्यांना ब्लॅकमेल करण्यासाठी या व्हिडीओंचा वापर केला जातो असंही देवराज यांनी म्हटलं आहे. तसंच भाजपाचे नेते देवराज यांनी हे म्हटलं आहे की पेनड्राईव्ह मधले काही फोटो आणि व्हिडीओ असे आहेत जे काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्यांकडेही गेले होते.

या व्हिडीओंमध्ये प्रज्ज्वल रेवण्णाच आहेत. कारण ते काही व्हिडीओंमध्ये दिसत आहेत. त्यांना त्यांच्या पक्षाने पक्षातून काढून टाकावं अशी मागणी मी करतो आहे. दुसरीकडे कर्नाटकच्या महिला आयोगानेही हे प्रकरण गांभीर्याने घेतलं आहे. कर्नाटक राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष नागलक्ष्मी चौधरी म्हणाल्या की या प्रकरणात आम्ही एसआयटी चौकशी सुरु केली आहे. एसआयटीमध्ये कुशल अधिकारी आहेत ते या प्रकरणाचा योग्य तपास करतील. तसंच मला पीडितांबाबत चिंता वाटते आहे असंही चौधरी यांनी म्हटलं आहे.

### कोण आहेत प्रज्वल रेवण्णा?

प्रज्ज्वल रेवण्णा हे देवेगौडा कुटुंबातल्या तिसऱ्या पिढीचे नेते आहेत. कर्नाटकचे पाटबंधारे विभागाचे मंत्री एच. डी. रेवण्णा यांचे ते पुत्र आहेत. एच. डी. रेवण्णा आणि एच. डी. कुमारस्वामी हे दोघं भाऊ आहेत. त्यामुळे कुमारस्वामी हे प्रज्ज्वल रेवण्णांचे काका आहेत. प्रज्ज्वल रेवण्णांनी बंगळुरुतल्या इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमधून मेडिकल इंजिनिअरिंग केलं आहे. राजकारणातही ते सक्रिय आहेत. पक्षाचे सचिव म्हणून प्रज्ज्वल रेवण्णांची नियुक्ती २०१९ मध्ये करण्यात आली. आता त्यांच्यावर सेक्स स्कँडल प्रकरणात सहभाग असल्याचे आरोप झाले आहेत.

# उपराजधानीत टोळीयुद्ध भडकले, चार तासांत दोन हत्याकांड



नागपूर/प्रतिनिधी

गुन्हेगारांनी पुन्हा एकदा तोंड वर काढले असून उपराजधानीत गुन्हेगारांमध्ये टोळीयुद्ध भडकले आहे. गेल्या चोवीस तासांत शहरात दोन हत्याकांड उघडकीस आले आहे. पारडीत गुन्हेगारांच्या टोळीने प्रतिस्पर्धी टोळीवर तलवारीने हल्ला चढवला. एका युवकाचा भरचौकात खून करून पलायने केले. तर दुसऱ्या घटनेत, दारुड्या भावानेच थोरल्या भावाच्या गळा चिरून खून केल्याची घटना तहसीलमध्ये उघडकीस आली.

कुख्यात गुन्हेगार काल्या ऊर्फ नंदकिशोर देविदास कुंभलकर (३७,भवानीनगर, पारडी) आणि रोहित डांगे (२८, गंगाबाग) यांच्या दोघांत वर्चस्वावरून वाद सुरु होता. त्यामुळे रोहितचा काटा काढण्याचा कट काल्याच्या टोळीने रचला होता. गेल्या काही दिवसांपासून रोहितसाठी सापळा रचून खून करण्याचा प्रयत्न काल्या करीत होता.

मात्र, रोहित त्यांच्या हाती लागत नव्हता. काल्या साथीदार गौरव संजय कालेश्वरवार (२७), राज मणिराम कुंटलवार (३१, दोघेही रा. प्रेमनगर, झेंडाचौक) आणि शुभम कमलकिशोर भेलेकर (गंगाबाग, पारडी) यांच्यासह रोहितचा शोध घेत होता.

चारही आरोपी कारने भवानीनगरातील मानकरवाडी मैदानावर पोहचले. तेथे रोहितचा भाऊ रोहन देवीलाल डांगे (२४, गंगाबाग) हा दिसला. त्याच्यासोबत राज सुधीर रामटेके आणि आनंद योगींदरनाथ पाठक हे दोघेही तेथे होते. चारही आरोपींनी कारमधून उतरून रोहनला घेरले. त्याच्या पोटाला चाकू लावला आणि 'तुझा भाऊ रोहित कुठे आहे?, त्याचा आज काटा काढायचा आहे, त्याला येथे बोलाव' अशी धमकी दिली. मात्र, भावाचा जीव जाण्याच्या भीतीने रोहनने भावाला बोलविण्यास नकार दिला. त्यामुळे आरोपींनी त्याच्यावर भरचौकात हल्ला करून ठार केले. दरम्यान, मित्र आनंद आणि राज हे दोघेही तेथून पळाले आणि थेट रोहितकडे गेले. रोहनवर हल्ला करीत असल्याची माहिती दिली. त्यामुळे रोहित हा धावतच घटनास्थळावर गेला. मात्र, तोपर्यंत आरोपींनी तेथून पळ काढला होता. या प्रकरणी पारडी पोलिसांनी चार आरोपींवर गुन्हे दाखल करून आरोपींचा शोध सुरु केला आहे.

दुसऱ्या घटनेत, आईला शिवीगाळ केल्यामुळे चिडलेला मुलगा गौरव गोखे (टिमकी) याने मोठा भाऊ दिलीप गोखे याच्याशी वाद घातला. दिलीपने लहान भाऊ गौरवचा गळा चिरून खून केला. हे हत्याकांड रविवारी रात्री नऊ वाजता तहसीलमध्ये घडले.

# भाजपाचे माजी केंद्रीय मंत्री व्ही श्रीनिवास प्रसाद यांचे निधन



**चामराजनगर :** कर्नाटक चामराजनगरचे भाजपा खासदार व्ही श्रीनिवास प्रसाद यांचं रविवारी मध्यरात्री बंगळुरुतील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वा घेतला. गेल्या चार दिवसांपासून ते आयसीयूमध्ये दाखल होते.

माजी केंद्रीय मंत्री आणि विद्यमान खासदार व्ही श्रीनिवास प्रसाद अनेक आजारांनी ग्रस्त होते. २२ एप्रिल रोजी त्यांना बंगळुरूतील मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मल्टी ऑर्गन फेल्युअरमुळे त्यांचं निधन झालं. अंत्यदर्शनासाठी त्यांचं पार्थिव मैसुरू येथील जयलक्ष्मीपुरम आवास येथे आणलं जाईल.

व्ही. श्रीनिवास प्रसाद यांनी १९७६ मध्ये जनता पक्षातून आपली राजकीय कारकीर्द सुरू केली. पुढे १९७९ मध्ये त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. इतकेच नाही तर ते काही काळ जेडीएस, जेडीयू आणि समता पक्षाचे सदस्यही होते. नंतर त्यांनी भाजपमध्ये प्रवेशही केला. श्रीनिवास यांनी केंद्र सरकारपासून राज्यापर्यंत अनेक महत्त्वाची पदे दीर्घकाळ भूषवली. १९९९ ते २००४ दरम्यान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांनी केंद्रीय राज्यमंत्रीपद भूषवले. नंतर, काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर ते २०१३ मध्ये आमदार झाले आणि सिद्धरामय्या सरकारमध्ये मंत्री झाले. २०१६ मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. २०१७ च्या पोटनिवडणुकीत, त्यांनी भाजपच्या तिकिटावर नंजनगुडमधून निवडणूक लढवली होती, परंतु नंतर २०१९ मध्ये पक्षाने श्रीनिवास यांना चामराजनगरमधून लोकसभा निवडणूक लढवायला लावली, जिथून ते विजयी झाले.

# पश्चिम विदर्भात जलसंकट, ६.२४ टक्के साठा कमी

अकोला/प्रतिनिधी

पश्चिम विदर्भातील सिंचन प्रकल्पांमधील जलसाठ्यात घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत सर्व प्रकारच्या प्रकल्पांमध्ये जलसाठ्यात ६.२४ टक्क्यांनी जलसाठा कमी आहे. गत वर्षी आजच्या दिवशी अमरावती विभागातील प्रकल्पांमध्ये ५०.८७ टक्के जलसाठा होता. यावर्षी मात्र त्यात घट होऊन सध्या ४४.६३ टक्के जलसाठा उपलब्ध आहे.

पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावतीसह पाच जिल्ह्यांमध्ये येणाऱ्या मोठ्या, मध्यम व लघू प्रकल्पांमध्ये गत वर्षीच्या तुलनेत यंदा कमी जलसाठा उपलब्ध आहे. अमरावती विभागात मोठे प्रकल्पांची संख्या १० असून त्यामध्ये एकूण २९५३.८८ द.ल.घ.मी. पाणी साठ्याची क्षमता आहे. त्यापैकी सद्यस्थितीत ९४४.०६ उपयुक्त जलसाठा असून एकूण १५१०.२२ द.ल.घ.मी. जलसाठा उपलब्ध आहे. एकूण क्षमतेच्या ३९.९४ टक्के हा जलसाठा आहे. गेल्या वर्षी २८ एप्रिलला विभागातील मो ठ्या प्रकल्पांमध्ये ४६.५५ टक्के जलसाठा होता. विभागात २५ मध्यम प्रकल्प आहेत. त्याची एकूण क्षमता ७८४.११ द.ल.घ.मी. आहे. सद्यस्थितीत मध्यम प्रकल्पांमध्ये ३५०.१० द.ल.घ.मी. उपयुक्त



व एकूण ४५७.१३ द.ल.घ.मी. पाणीसाठा उपलब्ध आहे. त्याची टक्केवारी ५१.७१ आहे. गेल्या वर्षी याच दिवशी मध्यम प्रकल्पांमध्ये ५९.०७ टक्के जलसाठा होता. लघू प्रकल्पांचा विचार करायचा झाल्यास विभागात २२६ प्रकल्प असून त्याची एकूण क्षमता ८११.५९ द.ल.घ.मी. आहे. त्यापैकी ३९०.६२ उपयुक्त जलसाठा असून एकूण ४६८.४४ द.ल.घ.मी. जलसाठा उपलब्ध आहे. लघू प्रकल्पांमध्ये ५३.२३ टक्के जलसाठा असून गेल्या वर्षी ५७.२४ टक्के जलसाठा उपलब्ध होता.

### खडकपूर्णामध्ये शुन्य टक्के जलसाठा

अमरावती विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा प्रकल्पात २४.४६ टक्के, वान ३७.५३ टक्के, अमरावती जिल्ह्यातील ऊर्ध्व वर्धा ४९.६२ टक्के, बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा शुन्य टक्के, नळगंगा २६.४९ टक्के, पेनटाकळी १६.२१ टक्के, यवतमाळ जिल्ह्यातील अरुणावती ४१.७७ टक्के, बेंबळा ३६.४९ टक्के, इसापूर ४१.६४ टक्के आणि पूस प्रकल्पात ४९.११ टक्के जलसाठा उपलब्ध आहे.

### मोठ्या प्रकल्पांमध्ये जलसाठा कमीच

पश्चिम विदर्भातील मध्यम व लघु प्रकल्पांपेक्षा टक्केवारीमध्ये मोठ्या प्रकल्पांमध्ये जलसाठा कमी असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. मोठ्या प्रकल्पांमध्ये ३९.९४ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. मध्यम प्रकल्पांमध्ये ५१.७१, तर लघू प्रकल्पांमध्ये ५३.२३ टक्के जलसाठा आहे. गेल्यावर्षीची तुलना केल्यास पश्चिम विदर्भातील मोठ्या प्रकल्पांमध्ये ९.६१ टक्के, मध्यम ७.३१ टक्के व लघु प्रकल्पांमध्ये ४.०१ टक्के जलसाठा कमी असल्याचे दिसून येत आहे.

## संक्षिप्त वृत्त




### म्युझिकल चेअर चॅम्पियनशिपमध्ये फिनिक्स शाळेचे यश

**बार्शी** : द म्युझिकल चेअर अँड स्केटिंग स्पोर्ट्स असोसिएशन गुजरात द्वारा आयोजित नॅशनल फेडरेशन रोलर म्युझिकल चेअर चॅम्पियनशिप - २०२४ मध्ये बार्शीतील मुलांनी यश संपादन केले. दि. २७ व २८ एप्रिल रोजी या स्पर्धा अहमदाबाद येथे पार पडल्या. स्केटिंगसह संगीत खुर्ची, स्केटिंगशिवाय संगीत खुर्ची व स्केटिंगसह फ्री स्टाईल या तीन प्रकारांमध्ये स्पर्धा आयोजित केली होती. प्रियंका येडलवार यांच्यामार्फत मुलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यशस्वी मुले व पदके : वेदांत बर्डे - सुवर्ण १, रौप्य २, अर्णव कुलकर्णी - सुवर्ण २, रौप्य १, अथर्व केसकर -रौप्य २, कांस्य १, रामराजे बारंगुळे - सुवर्ण १, रौप्य १ आणि कांस्य १, सोहम सावंत -सुवर्ण ३, कार्तिकेय पवार - सुवर्ण ३, महाराष्ट्राला उपविजेता ट्रॉफी देशभरातून विविध राज्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पदक व प्राप्त गुणांकांवरून महाराष्ट्राला उपविजेतेपद प्राप्त झाले. प्रियंका येडलवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केले.

### वीरशैव प्रतिष्ठानच्या बसवेश्वर जयंती उत्सव अध्यक्षपदी मनगुळी

**कार्याध्यक्षपदी शशिकांत बिराजदार**




**सोलापूर** : महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्या उत्सव समिती अध्यक्षपदी आप्पासाहेब मनगुळी यांची तर कार्याध्यक्षपदी शशिकांत बिराजदार यांची निवड करण्यात आली. माजी पोलीस उपायुक्त दीपक आर्वे यांच्या अध्यक्षतेखाली व सामाजिक कार्यकर्ते सुदीप चाकोते, सिद्धया स्वामी हिरेमठ, जंगम समाजाचे जिल्हाध्यक्ष राजशेखर कंदलगावकर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राज शेखर विजापुरे आदींच्या उपस्थितीत आयोजित बैठकीत पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष राचप्पा आरळीमार, आशुतोष पुरवंत, खजिनदार विजयकुमार तंबाके, सांस्कृतिक प्रमुख सुनील रामशेट्टी, शिवानंद बळोळी अशानिवडी करण्यात आल्या. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सिद्धया स्वामी यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्लेश पुरवंत यांनी केले. प्रास्ताविक मंगेश स्वामी यांनी केले. आभार सोमा शरणार्थी यांनी मानले.

### वाढत्या उष्म्यामुळे दुपारी सुंदरमनगरमधील दुकाने बंद

**सोलापूर** : सोलापूर शहरात सध्या कडक उन पडत आहे. रविवारी (दि.२८) तर उन्हाचा तडाखा खूपच दाहक होता. रविवारी यंदाचे उन्हाळ्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. परिणामी सुंदरमनगर भागात दुपारी बहुतांश दुकाने बंद छेवली होती. शहर परिसरात रविवारी ४३.७ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. दुपारी तर उष्मा इतका असह्य झाला होता की, विजापूर रोड परिसरातील सुंदरम नगर, अमृतनगर, आरटीओ कार्यालय परिसर, आंबेडकर चौक परिसरात सर्व रस्त्यांवर शुकशुकाट दिसून आला.
नागरिकांनी घरात पंखा लावून विश्रांती घेण्यातच आनंद मानला. रस्त्यावर गर्दी नसल्याने बहुतांश दुकानदारांनीही दुपारी १२:३० ते ४:३० या वेळेत दुकाने बंद ठेवण्यातच समाधान मानले. काही आवश्यक कामानिमित्त बाहेर पडावे लागलेल्या लोकांनी शीतपेयाचा आधार घेत उष्णेतेचे शमन केले.

### पिलीव परिसरात प्रथमच तापमानात प्रचंड वाढ

**तापमान ४१ अंशापर्यंत पोहचले**




**पिलीव** : पिलीव परिसरात गेल्या दोन तीन दिवसापासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. सूर्य आग ओकत असल्याने ऊन व उकाड्यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.
एप्रिल महिन्यात तापमान एवढे कधीही पहावयास मिळाले नव्हते. पण सोलापूरनंतर पिलीव परीसरात प्रथमच तापमान ४१ पर्यंत पोहचले आहे. यामुळे जनता, पशु-पक्षी अक्षरशः हैराण झाले आहेत. तापमानाचा शरीरावर प्रतिकुल परिणाम जाणवत आहे. लहान बालके, वयोवृद्धांना प्रचंड त्रास होत आहे. दुपारी नागरिक झाडाच्या सावलीचा आधार घेत आहेत. तसेच थंड पेये, सरबत, लस्सी, ताक, ऊसाचा रस, ज्यूस पिण्याकडे नागरिकांचा मोठा कल आहे. दिवस त्रासात घालविल्यानंतर रात्री झोपण्यासाठी घराच्या गच्चीचा किंवा घरासमोरील अंगणाचा वापर केला जात आहे. त्यातच एक दोन अवकाळी पाऊस झाल्यामुळे तापमानात वाढ झाल्याचे बोलले जात आहे. अजून किमान महिनाभर हा त्रास नागरिकांना सहन करावा लागणार आहे. मात्र, वाढलेल्या तापमानामुळे जीवनमानावर विपरीत परिणाम होत आहे.

# तब्बल ३६० पोती कोळसा जप्त

## सांगोला येथे विनापरवाना कोळसा वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई



**सांगोला/प्रतिनिधी**

**वनपरिक्षेत्र सांगोल्यामध्ये दिवसा गस्तीदरम्यान वाढेगाव ते पुणे रस्त्यावर अवैध पद्धतीने वाहतूक होत असलेली ३६० कोळसा पोती वाहनांसह जप्त करण्यात आली. सांगोला वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली.**

----------------------------

हा आयसर टेम्पो काळ्या ताडपत्रीने कोळसा पोती बांधून वाहतूक करीत होता. वाहनचालक आप्पासो काकडे यांना वनपाल सांगोला यांनी कोळसा वाहतूक पास परवाना विचारला असता त्याने नसल्याचे सांगितले. ही कोळसा पोती ३६० वाढेगाव येथून पुणे येथे अवैध वाहतूक होत होती. ही ३६० कोळसा पोती ही सचिन बंडगर (रा. अनकढाळ, ता. सांगोला) या कोळसा व्यापाऱ्याची आहेत. मी वाहतूक भाडे करित होतो, असे वाहनचालक आप्पासो काकडे याने सांगितले. अवैध कोळसा पोती ३६० त्याचे वजन ९ हजार किलो आहे.

बाजारभावप्रमाणे अंदाजे किंमत दोन लाख रुपये आहे. हा कोळसा मालकी क्षेत्रातील आहे. वाढेगाव येथे वनविभागाचे वनक्षेत्र नाही. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला तुकाराम जाधवर करत आहेत.

ही कारवाई मुख्यवनसंरक्षक पुणे एन. आर. प्रविण, उपवनसंरक्षक सोलापूर धैर्यशील पाटील, सहाय्यक वनसंरक्षक बी. जी. हाके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला तुकाराम जाधवर, वनपाल सांगोला एस. एल. मुंढे, वनरक्षक कटफळ आर. व्ही. कवठाळे व हंगामी वाहन चालक संकेत बाबर यांनी केली.

**परवान्याशिवाय कोळसा वाहतुकीवर कारवाई करणार**

वृक्षतोडीसाठी वृक्षतोड परवाना घेणे, कोळसा वाहतूक करणेसाठी वनविभागाचा वाहतूक पास घेणे आवश्यक आहे. अन्यथा कारवाई केली जाईल असे वनपरिक्षेत्र अधिकारी सांगोला तुकाराम जाधवर यांनी सांगितले.

### प्रादेशिक परिवहनचे ८ मेपर्यंत शिबीर

**सोलापूर** : प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील तालुक्यांमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी शिबीर कार्यालय भरविण्यात येते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कामकाजामुळे शासकीय विश्रामगृह शिबीर कार्यालयासाठी उपलब्ध होत नसल्याने दि. १ ते ८ मे पर्यंत शिबीर कार्यालय भरविले जाणार नाही. दि. ९ मे पासून शिबीर कार्यालय नियमित चालू राहतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी कळविले आहे.

# गृहप्रवेश समारंभात संविधानाची प्रत भेट

**सारोळे येथील शिक्षकाचा उपक्रम**

**मोहोळ/प्रतिनिधी**

गृहप्रवेश समारंभात आलेल्या पाहुण्यांना आहेर म्हणून भारतीय संविधानाची शासकीय प्रत भेट देण्यात आली. सारोळे (ता. मोहोळ) येथील युवराज भोसले यांनी ही अनोखी भेट दिली.

युवराज भोसले यांच्या नवीन घराचा गृहप्रवेश सोहळा नुकताच झाला. यावेळी कपडे, साडी, टॉवेल-टोपी किंवा इतर वस्तु भेट म्हणून दिल्या जातात. परंतु भोसले हे स्वतः शिक्षक आहेत. त्यांनी आधुनिक दृष्टिकोन बाळगला. प्रत्येक पाहुण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. कार्यक्रम महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचे संस्थापक आण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली केल्याचे भोसले यांनी सांगितले.

देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षे होऊन गेली तरीही सामान्य नागरिकांना याबाबत व्यवस्थित माहिती नाही म्हणून हा उपक्रम आम्ही राबवत असल्याचे आण्णासाहेब भालशंकर यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य श्रीधर उन्हाळे, बोधीप्रकाश गायकवाड, शत्रुघ्न बाबर, प्रकाश शिंदे, अनिल शिंगाडे, रमेश लोखंडे, राष्ट्रीय पंच हॉलीबॉल व रॉकबॉल असोसिएशन राजेंद्र मागाडे, उद्योजक विजय सरवदे, ॲड. पांडुरंग माने, ॲड. विनोद कांबळे, सरपंच शाहीर सलगर, राजा शिंगाडे, संतोष लादे, बौद्धाचार्य मनोज एकमले, अमोल कथले, गर्जेंद्र शिंगाडे आदींसह प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी बाळासाहेब भोसले, प्रा. संतोष कांबळे, बिभीषण लादे, रोहित मागाडे, ब्रह्मदेव लादे, विष्णू लादे, अभिजीत गायकवाड, हर्षवर्धन भोसले आदींनी परिश्रम घेतले.



**सोलापूर : गृहप्रवेश कार्यक्रमात आलेल्या पाहुण्यांना भारतीय संविधानाची भेट देताना सारोळे येथील युवराज भोसले. यावेळी उपस्थित अन्य मान्यवर.**

> संविधानात दिलेले अधिकार सामान्य माणसाला वाचावयास मिळणे गरजेचे वाटले म्हणून हा निर्णय घेतला.
> **- युवराज भोसले.**

# सिंहगडच्या विद्यार्थ्यांची उद्योगाला भेट

**पंढरपूर/प्रतिनिधी**

कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एसकेएन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील सिव्हिल इंजिनिअरिंगमधील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी मंगळवारी (दि. २७) पंढरपूर येथील वासवी टाईल्स व टेक्सटाइल भेट दिल्याचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी इंडस्ट्रिअल शेडची व टाईल्स खरेदी विक्रीची सर्व माहिती जाणून घेतली. तसेच त्यासाठी लागणारी उपकरणे, भांडवल व प्रक्रिया याबद्दल माहिती संग्रहित केली.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नास समर्पक उत्तरे उपस्थित अधिकारी राहुल गायकवाड यांनी दिली. याशिवाय इंडस्ट्रिअल शेड एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. निसर्गात उपलब्ध असलेल्या घटकांचा योग्य उपयोग करून स्टील तयार केले जाते. ते सिव्हिल इंजिनियरिंगमधील एक मुख्य घटक आहे. शेडवर येणारे लोड, टेन्शन मेंबर, पूर्लिन, स्टील कॉलम आदींचीही घेतली.

कार्यक्रमासाठी सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. श्रीगणेश कदम, प्रा. सिद्धेश पवार आदींसह सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**सोलापूर : एस.के.एन. सिंहगड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पंढरपुरमधील वासवी टाईल्स उद्योगाला भेट दिली. तसेच तेथील व्यवस्थापकांकडून उत्पादन निर्मितीची माहिती घेतली.**



**ऋषभ कावडे याला शुभेच्छा देताना उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे, सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे.**

# ऋषभ कावडेची भारतीय संघात निवड

**नातेपुते/प्रतिनिधी**

महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्यावतीने नागपूर येथे महाराष्ट्र संघाची निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. ही निवड चाचणी स्पर्धा तामिळनाडू येथे आयोजित केली होती.

**आशियाई टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा**

स्पर्धेमध्ये भारतातून २५ राज्यातून संघ सहभागी झाले होते. यामध्ये शिखर शिंगणापूर येथील ऋषभ कावडे याने यश संपादन केले. त्याची भारतीय टेनिस बॉल क्रिकेट संघामध्ये क्रिकेट स्पर्धा खेळण्यासाठी निवड करण्यात आली. स्पर्धा दि. ३ मे ते ७ मे रोजी (बँकॉक) थायलंड येथे होणार आहे.

यशाबद्दल माण, खटाव तालुक्याच्या उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे, दहिवडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, भारतीय टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव मॉन्टी लॉरी, सातारा जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर, महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव महंमद बाबर, उद्योजक अतुल शिंदे, अतुल जाधव, शंकर तांबवे, उपसरपंच राजू पिसे, रमेश भागवत, डि. के. बडवे या मान्यवरांनी सत्कार करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शिखर शिंगणापूरसारख्या ग्रामीण भागात राहून टेनिस बॉल क्रिकेट खेळामध्ये उत्कृष्ट सराव करून ऋषभ कवडे यांनी यश संपादन केल्यामुळे त्याचे शिंगणापूर व पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे.

### बार असो. साठी ८७.१७ टक्के मतदान

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा बार असोसिएशनमधील अध्यक्ष, सचिवपदासाठी सोमवारी (दि. २९) ८७.१७ टक्के मतदान झाले. निवडणुकीत १८३१ पैकी १५९७ वकिलांनी १९ उमेदवारांसाठी मतदानाचा हक्क बजावला आहे. मतमोजणी ३ मे रोजी स. ९ वा. होणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. सुरेश गायकवाड यांनी दिली. परिवर्तन पॅनल अध्यक्ष पदासाठी राजेंद्र फताटे, उपाध्यक्ष पदासाठी परवेझ ढालायत, सहसचिव सुवर्णा शिंदे, खजिनदार प्रकाश अभंगे, विधी सेवा पॅनलतर्फे अध्यक्षपदासाठी अमित आळंगे, उपाध्यक्षपदासाठी जयप्रकाश भंडारे, सचिव पदासाठी लक्ष्मण पाटील, सहसचिव पदासाठी निदा सैफन, खजिनदार पदासाठी विनायकुमार कटारे, विधी व्यासपीठ पॅनलतर्फे अध्यक्षपदासाठी उजळंबे, उपाध्यक्षपदासाठी शिंदे, सहसचिव पदासाठी मिरा प्रसाद, खजिनदारपदासाठी अब्दुल शेख यांच्यासाठी मतदान झाले.

# मुलांना मामाच्या गावाचा विसर

**उन्हाळ्याच्या सुट्टीत मैदानी खेळांनांही फाटा**

**चिखली/प्रतिनिधी**

बालपणी मामाचा गाव हा खूप जिव्हाळ्याचा विषय होता. दिवसभर विविध खेळ खेळल्यानंतर दुपारी विहिरीत किंवा तलावात मनसोक्त डुंबल्यानंतर सायंकाळी अंगणात गप्पा व पंगत असा आनंद असायचा. मात्र, सध्या मुलांना मामाच्या गावाची ओढ राहिली नसल्याचे दिसून येत आहे.

पूर्वी परीक्षा आटोपताच सुट्ट्यांमध्ये मुले मामांच्या गावाला हमखास जायची. सुट्ट्यांमध्ये धमाल व्हायची? परंतु काळाच्या ओघात मामांचे गाव हरपू लागले आहे.

समर कॅम्प, मोबाइल, टीव्ही आणि बंद संस्कृतीमध्ये सिमेंटच्या जंगलात मुलेही चार भिंतीच्या आत बंदीस्त झाली आहेत. मोकळ्या मैदानाऐवजी घरातच खेळ खेळण्यावर भर दिला जात आहे. शिक्षणक्षेत्रात वाढलेल्या स्पर्धेमुळे आई-वडील सुट्ट्यांमध्येही मुलांना पूर्वीसारखे रिकामे राहू देत नाही. स्पोर्ट्स कल्चरल ॲक्टिव्हिटीज, स्वीमिंग, स्पोकन, पेंटींग क्लास व उन्हाळी शिबिरात व्यस्त झाल्याने आता त्यांना आजोळी आणि मामाच्या गावी जाण्यासाठी उसंत नाही. उरलेली वेळ ते टीव्ही आणि मोबाइल पाहण्यात घालवितात. पूर्वी बाहेर निघत असत. परंतु बदलत्या काळात संगणक व व्हिडिओ गेमचाच बोलबाला अधिक आहे.

काळाच्या ओघात पारंपरिक खेळ आता इतिहासजमा झाले. जुने खेळ लोप पावून नवीन नवीन खेळ पुढे येत असले तरी आजही आपल्या नातवाने उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाच्या गावाला जावे, अशी बहुतांश आजीची इच्छा आहे. परंतु अलिकडील काळात मामा भाच्याच्या प्रेमाला बंधने येत असल्याचे चित्र समोर येत आहे. ग्रामीण भागातल्या मुलांनाही सुट्ट्यांमध्ये मामाच्या गावाला जायची गंमत आता राहिलेली नाही.

**मुलांमधील आत्मविश्वास गमावल्याची भावना**

भारंभार क्लास, ॲक्टिव्हीटीज यामुळे मुले यंत्रासारखी झाली आहेत. मर्यादित छोटा परिवार राहिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास गमावल्यासारखे वाटत आहे. मामाचे गाव आणि सोबतच शुध्द हवा आणि आकाशातील चंद्र तारे पण हरवलेले दिसत असल्याचे अनेकांनी 'सुराज्य'शी बोलताना सांगितले.



## संक्षिप्त वृत्त

### कुंभारी घरकुल येथे मूर्तिकाराचा चाकू, दगडाने डोके ठेचून खून

**सोलापूर :** दुचाकीवरून रात्री घराकडे जात असताना दुचाकी वरील चौघा इसमांनी मिळून एका ३२ वर्षीय तरुण मूर्तिकाराचा चाकूने भोसकून आणि डोक्यात दगड टाकून खून केला. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) घरकुल परिसरात क्रांती चौक भाजी मार्केट जवळ शनिवारी (दि.२७) रात्रीच्या सुमारास घडली. विनायक उर्फ हर्षल बाळकृष्ण बोज्जा (वय ३२ रा.अ विभाग विडी घरकुल कुंभारी) असे मयताचे नाव आहे. तो मूर्ती तयार करण्याचे काम करीत होता. शनिवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास तो आपल्या दुचाकीवरून घराकडे जात होता. त्यावेळी स्वराज तरुण मंडळ येथील गणपती मंदिर समोरील मैदानात दोन दुचाकीवरून आलेल्या चौघांनी त्याला वाटेत अडवले. एकाने त्याच्या छातीत चाकू खूपसला. तो खाली पडल्यानंतर तर इतर आरोपींनी त्याला आपल्या दुचाकीवरून क्रांती चौक भाजी मंडई येथे रस्त्यावर आणून फेकून दिले. आणि त्याच्या डोक्यात दगड टाकून खून करून पसार झाले. घटनेची फिर्याद मृताची आई राधाबाई बाळकृष्ण बोज्जा (वय ६६ रा.अ विभाग घरकुल, कुंभारी) यांनी वळसंग पोलिसात दाखल केली. पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक सनगल्ले पुढील तपास करीत आहेत.

### स्वखर्चाने मतदान केंद्रावर जाण्यास शिक्षकांचा नकार

**सोलापूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता सोलापूर जिल्ह्यात सोलापूर व माढा या दोन मतदार संघात ७ मे २०२४ रोजी मतदान पार पडणार आहे. या मतदानाकरिता मतदान अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यातील खासगी व्यवस्थापनाच्या प्राथमिक माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज मधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मतदान कार्यासाठी ड्युटी देण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या स्थानिक विधानसभा मतदार संघातून इतर विधानसभा मतदारसंघात त्यांना ड्युटी बजावावी लागणार आहे. ६ मे २०२४ रोजी कर्मचाऱ्यांना नियुक्त केलेल्या विधानसभा मतदारसंघात सकाळी ८ वाजता स्वखर्चाने व स्वतःच्या वाहनाने उपस्थित राहण्याविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या अगोदरच्या सर्व निवडणूक कामासाठी कर्मचाऱ्यांना एसटी बसने सुरक्षित व वेळेवर निवडणुकीसाठी नियुक्त असणाऱ्या विधानसभा मतदारसंघात घेऊन जाण्यात येत होते. यावेळी स्वतःच्या किंवा खासगी वाहनांच्या मदतीने नियुक्त मतदारसंघात येण्यास सांगितल्याने कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ६ मे रोजी सकाळी ८ वाजता नियुक्त केलेल्या विधानसभा मतदारसंघात जायचे असल्याने कर्मचाऱ्यांची धावपळ होणार आहे तसेच निवडणूक कामाच्या विशिष्ट ताणतणावामुळे प्रवासादरम्यान सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार आहे. जिल्ह्यातील खासगी शिक्षकांच्या मागणीवरून शिक्षक भारती सोलापूर यांच्यावतीने जिल्हा अधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास कर्मचाऱ्यांना प्रवासाकरिता शासनाच्या एसटी बस ची सुविधा पूर्वीप्रमाणे उपलब्ध करून देण्याविषयी निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे, उपाध्यक्ष रियाजअहमद अत्तार, शाहू बाबर, शशि पाटील, अमोल तावसकर, देवदत्त मेटकरी, नितीन रुपनर, शरद पवार, मायाप्पा हाके आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तुंगत येथे प्राण्याच्या हल्ल्यात १५ शेळ्यांचा मृत्यू

## १ लाख ५० हजारांचे नुकसान

**पंढरपूर/प्रतिनिधी**

तुंगत (ता.पंढरपूर) येथील शेतकरी संदिप सदाशिव कांबळे यांच्या शेतात बांधलेल्या शेळ्या व बोकडांवर रविवारी (दि.२८) रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान वन्यप्राण्यांनी हल्ला केला. हल्ल्यात १५ शेळ्या व बोकडे मृत्युमुखी पडली आहेत. हल्ल्यामुळे या परिसरात सध्या भितीचे वातावरण पसरले आहे.

संदिप कांबळे हे शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेळीपालन करुन उपजिवीका करतात. रविवारी (दि.२८) काम उरकुन शेळ्या शेतात बांधल्या होत्या. रात्री अकराच्यापुढे हा हल्ला झाला. शेळ्या व बोकडांच्या गळ्यावरच वन्यप्राण्याने हल्ला केल्याने शेळ्या व



घटनास्थस्थळाची पाहणी करताना वनविभागाचे अधिकारी, उपसरपंच, ग्रमसेवक, पोलिस पाटील व आदी.

बोकडे जागेवरच मृत्युमुखी पडले आहेत. वस्तीपासून बांधलेल्या शेळ्या दूर असल्याने आवाज ऐकु आला नाही. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आली आहे.

घटनास्थळी वनविभाग पंढरपूरचे अधिकारी पोहोचले. त्यांनी पंचनामा व जबाब नोंदवून घेतला आहे. बी.एस. भोई वनपाल पंढरपूर, टी.एस.दिघे वनसंरक्षक करकंब, बी.टी.वाघमारे वाहनचालक, दिलखुश मुलाणी वनसेवक, उपसरपंच प्रकाश रणदिवे, ग्रामपंचायत सदस्य अंगद रणदिवे, पोलीस पाटील साधना देठे, ग्रामसेवक संतोष पाटील, डॉ.अनिल शिंदे, पशुवैद्यकीय अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आहे.

हल्ल्यामुळे या परिसरातील पशुपालक व नागरिकांमध्ये भिती पसरली आहे. तात्काळ वन्यप्राण्यास जेरबंद करण्याची मागणी पशुपालकांमधून होत आहे.

#### एक लाख ५० हजारांचे नुकसान

वन्यप्रण्याच्या हल्ल्यात ९ शेळ्या, २ बोकडे मृत्युमुखी पडली आहेत. तर २ बोकडे व २ शेळ्या गायब झाल्या आहेत. झालेल्या हल्ल्यामुळे माझे जवळपास १ लाख ५० हजारांचे नुकसान झाले आहे. माझी गरीब परिस्थिती असून यामुळे माझे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वनविभागाने तात्काळ कार्यवाही करुन मला नुकसान भरपाई द्यावी.

– **संदिप कांबळे,** पशुपालक, तुंगत ता.पंढरपूर

#### वन्यप्राण्याचा बंदोबस्त करण्यात येईल

घटनास्थळाची पाहणी केली आहे. पशुपालकाचा जबाब व पंचनामा नोंदवून घेतला आहे. नुकसान भरपाईसाठी वनविभागाकडून प्रयत्न करण्यात येणार आहे. याबाबत पशुपालकास मार्गदर्शन व माहिती दिली आहे. पशुपालकांनी जनावरे, शेळ्या बंदिस्त गोठ्यात बांधाव्यात. वस्तीपासून जनावरे लांब बांधू नयेत. वन्यप्राण्याचा बंदोबस्त लवकरच होईल.

– **बी.एस.भोई,** वनपाल,वनविभाग,पंढरपूर.

# जि.प. शाळेत गणवेशाबरोबर आता बूट, पायमोजेही

## राज्यातील ४४ लाख मुला मुलींना मिळणार लाभ


### समग्र शिक्षा अभियानातून आर्थिक तरतूद

**सोलापूर/बळीराम सर्वगोड**

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पुढील वर्षापासून गणवेशाबरोबर बूट आणि पायमोजेही देण्यात येणार आहेत. त्यासाठी समग्र शिक्षा अभियानाच्या बजेटमध्ये राज्य सरकारकडून बजेटमध्ये आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या वतीने यासंदर्भात राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या सूचना केल्या आहेत. दरवर्षी समग्र शिक्षा अभियानातून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिले जातात. परंतु राज्य सरकारने आता बूट आणि पायमोजे देण्याचीही तयारी दर्शवली आहे. शासकीय शाळा, जिल्हा परिषद ,नगर परिषद, महापालिका शाळांमध्ये शिकणाऱ्या ४४ लाख ६०,००० मुला मुलींना हा लाभ मिळणार आहे.

अनुदानित शाळांना मोफत गणेश आणि बुटांचा लाभ सरकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये ४४ लाख ४०० विद्यार्थ्यांना दिला जाईल. प्रत्यक्षात राज्यात ८५ हजार १८०६ शाळांमध्ये पहिली ते आठवी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या नऊ कोटी दोन लाख ६१ हजार ७० अशी आहे. त्यातील अनुदानित श्रेय अर्थसहाय्यता शाळांमधील ५८ लाख ६६ विद्यार्थ्यांना या योजनेच्या लाभ होणार आहे.



#### दरवर्षी एक जोडी बूट, दोन जोड्या पायमोजे

प्रतिवर्षी एक जोडी बूट आणि दोन जोड्या पायमोजे मिळणार आहेत. त्याच्या खरेदीसाठी प्रति विद्यार्थी १७० रुपये असे दर निश्चित केले आहेत. १५ जूनला उर्वरित महाराष्ट्र, एक जुलै रोजी विदर्भातील शाळा सुरू होणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेशाचा किट देता यावेत या दृष्टीने निर्देश देण्यात आले आहेत.

# मोदींच्या सभेनिमित्त माळशिरसमधील वाहतूक मार्गात बदल

## पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांची माहिती

**माळशिरस/प्रतिनिधी**

भाजपा माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मंगळवारी (दि.३०) माळशिरस दौऱ्यावर येत आहेत. त्यानिमित्त वाहतूक मार्गात बदल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिलेल्या माहितीनूसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने सभेस येणाऱ्या नागरिकांची सखोल तपासणी होणार आहे. पंतप्रधानांच्या आगमनाची वेळ सकाळी १०.५५ असल्याने तपासणीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सकाळी ६.३० वाजल्यापासून सभास्थळी पोहोचण्याची मुभा देण्यात आली आहे. तसेच पंतप्रधानाच्या आगमनापूर्वी किमान एक तास अगोदर नागरिकांनी स्थानापन्न होण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. सभेस येताना मोठ्या बॅगा, पाण्याच्या बॉटल, खाद्यपदार्थ, ज्वालाग्रही पदार्थ तसेच विडी, सिगारेट, गुटखा असे पदार्थ सोबत आणण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

**वाहतूक मार्गात बदल**

नातेपुते कडून माळशिरस ते अकलूज जाणारा रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. यासाठी पर्यायी मार्ग म्हणून नातेपुते फाटा राष्ट्रीय महामार्गाने पानीव पाटी मार्गे अकलूज व पुढे, तसेच अकलूज ते माळशिरस रोड, सभेला येणारी लहान चार चाकी वाहने अत्यावश्यक सेवेची लहान वाहने व शासकीय वाहने वगळून इतर वाहनासाठी मार्ग बंद करण्यात आला आहे. त्यांना पर्यायी मार्ग म्हणून अकलूज येथून पानीव मार्गे पंढरपूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गाने पुढे जाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

अकलूज व परिसरातून येणारी वाहने अकलूज माळशिरस रोडवरील ६१ फाटा येथून कॅनॉल रोडने ६१ फाटा महामार्ग टी पॉईंट येथून माळशिरस शहरात जाणाऱ्या रोडने पालखीतळ व परिसर येथे पार्किंग करावी तसेच वेळापूर, पंढरपूर परिसरातून येणारी वाहने ६१ फाटा महामार्ग टी पॉईंट येथून माळशिरस शहरात जाणाऱ्या रोडने पालखीतळ व परिसर येथे पार्किंग करावेत. शिवाय फलटण, माण, खटाव व नातेपुते परिसरातून येणारी वाहने यादव पेट्रोल पंप माळशिरस येथून शहरात न जाता बायपास महामार्गाने ६१ फाटा महामार्ग टी पॉईंट येथून माळशिरस शहरात जाणाऱ्या रोडने पालखीतळ व परिसर येथे पार्किंग करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**माळशिरस नगरी नटली सजली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी माळशिरस शहरात प्रथमच येत असल्याने संपूर्ण शहराला जणू सणाचे स्वरूप आले आहे. संपूर्ण शहरात आनंदी वातावरण असून पंतप्रधानांच्या स्वागतासाठी माळशिरस नगरी सुसज्ज झाली आहे. तब्बल एक लाख लोक उपस्थित राहण्याच्या दृष्टीने सभेची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. कृषी विभागाच्या ५३ एकरच्या भव्य पटांगणातील २८ एकरामध्ये ही सभा आयोजित केली आहे.

# हलगी वाजवून मैदान मारले

**द. सोलापूर/बालाजी वाघे**

दुपारी पाच वाजल्यापासून हलगी वाजवत येणारे शिवसैनिकांचे जथ्थे... भगव्या टोप्या घातलेले उत्साही कार्यकर्ते... गळ्यात भगवी उपरणी... बाळासाहेब ठाकरेंच्या सभेप्रमाणे मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद... थोडक्यात उध्दव ठाकरे यांच्या सभेचे वर्णन हलगी वाजवून मैदान मारले असेच करावे लागेल.

सोलापूरचा पूर्व भाग हा बाळासाहेब ठाकरे यांच्यावर प्रेम करणारा. त्या प्रेमाची प्रचिती उध्दव ठाकरे यांच्या सभेत दिसून आली. शेकडो कार्यकर्ते हलगी वाजवत येत होते. सभा सुरू झाली तरीही शेकडो कार्यकर्ते येतच होते. भगव्या टोप्यांच्या वातावरणात ही शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची आठवण व्हावी, असा सारा माहोल.

उध्दव ठाकरे ज्यावेळी आले त्यावेळी आडम मास्तरांचे भाषण सुरू होते. भाषण थांबवून ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर आडम मास्तरांची तोफ पुन्हा बरसू लागली. सुशीलकुमार शिंदे यांनीही आपल्या भाषणात बाळासाहेबांशी असलेल्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला. तर प्रणीती शिंदे यांनी सोलापूर काय करणार याचा आढावा मांडला.

#### मुस्लीम युवकाचे ध्वज फिरवणे

हलगीच्या तालावर आलेल्या युवकांपैकी एक मुस्लीम युवक एका कार्यकत्यांच्या खांद्यावर बसून भगवा ध्वज नाचवत होता. ते पाहण्यासाठी शिवसैनिकांसह अनेकांनी गर्दी केली. अनेकांनी आपल्या मोबाईलमध्ये धार्मिक सलोख्याचे हे अनोखे दृष्य चित्रीत केले.

# उपमुख्यमंत्री फडणवीस व कोगनुरे यांच्यात बंद दाराआड चर्चा


## भाजपात प्रवेशाच्या सोशल मिडीयावर चर्चा; कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व एम.के.फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा सागर सिमेंटचे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे यांच्यात सोमवारी (दि२९) सकाळी सोलापूर येथे बंद दाराआड बराच वेळ राजकीय चर्चा झाली. सोशल मिडीयावरुन याबाबत चर्चा होत आहे. यामुळे महादेव कोगनुरे हे भाजपात प्रवेश करणार की काय ? याची चर्चा एम.के. फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांतून सुरु होती. या चर्चेमुळे महादेव कोगनुरे यांच्या कार्यकर्त्यांचा उत्साह मात्र अधिकच वाढला आहे.कारण गेल्या अनेक दिवसांपासून महादेव कोगनुरे यांच्या भुमिकेकडे संपूर्ण दक्षिण सोलापूर तालुक्याचे लक्ष लागून



राहिले होते की,महादेव कोगनुरे हे काय भुमिका घेणार याची उत्सुकता कार्यकर्त्यांमधून होती. सोमवारी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांची सोलापूर होम मैदानावर जाहीर सभेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सोलापूर येथे आले असता तेव्हा महादेव कोगनुरे व देवेंद्रजी फडणवीस यांच्यात बंद दाराआड बराच वेळ राजकिय चर्चा झाल्याने आता महादेव कोगनुरे भाजपात जाणार की काय ? याची चर्चा आज दिवसभर सोशल मिडीयावरुन होताना पहायला मिळत आहे.कारण मागच्याच आठवड्यात सोलापूर लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार प्रणितीताई शिंदे व महायुतीचे उमेदवार आमदार रामभाऊ सातपुते या दोघांनीही महादेव कोगनुरे यांच्या घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली होती.यामुळे महादेव कोगनुरे हे काय भुमिका घेणार याची उत्सुकता कार्यकर्त्यांना लागून राहिली होती.आज पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व महादेव कोगनुरे यांच्यात बंद दाराआड राजकिय चर्चे ने एम के फाउंडेशन च्या कार्यकर्त्यांचा उत्साह पुन्हा एकदा शिगेला पोहचला आहे.



# निरा खोऱ्यातील धरणांच्या पातळीत घट

## माळशिरसमधील सिंचन, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर

**नातेपुते/प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा ४० ते ४२ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. शहरासह, ग्रामीण भागामध्ये तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परिणामी निरा खोऱ्यातील धरणांच्या पाणी पातळीत मोठी घट झाली असून त्याचा फटका सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्याला बसणार आहे.

वाढत्या तापमानामुळे महाराष्ट्रातील अनेक धरणांमधला पाण्याचा साठा वेगाने घटत चालला आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तापमानात जलदगतीने वाढ होत असल्याने बाष्पीभवन वेगाने होत आहे. परिणामी धरणांमधील पाण्याचा साठा कमी होत आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार निरा खोऱ्यातील धरणांमधील पाण्याचा साठाही काही दिवसांमध्य जलद गतीने कमी होत आहे आगामी काळात शेतकऱ्यांचे सर्वाधिक नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांना याचा फटका बसणारच आहे. शिवाय तीव्र पाणीटंचाई झाल्यास पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनणार आहे. पशुधनाच्या पाण्याचा, चाऱ्याचा प्रश्न देखील ऐरणीवर येणार अशी भीती व्यक्त होत आहे.

#### मागील वर्षीपेक्षा आठ टक्के घट

भाटघर धरणात सध्या १० टक्के पाणीसाठा शिल्लक असून, मागील वर्षी १८ टक्के पाणीसाठा होता. मागील वर्षी नीरा देवघर व भाटघर धरणे १०० टक्के भरली होती. नीरा देवघर धरणात १२ टीएमसी, तर भाटघर धरणात २४ टीएमसी पाणीसाठा होता. सध्या भाटघर धरणात १० टक्के पाणीसाठा राहीला आहे. निरादेवघर धरणात १९ टक्के पाणीसाठा आहे. मागील वर्षी ४१ टक्के पाणीसाठा होता. गुंजवणी धरणात २८ टक्के पाणीसाठा असून वर्षी धरणात ४० टक्के पाणीसाठा होता.

# सोलापूर रेल्वे विभागात ‘एक स्टेशन एक उत्पादन’ उपक्रम सुरु

## स्थानिकांना विक्री करण्यास मिळणार संधी

**सोलापूर/प्रतिनिधी**

विभागनिहाय असणाऱ्या रेल्वे स्थानकांवर त्या त्या ठिकाणी प्रसिद्ध असणाऱ्या वस्तूंची विक्री व्हावी आणि त्यातून स्थानिक उत्पादनाला रोजगार मिळावा, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून ‘एक स्टेशन एक उत्पादन’ हा उपक्रम राबविला जात असल्याचे रेल्वे विभागाने सांगितले आहे.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील सोलापूर, कलबुर्गी, लातूर, कुर्डुवाडी आणि पंढरपूर या रेल्वे स्थानकांवर स्थानिक ठिकाणी प्रसिद्ध असणाऱ्या वस्तू ‘व्होकल फॉर लोकल’च्या दृष्टीकोनातून विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. योजनेमुळे देशातील विविध ठिकाणी प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाश्यांना देशात असणाऱ्या विविध संस्कृतीचा समृद्ध वारसा अनुभवण्यास मिळत आहे. शिवाय समाजातील उपेक्षित घटकांसाठी अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी यामुळे निर्माण झाल्या आहेत.



योजनेच्या उत्पादनांचे वेगवेगळ्या श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. या ठिकाणची खाद्य संस्कृती, वेशभूषा, राहणीमान, कापड संस्कृती, हस्तकला/ कलाकृती, स्थानिक कृषी उत्पादने, प्रक्रिया केलेले/अर्ध-प्रक्रिया केलेले पदार्थ यांचा समावेश केला आहे.

सोलापूर रेल्वे स्थानकावर सोलापुरी चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इ.चे स्टॉल ‘एक स्टेशन एक उत्पादन’ योजने अंतर्गत लागले आहे. त्यामुळे सोलापुरी चादरला देशभरात मोठी बाजारपेठ मिळणार आहे. बाहेरील प्रवासी मोठ्या प्रमाणात रेल्वे स्थानकातून चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने खरेदी करतील. याकरिता ‘एक स्टेशन एक उत्पादन’ (ओएसओपी) स्टॉल मिळविण्याची अर्ज प्रक्रिया राबविण्यात आली आहे .

अर्जदाराला आपला अर्ज संबंधित स्टेशन मास्टर यांच्याकडे आपला दाखल करता येईल. नवीन अर्जदाराला दर १५ दिवसांनी एक स्टॉल दिला जाईल. त्यासाठी अर्जदाराला फक्त १००० रुपये शुल्क भरावे लागेल. अर्जदाराला हवी असणारी अधिकची माहिती ही संबंधित स्टेशन मास्टरकडे मिळेल.

रेल्वे प्रवाशांनी आणि नागरिकांनी रेल्वे स्थानकावरील ‘एक स्टेशन एक उत्पादन’ या स्टॉलला भेट देऊन सेवेचा लाभ घ्यावा. असे आवाहन सोलापूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक पाटील यांनी केले आहे.

#### सोलापूर विभागातील विविध स्थानक आणि तेथील उत्पादने –

**सोलापूर रेल्वे स्थानक** – सोलापुरी चादर, टॉवेल आणि स्थानिक हस्तकला उत्पादने

**कलबुर्गी रेल्वे स्थानक** – लोणचे, ज्वारी भाकरी, शेंगा चटणी आणि सर्व प्रकारचे फराळ आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इ.

**कुर्डुवाडी रेल्वे स्थानक** – विविध प्रकारचे पापड, लोणची, सोलापुरी चादर, शेंगा चटणी आणि स्थानिक हस्तकला उत्पादने इ.

**पंढरपूर रेल्वे स्थानक** – विठ्ठल मूर्ती, कुंकू, अगरबत्ती आणि इतर पूजा साहित्य.

**लातूर रेल्वे स्थानक** – पापड, शेंगा चटणी आणि स्थानिक हस्तकला उत्पादने



# धक्का!!

सुराज्य सोलापूर



## सूरतनंतर भाजपाचा इंदूरमध्ये 'खेळ'

### काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांति बम यांची माघार



गुजरातप्रमाणेच मध्य प्रदेशातही काँग्रेसला धक्का बसला आहे. इंदूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांति बम यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. तसंच काँग्रेसचा हात सोडून त्यांनी भाजपाचं कमळ हाती घेतलं आहे. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि मध्य प्रदेश सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेले कैलाश विजयवर्गीय यांनी ही माहिती दिली आहे.

कैलाश विजयवर्गीय यांनी अक्षय बम यांच्यासह सेल्फी काढत तो शेअरर केला आहे. सोशल मीडियावर या बातमीची चर्चा रंगली आहे. इंदूर काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांति बम यांचं भाजपात स्वागत आहे. पंतप्रधान मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वातल्या भाजपाचं कमळ त्यांनी हाती घेतलं त्यामुळे आम्ही त्यांचं स्वागत करतो या आशयाच्या ओळीही विजयवर्गीय यांनी लिहिल्या आहेत.

इंदूर लोकसभा मतदारसंघासाठी अर्ज भरण्याची तारीख २५ एप्रिल होती आणि मागे घेण्याची तारीख आजची म्हणजेच २९ एप्रिलची होती. त्याआधीच कैलाश विजय वर्गीय यांनी खास मोहीम राबवली आणि काँग्रेसच्या उमेदवारालाच पक्षात घेतलं. इंदूरमध्ये १३ मे रोजी मतदान पार पडणार आहे. तर ४ जूनला निकाल लागणार आहे. मध्य प्रदेशातील इंदूर या लोकसभा मतदारसंघातून अक्षय कांति बम यांनी काँग्रेसकडून त्यांचा अर्ज २४ एप्रिलला दाखल केला होता. त्यांनी त्यांच्याकडे ५७ कोटींची संपत्ती असल्याचंही प्रतिज्ञापत्रात जाहीर केलं. अक्षय बम यांच्याकडे कोणतीही कार नाही. मात्र त्यांच्या घड्याळाची किंमत १४ लाख रुपये आहे.



## बरेलीच्या बालेकिल्ल्यात

# भाजपाने बदलला उमेदवार



**गेल्या तीन दशकांप्रमाणेच यंदाही भाजपाचे अनुभवी खासदार संतोष गंगवार हे आगामी लोकसभा निवडणुकीत त्यांचा बालेकिल्ला बरेली येथून लढण्यासाठी तयारी करीत होते. पण गेल्या महिन्यात होळीच्या दिवशी पक्षाने यादी जाहीर केल्यावर त्यांना धक्का बसला. संतोष गंगवार यांच्याऐवजी माजी राज्यमंत्र्यांना मैदानात उतरवण्यात आले आहे. ३५ वर्षांनंतर पहिल्यांदाच बरेली लोकसभा मतदारसंघाची निवडणूक संतोष गंगवार यांच्याशिवाय होत आहे.**



२००९चा अपवाद वगळता याच जागेवरून संतोष गंगवार यांनी आठ वेळा लोकसभा निवडणूक जिंकली आणि २००९ मध्ये त्यांना काँग्रेसच्या उमेदवाराकडून केवळ ९ हजार मतांनी पराभव पत्करावा लागला. यावेळी भाजपा नेतृत्वाने संतोष गंगवार यांचे वय लक्षात घेऊन त्यांना तिकीट दिले नाही. त्यामुळे या जागेवरील लढत रंजक होत आहे. भारतीय जनता पक्षाने संतोष गंगवार यांच्या जागी छत्रपाल सिंह गंगवार यांना उमेदवारी दिली आहे.

२००९मध्ये काँग्रेसच्या तिकिटावर लोकसभा निवडणूक जिंकलेल्या प्रवीणसिंह आरोन यांना सपाने तिकीट दिले आहे. बसपाने छोटेलाल गंगवार यांना येथे तिकीट दिले होते, मात्र त्यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला होता. त्याचा पुरेपूर फायदा भारतीय जनता पक्षाचे उमेदवार छत्रपाल सिंह गंगवार यांना होणार आहे. कुर्मी मतांची जी विभागणी बसपा उमेदवारामुळे झाली असती ती आता होणार नाही. त्यामुळेच येथील लढत रंजक असली तरी या कुर्मीबहुल जागेवर भाजपाचा प्रभाव स्पष्ट दिसत आहे.

भाजपाला उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या जागांची संख्या वाढवायची आहे. गंगवार यांना वगळण्याच्या निर्णयाने मतदारसंघात भाजपाला फटका बसण्याची शक्यता पाहता पक्षाने आतापासूनच जुळवाजुळव सुरू केली आहे. बरेली ही भाजपासाठी सर्वात सुरक्षित जागा मानली जाते. बरेलीमध्ये तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी मतदान होणार आहे. माजी केंद्रीय मंत्री राहिलेले संतोष गंगवार बरेलीमधून १९८९ पासून जिंकत आहेत.

२००९ मध्ये ती जागा काँग्रेसने जिंकली होती. परंतु आता अंतर्गत मतभेदांमुळे भाजपाने त्यांना डावलून माजी राज्यमंत्री आणि माजी आमदार छत्रपाल सिंह गंगवार (६८) यांना उमेदवारी दिली, त्यांच्याकडे बाहेरचे म्हणून पाहिले जात आहेत. तसेच ते अन्य मागासवर्गीय वर्गातील असून, कुर्मी समाजाचे प्रतिनिधित्व करतात. यामुळे संतोष गंगवार संतप्त झाले आहेत, कारण एक शेतकरी समुदाय आहे, जो प्रदेशातील सर्वात मोठा आणि सर्वात प्रबळ ओबीसी गट आहे आणि बरेलीमध्ये त्यांची तीन लाखांहून अधिक मते आहेत.

संतोष गंगावार यांच्या विरोधातील कथित एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. त्या क्लिपमध्ये बरेलीचे महापौर उमेश गौतम हे आता त्यांना आम्ही लक्ष्य करू, असे म्हणाले होते. लोकसत्तानेही या कथित क्लिपची सत्यता तपासलेली नाही. खरं तर ब्राह्मण समाजातील गौतम हे तिकिटाच्या इच्छुकांपैकी एक होते. क्लिपबद्दल त्यांना विचारले असता ते म्हणाले, ऑडिओमध्ये संतोष गंगवार यांच्याविरोधात काहीही म्हटले नाही.

परंतु या ऑडिओ क्लिपने गंगवारचे समर्थक आणि कुर्मी समुदाय नाराज झाला, त्यामुळे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र चौधरी यांना ८ एप्रिल रोजी बरेली येथे दिग्गज नेत्याला भेटण्यास जावे लागले. मात्र गंगवार यांच्या समर्थकांनी चौधरी यांना घेराव घालून गौतम यांना बडतर्फ करण्याची मागणी केली. या वादाबद्दल गंगवार यांना विचारले असता ते म्हणाले, महापौरांच्या टिप्पणीबद्दल मला काहीही म्हणायचे नाही. मी पक्षाच्या निर्णयाचा आदर करतो (त्यांना तिकीट नाकारणे) आणि विजय निश्चित करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

कुर्मी लोकांमधील या तीव्र नाराजीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ एप्रिल रोजी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासमवेत बरेली येथे ४५ मिनिटांचा रोड शो आयोजित केला होता. आदल्या दिवशी पंतप्रधानांनी बरेली जिल्ह्यातील देउचरा येथे एका जाहीर सभेला संबोधित केले होते. विशेष म्हणजे संतोष गंगवार यांनी आंवलाचे उमेदवार धर्मेंद्र कश्यप आणि बदायूचे उमेदवार दुर्विजय सिंह शाक्य यांच्यासमवेत मंच सामायिक केला. गंगवार जवळच्या पिलीभीतमध्ये मोदींच्या कार्यक्रमांना देखील उपस्थित होते, जिथे पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी मतदान झाले होते. संतोष गंगवार हे आता उघडपणे पक्षाच्या उमेदवाराच्या बाजूने आहेत. आता कुर्मी प्राबल्य असलेल्या जागांवर मागासवर्गीय आणि अत्यंत मागासलेल्या लोकांची मते भाजपाच्या बाजूने येत आहेत.

प्रवीण सिंह यांनी जवळपास सर्वच निवडणुका लढवल्या, पण त्यांना फारसा करिष्मा दाखवता आला नाही. याशिवाय ग्रामीण भागात त्यांची पकड खूपच कमकुवत आहे. समाजवादी पक्षाच्या एका समर्थकाचे म्हणणे आहे की, त्यांची शहरात चांगली पकड आहे. मात्र गावात त्यांना फारसा करिष्मा करता येणार नसून पक्षाच्या बळावर त्यांना मते मिळतील. अनेकांनी छत्रपाल सिंह यांच्या ट्रॅक रेकॉर्डवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. २००७ आणि २०१७ मध्ये त्यांनी पिलीभीत लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या बहेरी येथून राज्याच्या निवडणुका जिंकल्या असल्या तरी दुसऱ्यांदा थोड्या फरकाने विजय मिळवला, २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा सपाकडून पराभव झाला.

दरम्यान, सपाचे उमेदवार आरोन हे वैश्य समाजातील आहेत. त्यांना मुस्लिमांचाही पाठिंबा मिळण्याची आशा आहे. मतदारसंघातील १९ लाख मतदारांपैकी सहा लाख मते अल्पसंख्याक समाजातील आहेत. कुर्मींचा पाठिंबा मिळवण्यासाठी त्यांना पक्षाचे सहकारी नेते भागवत सरन गंगवार यांची मदत मिळत आहे, ज्यांनी पिलीभीतमधून निवडणूक लढवली होती. बसपा उमेदवाराचा अर्ज नाकारण्यात आला आहे. माझा विजय निश्चित केला, मला शंका नाही. जर ईव्हीएममध्ये छेडछाड झाली नाही, तर माझा विजय इथे कोणीही रोखू शकत नाही, असे ते म्हणाले. बरेली शहरातही मुस्लिम मतदारांची संख्या मोठी आहे आणि भोजीपुरामध्येही मुस्लिम मतदारांची संख्या मोठी आहे. मुस्लिमांचा समाजवादी पक्षाचा पाठिंबा आहे. भारतीय जनता पक्षाचा बरेलीमध्ये बराच काळ प्रभाव आहे. एवढेच नाही तर लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पाच जागांपैकी चार भाजपाकडे तर भोजीपुरा समाजवादी पक्षाच्या ताब्यात आहे. २०१९ मध्ये भारतीय जनता पक्षाचे संतोष गंगवार यांनी बरेली लोकसभेची जागा एक लाख ६८ हजार मतांनी जिंकली होती. तर २०१४ मध्ये गंगवार अडीच लाख मतांनी विजयी झाले होते.

### सपाची रणनीती आता कामी येत नाही

प्रवीण सिंह आरोन हे समाजसेवा करणारे नेते असून लोकांनी त्यांना साथ दिली पाहिजे, असे तिथले स्थानिक सांगतात. समाजवादी पक्षाने माजी खासदार आणि माजी आमदार प्रवीणसिंह आरोन यांना उमेदवारी दिली आहे. वैश्य समाजाची मते पक्षाला मिळावीत यासाठी समाजवादी पक्षाने रणनीतीचा भाग म्हणून हे पाऊल उचलले. प्रवीण आरोन वैश्य समाजातून आले असले तरी सपाची रणनीती इथे काम करत नाही.

### वैश्य मतदार भाजपाकडे जात आहेत

बरेलीचे मतदार सांगतात की, त्यांचे मत मोदींना जाईल, ते जातीच्या नावावर कोणाला मत देत नाहीत. वैश्य मतदार भाजपाकडे जात आहेत. प्रवीणसिंह आरोन यांना मुस्लिम मते एकजुटीने मिळत असली तरी त्यांना दलित मतांमध्ये खीळ घालता आलेली नाही. बहुजन समाज पक्षाच्या उमेदवाराचा अर्ज फेटाळण्यात आल्याने आणि आता एकही उमेदवार रिंगणात नसल्याने येथे दलित मतांना अधिक महत्त्व आले आहे. त्यामुळे दलित मतदारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्ष आणि समाजवादी पक्ष यांच्यात जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र, बिगर जाटव मतदार पूर्णपणे भाजपाबरोबर जात असल्याने जाटव मतदारांमध्ये फूट पडू शकते.



# आग्रा कोण जिंकणार ?

**समाजवादी पक्ष-काँग्रेस आणि बसपा या दोन्ही पक्षांनी अनुक्रमे सुरेश चंद कर्दम आणि पूजा अमरोही या जाटव दलित उमेदवारांना मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. गेल्या काही दिवसांपासून लोकसभा निवडणुकीतील राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. दोन टप्प्यांतील मतदान संपुष्टात आले असून, ०७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यात मतदान होण्यास अवघे काही दिवस शिल्लक आहेत. सध्या आग्रा लोकसभा मतदारसंघाचीही चर्चा काहीशी गायब झालीय. या मतदारसंघात २०.५७ लाख मतदारांपैकी सुमारे ३० टक्के दलित मतदार आहेत. त्यापैकी जवळपास तीन चतुर्थांश जाटव दलित आहेत. जे भाजपावर नाराज असून, सध्या बसपाबरोबर आहेत. खरं तर आग्रा लोकसभेची जागा भाजपाने मागील तीन वेळा जिंकली आहे, यावेळी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री एसपी सिंग बघेल यांना पक्षाने पुन्हा उमेदवारी दिली. समाजवादी पक्ष-काँग्रेस आणि बसपा या दोन्ही पक्षांनी अनुक्रमे सुरेश चंद कर्दम आणि पूजा अमरोही या जाटव दलित उमेदवारांना मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.**

भाजपाचे ज्येष्ठ नेते ओम प्रकाश यांनी वैश्य, ब्राह्मण, पंजाबी, बिगर यादव ओबीसी आणि दलितांच्या पाठिंब्याने भाजपाला आग्रामध्ये विजय मिळवून दिला आहे. आम्ही १९८९ पासून महापौरपदाच्या निवडणुका जिंकत आहोत आणि २०२२ मध्ये लोकसभेच्या अंतर्गत पाचही विधानसभा मतदारसंघ जिंकले होते. आग्रा आमचा बालेकिल्ला आहे, असेही ओम प्रकाश म्हणतात. आग्रा कॅन्टोन्मेंट विधानसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या बसई खुर्दमध्ये बसपा प्रमुख मायावती शक्ती पणाला लावतील आणि पक्षाला आग्रामध्ये विजय मिळवून देतील, अशी तिथल्या मतदाराने आशा व्यक्त केली आहे. बसपाने बाबासाहेब आंबेडकर जयंती केक कापून आणि मुलांमध्ये तो वाटून साजरी केली. उच्च जाती आणि मुस्लिमांनी मायावतींना पाठिंबा दिल्यास मायावती एक दिवस पुन्हा मुख्यमंत्री होऊ शकतात, असंही मायावतींचे पुतणे आकाश आनंद म्हणाले होते. प्रदेश भाजपा, काँग्रेस आणि सपा सोशल मीडियापुरते मर्यादित असताना केवळ मायावतींनाच जनतेची काळजी आहे, असंही आकाश सांगतात. बसपाचे पेशाने सूतार असलेले मतदार श्रीपाद सांगतात की, तेसुद्धा बसपा जिंकण्याची आशा व्यक्त करतात. मायावतींचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ चांगला होता. भाजपाने कायदा आणि सुव्यवस्था सुधारली असेल, पण दलित म्हणून मला बहेनजींच्या राजवटीत सर्वात सुरक्षित वाटले, असेही ते सांगतात.

३५ वर्षीय ललित वाल्मिकी यांनीसुद्धा मायावतींचं कौतुक केलं आहे. मायावतींच्या सरकारने आम्हाला नोकरी आणि आरक्षण मिळवून दिले, असंही ते म्हणालेत. परंतु भाजपाने हिंदू विरुद्ध मुस्लिम अशा निवडणुका घेतल्यानंतर त्याचा बसपाला सर्वाधिक फटका बसला. बसपाकडून भाजपाला पराभूत करण्याची जोरदार संधी असल्याची खात्री पटल्यावरच अल्पसंख्याक समुदाय पक्षाला मत देतो. आग्रा लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पाचपैकी एक असलेल्या एतमादपूर विधानसभा मतदारसंघातील जाटव असलेले रमेश चंद्र सांगतात की, भाजपा सुपर सरकार आहे. आम्ही अनेक केंद्रीय योजनांचा लाभ घेतला आहे. विशेष म्हणजे चंद हेसुद्धा बसपाचे मतदार आहेत, तरीही बसपा निवडणुकीत का पराभूत होते याबद्दल त्यांना आश्चर्य वाटते. आम्ही सगळे बसपाला मत देतो तरीही भाजपा जिंकतो. ईव्हीएममध्ये काहीतरी गडबड आहे. निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी बॅलेट पेपरवर निवडणूक होणे आवश्यक आहे, असेही ते म्हणतात.

सपा-काँग्रेस आणि बसपा या दोन्ही पक्षांनी जाटवांना उमेदवारी दिल्याने सुमारे २ लाख मुस्लिम मते निर्णायक ठरू शकतात. मुस्लिम बहुसंख्य सपा-काँग्रेसच्या युतीबरोबर असल्याचे दिसत आहे, परंतु बसपा त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. २०२२ मध्ये योगी आदित्यनाथ यांनी मुघल संग्रहालयाचे नाव बदलून छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय केले. त्यामुळे आमच्या भावना दुखावल्या. मुस्लिमाच्या नावे नाव का ठेवता येऊ शकत नाही? असा सवालही मोहम्मद सलीम यांनी विचारला. सपा सरकारने २०१६ मध्ये सुरू केलेला १४२ कोटी रुपयांचा प्रकल्प कोविड १९ महामारीच्या काळात थांबवण्यात आला होता आणि तेव्हापासून तो रखडला होता. या प्रकल्पासाठी सुमारे ९० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्याच्या सरकारने केवळ प्रकल्पाचे नाव बदलले आहे, असंही तिथले मतदार सांगतात. मुस्लिम समुदायामध्येही झटपट तिहेरी तलाकवर बंदी घालण्यासारख्या मोदी सरकारच्या उपाययोजनांबद्दल कौतुक होत आहे. आग्रा कॅन्टोन्मेंटमधील रहिवासी नादिरा म्हणते की, भाजपाने लोकांना जातीय आधारावर विभागले आहे. लोकही मुस्लिम समाजाविषयीच्या वाढत्या द्वेषासाठी भाजपाला दोष देत आहेत.




बसपाचे उमेदवार पूजा अमरोही (५१) या काँग्रेसचे माजी राज्यसभा खासदार सत्या बेहान यांची कन्या आहेत, त्या आतापर्यंत सामाजिक कार्यात कार्यरत होत्या. अमरोही म्हणतात की, बसपाला दलितांची तळमळ आहे. त्यांच्यासाठी बेरोजगारी, शिक्षण, सुरक्षा आणि शुद्ध पिण्याचे पाणी हे मुद्दे महत्त्वाचे आहेत. मी आग्रा येथे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या स्थापनेचे समर्थन करीत आहे, असंही त्या सांगतात. चपलांचे व्यापार करणाऱ्या समुदायातील कर्दम सांगतात की, या मतदारसंघातील मतदारांमधील सर्वात महत्त्वाचा भाग चपलांचे व्यापारी असून, ते सपाचे मतदार आहेत. भाजपा सरकारने सर्वसामान्यांना दिलेली आश्वासने पूर्ण न केल्याने जनता निराश झाली आहे आणि सपा-काँग्रेसच्या युतीच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. जाटव जाहीरपणे बसपाला पाठिंबा देणार असल्याचं सांगत असले तरी ते आम्हाला मत देतील, असंही कर्दम सांगतात. ६३ वर्षीय कर्दम हे राजकारणात नवीन नाहीत आणि त्यांनी २००० मध्ये बसपाचे उमेदवार म्हणून आग्रा महापौरपदाची निवडणूक लढवली. सपाचे प्रमुख अखिलेश यादव फेब्रुवारीमध्ये राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेत सामील झाले तेव्हा आग्रावर लक्ष केंद्रित केले होते.

दुसरीकडे बघेल यांनी गेल्या काही वर्षांत आग्रा येथे केलेले काम आणि राज्य आणि केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या आधारे पुन्हा जागा जिंकण्याचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे. आग्रामधील लोक मला वैयक्तिकरित्या ओळखतात, परंतु सपा आणि बसपाच्या उमेदवारांबद्दल त्यांना माहिती नाही. ही निवडणूक २०१९ च्या निवडणुकीपेक्षा सोपी आहे, असाही ते दावा करतात. २५ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आग्रा आणि लगतच्या फतेहपूर सिक्री मतदारसंघातील भाजपा उमेदवारांसाठी एका सभेला संबोधित केले. सपाचे राज बब्बर यांनी १९९९ आणि २००४ मध्ये आग्रा जागा जिंकली होती.

# महाराष्ट्रात सहानुभूती आमच्या बाजूनं

**महाराष्ट्रात सहानुभूती आमच्या बाजून राज्यात फक्त फोडाफोडीचे राजकारण झाले. आता नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना महाराष्ट्राचे दोन तुकडे करायचे आहेत, अशी टीका एकीकडे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलं आहे.**

कोलकात्याप्रमाणे मुंबईला उद्ध्वस्त होऊ देता येणार नाही, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशाची आर्थिक राजधानी असल्याने मुंबईला स्थिर सरकारसोबत भक्कमपणे पुढे जाण्याची गरज आहे. एकेकाळी देशाचे आर्थिक केंद्र असलेल्या पण राजकारणामुळे उद्ध्वस्त झालेल्या कोलकात्याच्या वाटेने मुंबईला जाऊ देऊ नये,असे मोदी म्हणाले. यावेळी बोलताना नरेंद्र मोदी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला.

न्यूज १८ दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातल्या राजकारणावरहं भाष्य केलं. बंगाल उद्ध्वस्त झाला आहे. कोलकाता एकेकाळी आर्थिक विकासात अग्रेसर होते. पण राजकारणाने ते उद्ध्वस्त झाले. महाराष्ट्राने त्या वाटेने जाऊ नये. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. त्यामुळे देशहितासाठी महाराष्ट्रात भक्कमपणे पुढे जायला हवे. ही भावना आम्ही महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहचवत आहोत. आम्ही त्यांना पटवून देत आहोत आणि आम्हाला महाराष्ट्रातील लोकांकडून खूप सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये यापूर्वीही अस्थिर परिस्थिती होती.पण महाराष्ट्रात बऱ्याच काळापासून युतीची सरकारे दिसत आहेत आणि काही काळापासून एकही मुख्यमंत्री ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकलेला नाही.इथे विलासराव देशमुख होते. शरद पवार देखील इथे मुख्यमंत्री होते. पण पूर्ण बहुमत असतानाही त्यांना पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आला नाही.महत्त्वाचे म्हणजे,गेल्या काही काळापासून एकाही मुख्यमंत्र्याला ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करता आलेला नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. बऱ्याच कालावधीनंतर आपला कार्यकाळ पूर्ण करणारे देवेंद्र फडणवीस हे पहिले व्यक्ती होते. तेव्हाचे सरकार स्वच्छ आणि निष्कलंक होते. जनतेच्या हिताचे काम करणारे सरकार होते, असेही पंतप्रधान म्हणाले.

### उद्धव ठाकरेंनी युतीशी गद्दारी केली

यावेळी बोलताना पंतप्रधान मोदींनी युती तोडणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील फरकही सांगितला. ज्यांनी आमच्यासोबत निवडणूक लढवली, ज्यांनी आमच्यासोबत महाराष्ट्रातील जनतेकडे मते मागितली त्यांचा मुख्यमंत्री होण्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळे अहंकार वाढला.आपल्या अहंकार आणि महत्त्वाकांक्षेमुळे त्यांनी (उद्धव ठाकरे) बाळासाहेब ठाकरे यांच्या काळापासून अस्तित्वात असलेल्या युतीशी गद्दारी केली. लोकांमध्ये याचा राग आहे आणि भाजपबद्दल सहानुभूती आहे, असे पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

### यंदा आमच्या बाजूने सहानुभूती आहे : पंतप्रधान मोदी

भाजपने महाराष्ट्रासाठी बलिदान दिले आहे. काही लोकांना वाटले की आम्हाला मुख्यमंत्रिपद हवे आहे. पण नाही.आम्ही मुख्यमंत्री पद घेऊ शकलो असतो पण तसे केले नाही. आम्ही स्वत:साठी नाही तर महाराष्ट्रासाठी जगतो हे आम्ही महाराष्ट्रातील जनतेला पटवून दिले. या निवडणुकीत ही सहानुभूती आमच्या बाजूने आहे कारण एवढ्या मोठ्या पक्षात यशस्वी असलेला मुख्यमंत्री आता उपमुख्यमंत्री आहे.महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी आपला स्वाभिमान एकप्रकारे बाजूला टाकला आहे, असंही मोदींनी म्हटलं.




### शरद पवारांच्या घरात कौटुंबिक वाद

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शिवसेना किंवा राष्ट्रवादीतील वादळावरून हे स्पष्ट झालं की, जेव्हा तुम्ही इतर नेत्यांपेक्षा केवळ तुमच्या कुटुंबातील सदस्यांना महत्त्व देता तेव्हा काय होते. त्यामुळे अडचणी निर्माण होतात. मुलीने किंवा पुतण्याने पक्षाची धुरा सांभाळावी हा शरद पवारांच्या घरातील वाद हा त्यांचा कौटुंबिक वाद आहे. सक्षम नेत्याला नेतृत्व द्यायचे की मुलाला हे काँग्रेसप्रमाणे शिवसेनेतही सुरु आहे, असं मोदींनी सांगितले.

धक्का!! सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२४ । पान १२

# हेलिकॉप्टर... 'मोदी मोदी' नारा अन् 'जय जय रामकृष्ण हरी'चा गजर!

## जल्लोषी माहोल...

## मोदी करिष्म्याची जादू अन् कार्यकर्ते 'फुल्ल' चार्ज!

**सोलापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगमनाबद्दल भाजप प्रेमींमध्ये उत्साह शिगेला पोचलेला होता. दुपारी १ वाजून ४९ मिनिटांनी मोदींचं हेलिकॉप्टर होटगी रोड विमानतळाकडे आकाशातून झेपावताना सभेच्या ठिकाणी उपस्थित हजारो मोदी प्रेमींनी जागेवरून उठून मोदी....मोदी...अशी घोषणाबाजी केली. यावेळी मोदींच्या आगमनाबद्दल त्यांच्या प्रेमींमध्ये संचारलेला उत्साह लपून राहिला नाही.**

### मोदी, फडणवीस, सातपुतेंच्या आगमनावेळी नारेबाजीनं दुमदुमला आसमंत

पंतप्रधान मोदींच्या सभेच्या पार्श्वभूमीवर, होम मैदान परिसरात भारलेलं वातावरण होतं. उपस्थितांच्या जयघोषांचा 'सिलसिला' कायमच होता. उपस्थित उत्साही भाजपप्रेमींनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सोलापूर लोकसभेचे भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते याचं सभास्थळी आगमन होतानाच प्रचंड घोषणाबाजी झाली. 'जय श्रीराम....अब की बार चारसो पार...' अशा घोषणा दिल्या गेल्या. यावेळच्या नारेबाजीनं अक्षरश: आसमतं दुमदुमला.

### प्रचंड शक्तिप्रदर्शन कार्यकर्ते फुल्ल चार्ज

उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ, होम मैदानावर आज आयोजित मोदींच्या सभेच्या पार्श्वभूमीवर, भाजपनं अफाट गर्दी करत प्रचंड शक्तिप्रदर्शन केलं. साधारण लाखांहून अधिक गर्दीचं शक्तिप्रदर्शन आणि जय श्रीराम...अब की पार ४०० पार...या जयघोषांनी वातावरणात निवडणुकीच्या जल्लोष भरला. शक्ती प्रदर्शन, घोषणाबाजी, देवेंद्र फडणवीस, नरेंद्र मोदी यांची भाषणं यातून निवडणुकीच्या अनुषंगाने, कार्यकर्ते फुल्ल चार्ज झालं. त्यांच्यामधील उत्साह अधिक व्दिगुणीत झाला.

### मोदी प्रेमींचा तब्बल साडेचार तास उत्साह कायम

वास्तविक नरेंद्र मोदी यांच्या सभेची वेळ दुपारी साडेबारा वाजता अशी निश्चित होती. त्या पार्श्वभूमीवर, संपूर्ण सोलापूर लोकसभेच्या मतदार संघातून भाजपप्रेमी पर्यायानं नरेंद्र मोदी प्रेमी हे होम मैदानावर सकाळी अकरा वाजलेपासून ठिय्या मांडून होते. साधारण २ वाजून ८ मिनिटांनी मोदींचं प्रत्यक्ष सभा मंडपात आगमन झालं. २ वाजून ४८ मिनिटांपर्यंत ते सभा स्थळी होते. साधारण चार ते साडेचार तास मोदीप्रेमी एका ठिकाणी ठिय्या मांडून होते. तरीपण मोदीचं भाषण ऐकण्याचा उत्साह त्यांनी कायम ठेवला होता.

### मोदींचा सव्वा तासाचा दौरा अन्....

भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आज सभेच्या निमित्तानं सोलापूर दौऱ्यावर होते. त्यांचा साधारण सव्वा तासाचा दौरा झाला. १ वाजून ५५ मिनिटांनी त्याचं सोलापूरच्या विमानतळावर आगमन झालं.२ वाजून ८ मिनिटांनी ते सभा स्थळी आले. २ वाजून ४९ मिनिटांपर्यंत ते सभास्थळी राहिले. साधारण ४० ते ४१ मिनिटे ते सभास्थळी होते. त्यामध्ये साधारण ३० मिनिटे त्यांनी भाषण केलं.३ वाजून ५ मिनिटांनी त्यांचं हेलिकॉप्टर टेक ऑफ केलं.

### माझ्या प्रिय सोलापूरकरांना...

उपस्थितांची मनं जिंकण्यासाठी मोदींनी 'ती' स्टाइल वापरलीच उपस्थितांची मनं जिंकण्याची नस नरेंद्र मोदी यांना चांगलीच सापडली आहे. प्रत्येक सभेवेळी ते उपस्थितांचं मन जिंकतातच, असा त्यांच्याबाबतीत इतिहास आहे. आजच्या सोलापूरच्या सभेवेळीदेखील अगदी तसंच झालं. मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. 'माझ्या प्रिय सोलापूरकरांना अतिशय मनापासून नमस्कार करतो' अशी मराठीतून साद उपस्थितांना घालताच टाळ्या अन् शिट्ट्या वाजल्या. जय... जय... राम कृष्ण हरी...सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर चरणी मी नतमस्तक होतो... असे शब्दप्रयोग मराठी भाषेतून वापरत मोदी यांनी उपस्थितांमध्ये आपलेपणाबद्दलची भावना निर्माण केली.

### निसर्गाची करणी अन्....

या वर्षाच्या उन्हाळा हंगामातील सर्वात उष्ण दिवस कालचा होता.४३.७ अंशावर पारा गेला होता. यातून काल नागरिकांची अक्षरश: होरपळ झाली. दरम्यान, हा संदर्भ लक्षात घेता, मोदींच्या सभेचं उन्हामुळं काय होणार? रखरखत्या उन्हामुळे उपस्थितीवर काय परिणाम होणार का? यासंदर्भात तर्क-वितर्क काढले जात होते. झालं वेगळंच. निसर्गाचं जणू मोदींची सभेसाठी साथ दिली. ४२.९ अंशावर पारा होता. प्रचंड उकाडा होता. आज रखरखतं ऊन पडलं नाही. तप्त ऊन जाणवलं नाही. त्यामुळे मोदींच्या सभेला आलेल्यांची तेवढी बेजारी झाली नाही. उकाड्याचा त्रास मात्र सहन करावा लागला.

### 'ज्योती' चमकली

एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या प्रदेश प्रवक्त्या तथा लोकसभा निवडणुकीच्या स्टार प्रचारक ज्योती वाघमारेंना भाषण करण्याची संधी आवर्जून मिळाली. या संधीचं त्यांनी अक्षरश: सोनं केलं. शेरोशायरीचा वापर करत अत्यंत आवेशपूर्ण आणि ओघवत्या शैलीत भाषणाची त्यांनी माळ गुंफली. विरोधकांवर तुटून पडताना वाघमारे यांनी सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे यांचा खरपूस समाचार घेत त्यांच्यावर जहरी टीकेची झोड उठविली. त्यांच्या भाषणाला उपस्थितांमधून मोठा प्रतिसाद मिळाला.

### थेट मोदींच्या सभा स्थळावरून...

- जानेवारीनंतर एप्रिलमध्ये आज पुन्हा मोदी सोलापुरात
- उपस्थितांसाठी पिण्याच्या पाण्याची करण्यात आली सोय
- उपस्थितांची नाराजी नको म्हणून बंदोबस्त होता थोडा लूज
- डोक्यावर भगव्या टोप्या, गळ्यात उपरणे घालून कार्यकर्त्यांच्या झुंडीच्या झुंडी कार्यक्रम स्थळी दाखल
- उपस्थितांची उन्हामुळं हैराणी होऊ नये, यासाठी प्रशस्त मंडपाची होती व्यवस्था
- व्यासपीठाच्या पश्चिमकडील बाजूचा मंडप उपस्थितांना बसण्यासाठी ऐन वेळी खुला केल्यानं अनेकांची टळली गैरसोय

### 'ते' टी शर्ट अन् सेंटच्या पॅक लक्षवेधी

मोदींच्या सभेच्या पार्श्वभूमीवर, कार्यकर्त्यांना टी शर्ट आणि कपड्यावर मारण्याचा सेंटचा पॅक देण्यात आला होत. ज्या सेंटच्या पॅकवर मोदी आणि सातपुतेंचं स्टिकर लावण्यात आलं होतं. जे टी शर्ट कार्यकर्ते घातले होते त्यावर 'मैं हूँ मोदी का परिवार... अब की बार ४०० पार' असं ठळकपणं लिहलं होतं, हे टी शर्ट शक्तिप्रदर्शनात चांगलेच लक्षवेधी ठरले.

### लावला जामर...सगळेच नेटवर्कच्या बाहेर

पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याचा पार्श्वभूमीवर, कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता, साधारण २ ते २ वाजून ४९ मिनिटांपर्यंत मोबाइरल जामर लावण्यात आला. त्यामुळे सभेच्या ठिकाणी मोबाईलचं नेटवर्क गेलं. उपस्थित साधारण लाख मोदी प्रेमी नेटवर्कच्या बाहेर गेले.

### 'असं' हटके सोलापुरी स्वागत पंतप्रधान मोदी भारावले

उमेदवार राम सातपुते आणि भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते मोदींचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. सोलापुरातील विणकरांनी मोदींच्या दहा वर्षाच्या कार्यकीर्दीचा आढावा घेणारी मोदींची छबीची खास नॅपकीन अन् सोलापुरी चादर विणली होती. ती मोदींना यावेळी भेट देण्यात आलं. सोलापूरकरांचं हे आगळं वेगळं स्वागत पाहून पंतप्रधान भारावले.

### राम सातपुतेंच्या भाषणाला टाळ्या अन् शिट्या

उमेदवार आमदार राम सातपुते यांनी अत्यंत जोशपूर्ण आणि अभ्यासू भाषण केलं. त्यांनी भाषणामध्ये सोलापूर शहर-जिल्ह्याच्या आनुषंगिक आयटी पार्क हब, द्राक्ष, डाळिंब बाजार विमान सेवा पेठ हे मुद्दे उपस्थितांनी चांगलेच भावले. त्यांच्या भाषणावेळी अनेकदा टाळ्या आणि शिट्या पडल्या.

## भारतात 'रामराम' नाही म्हणायचे तर पाकिस्तानात म्हणायचे का?



सोलापूर : आम्ही 'रामराम' करतो याचा शिवसेनेला इतका राग का येतो? भारतामध्ये 'रामराम' नाही म्हणायचे तर पाकिस्तानात म्हणायचे का? आम्ही 'रामराम' म्हणणारच! अशा स्पष्ट शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना सोमवारी प्रत्युत्तर दिले. भाजपा धार्मिक प्रचार करत असून त्यांना आजही राम नाव वापरावे लागत असल्याची टीका ठाकरे यांनी केली होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापुरात सभा होत आहे. महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी मोदी सभा घेत आहेत. या निमित्त फडणवीस देखील सोलापुरात दाखल झाले आहेत. सोलापुरात दाखल होताच त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी जीवनात एक तरी विकास काम केलेले आहे का? ते मला दाखवा. अडीच वर्षे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदी होते. मात्र, त्यांनी विकासाचे कुठलेच काम केले नसल्याचा आरोप फडणवीस यांनी केला. संजय राऊत ही व्यक्ती कोण आहे? ते मला माहिती नाही. पण ठाकरेंनी मी म्हणजेच महाराष्ट्र, या माणसिकतेतून बाहेर यायला हवे, अशी टीका त्यांनी केली आहे.

उध्दव ठाकरे यांना प्रत्युत्तर देण्याची आम्हाला गरज नाही. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेला विकास पाहत आहे. उध्दव ठाकरे यांनी केलेले विकासाचे एक काम तरी सांगावे. संपूर्ण जीवनात उद्धव ठाकरे यांनी एक तरी विकास काम केलेले दाखवावे, असे म्हणत फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांनी मोदींबद्दल बोलणे म्हणजे सूर्याकडे थोबाड करून थुंकण्याचा प्रकार असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

निवडणुकीच्या तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यात बारामती, माढा आणि सातारा या प्रतिष्ठेच्या मतदारसंघांमध्ये मतदान असून महायुतीच्या उमेदवारांसाठी पंतप्रधान मोदी आज आणि उद्या प्रचारसभा घेणार आहेत. दोन दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एकूण ६ सभा असून यात आज पुणे, कराड आणि सोलापुरात सभा झाल्या. तर मंगळवारी माळशिरस, त्यानंतर धाराशिव आणि लातूर येथे सभा आहेत.

# 'राम'ला एकदा संधी द्या

## ५ वर्षे आराम नाही; फक्त कामच!

## सोलापुरात 'आय टी' हब आणणारच : सातपुते

**सोलापूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला सोलापूरचा विकास करायचा आहे. या रामला एकदा संधी द्या पाच वर्षात आराम न करता मी कामच करणार आहे, असे सांगत महायुतीचे उमेदवार आ. राम सातपुते यांनी आगामी पाच वर्षात सोलापुरात आयटी हब आणण्याचे आश्वासन सोलापूरकरांना दिले.**




आ. राम सातपुते यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापुरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत उमेदवार आ. सातपुते यांनीही जोरदार भाषण करत सोलापूरकरांची मने जिंकली.

सातपुते यावेळी म्हणाले, विरोधक मोदींनी काय केले असे विचारतात. मोदींनी सोलापुरातल्या ३० हजार विडी कामगारांना घरे दिली, हजारो महिलांना उज्वला योजनेद्वारे गॅस दिला, शेतकऱ्यांना वर्षाला कृषी सन्मान योजनेतून ६ हजार रुपये दिले, शहरालगतचे सर्व महामार्ग केले, ४० हजार कोटींचा चेन्नई सुरत रस्ता दिला, हिंदूच्या अस्मितेचे राम मंदिर उभारले. हे सर्व जनता विसरणार नाही.

या उलट येथील काँग्रेसच्या नेत्यांनी भगवा दहशतवाद म्हटले, जवानांचा अपमान केला. भगवा दहशतवाद म्हणून ते आता गुढी पाडव्याच्या मिरवणुकीत फिरत आहेत. ही निवडणूक देशाची आहे. देशाची निवडणूक आली की लोक मोदी यांच्या मागे उभे राहतात आणि यावेळीही राहतील.

### त्यांना डुप्लीकेट शाहरूख खान आणावा लागतो

आम्ही आज लोकांमध्ये जाऊन श्रीरामाचा आशीर्वाद घेऊन मते मागतो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचे पूजन करून मते मागतो मात्र काँग्रेसला उमेदवारी अर्ज भरायला डुप्लीकेट शाहरूख खान आणावा लागतो असे राम सातपुते यांनी म्हणताच उपस्थितांमधून टाळ्या आणि शिट्ट्यांचा गजर झाला.

### सोलापूरची लेक सुरक्षित हवी असेल तर भाजपाची गरज

आज नेहा हिरमेठच्या बाबतीत जे झाले त्याचा मी निषेध करतो. या घटनेचा सोलापूरकरांनी गांभीर्याने विचार करावा. सोलापुरात असे प्रकार नको असतील आणि सोलापूरची लेक सुरक्षित हवी असेल तर भाजपाची गरज आहे, असे सातपुते म्हणाले.

### देश आणि धर्माची निवडणूक : विजयकुमार देशमुख

ही निवडणूक महापालिका, नगरपालिका किंवा लोकसभेची नाही तर ही निवडणूक देशाची आणि धर्माची आहे. त्यामुळे सोलापूरकरांनी आ. राम सातपुते यांना मतदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साथ द्यावी, असे आवाहन आ. विजयकुमार देशमुख यांनी केले. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान मोदी यांनी देशातील शेवटच्या माणसाला लाभ होईल अशा अनेक योजना आणल्या. मोदी यांच्यामुळे आपण आर्थिक स्तरावर तिसऱ्या स्थानावर आहोत. आज मोदींमुळे कोणताच देश आपल्याकडे वाकड्या नजरेने पहात नाही. आज मोदींमुळे हिंदूंचे दैवत असलेले राम मंदिर झाले आहे. त्यामुळे आता मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सातपुते यांना मत द्या, असे आवाहन आ. देशमुख यांनी केले.

### मोदीसाठी मतदान करा : सुभाष देशमुख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा विकास तर केलाच पण सोलापूरलाही भरभरून दिले आहे. त्यामुळे ७ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डोळ्यासमोर ठेवून मतदान करा, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले. भाजपमध्ये चहावाला पंतप्रधान होतो, ऊस तोडकामगार आमदार, खासदार होतो. बाकीकडे केवळ परिवारातील सदस्यच मोठे होतात. मोदी यांनी सोलापूरला घरकुल आवास योजना दिली. सोलापूर लगत राष्ट्रीय महामार्ग दिले, वंदे भारत रेल्वे दिली. हजारो कोटींचा निधी दिला. त्यामुळे आता त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याची आपली जबाबदारी आहे. त्यामुळे मोदी यांनाच डोळ्यासमोर ठेवून मतदान करा, असे आ. सुभाष देशमुख म्हणाले.

## शहिदांचा, जवानांचा वारंवार अपमान सोलापूरकर करणार का सहन?

## फडणवीसांची शिंदेवर तिखट टीका!

सोलापूर : आपल्या विरोधात जे उमेदवार आहेत त्यांचे विचार बघा, वडील म्हणतात देशात हिंदू आतंकवाद आहे, तर मुलगी म्हणते पुलवामाचा हल्ला हा भाजपवाल्यांनी घडवलेलं षडयंत्र आहे. निवडणुका येतील जातील पण हा जवान आणि शहिदांचा अपमान सोलापूरकर सहन करणार आहेत का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरकरांना विचारात आता शिंदे यांना धडा शिकवावा, असे आवाहन केले.

महायुतीचे सोलापूर लोकसभेचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सोलापुरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली.

'जय श्रीराम'च्या घोषणेने फडणवीस यांनी भाषणाची सुरुवात करत या निवडणुकीत लढाई राम सातपुते आणि प्रणिती शिंदे यांच्यातील नसून ही लढाई नरेंद्र मोदी यांना प्रधानमंत्री बनवायचंय की २६ पक्षांच्या खिचडीला जागा द्यायचीय याची लढाई आहे. देशात कोण प्रधानमंत्री पाहिजे? असा सवाल देखील फडणवीसांनी उपस्थितांना विचारला. देशात कोविडची महामारी आल्यानंतर तुम्हाला आम्हाला जिवंत ठेवण्यासाठी या देशाला मोदींनी नेतृत्व दिले. आतंकवादाने डोकं वर काढल्यानंतर घरात घुसून सर्जीकल स्ट्राइक करणारे मोदी आहेत, असेही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. ही जी राहुल गांधीची खिचडी तयार झालीय, ती देशात कोविड किंवा युद्धाची स्थिती निर्माण झाल्यास नेतृत्व करू शकते का? राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे, मुलायम सिंग यांचा मुलगा, लालू प्रसाद यांचा मुलगा, ममता बॅनर्जी, स्टॅलीन यापैकी कोणी देशाचं नेतृत्व करू शकतो का? देशात एकच व्यक्ती देशाचं नेतृत्व करू शकतो तो म्हणजे नरेंद्र मोदी, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### मोदींवरील प्रेम सातपुते मार्फत व्यक्त करा

मोदी यांचे सोलापूरकरांवर प्रेम आहे तसेच प्रेम सोलापूरकरही मोदींवर करतात. आता ७ मे रोजी मोदींवरचे प्रेम सोलापूरकरांनी सातपुते यांना मतदान करून व्यक्त करावे, अशी विनंती फडणवीस यांनी केली.

### पंतप्रधानाजवळ गरीब मुलगाच शोभतो

आपले पंतप्रधान चहावाले होते. त्यांच्याजवळ राम सातपुते सारख्या गरीब घरातला मुलगाच शोभतो, तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेला शोभत नाही, असे सांगत फडणवीस यांनी आ. प्रणिती शिंदे यांच्यावर टीका केली.